वर्षाचा अगाऊ ५० र डाक हांशील ०।३
सहामाही ३ " " ०।९
सालअखेर " ७ " १।८
किरकोळ अंकास................. ०।४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१।६
दुसरें खेपेस ......०।१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 " 1Rs. 8 a
Six monthly..........3 " 9 as
Single copy..........4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIV AKOLA MONDAY 1 DECEMBER 1890 NO 46
वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १ माहे डिसेंबर सन १८९० इ० अंक ४६

### हायस्कूल प्रवेशपरिक्षा.

अकोला इं. म. शाळा

( २४ विद्यार्थ्यां पैकीं १९ पसार )

बाळकृष्ण बळिराम, हणुमंत गंगाराम, लक्ष्मण विष्णु, नरसु रोंडाजी पांडुरंग सदाशिव, त्रिंबक कृष्णाजी, विनायक मोरेश्वर, गोविंद आबाजी, हरीलाल गणुलाल, जानकीराम गजानन, मुरलिधर लालचंद, नुरुल्लाखान शंकर नारायण, त्रिंबक बाळंभट, वासुदेव तुकाराम.

अकोट ( १२ विद्यार्थ्यां पैकीं ५ पसार )

गणपत वेंकार, नारायण गुणवंत, व्यंकटेश नारायण, गोपाळ वामन, शंकर वामन.

खामगांव

( १० विद्यार्थ्यां पैकीं ६ पसार )

गणेश दामोदर, गोविंद नयकृष्ण, नारायण हरी, गोपाळ दामोदर, महादेव बाळाजी, सेशय्या घोंकाल.

बाळापूर ( ८ विद्यार्थ्यां पैकीं २ पसार )

लल्या बाळा, मिठु फत्तेजंग.

चिखली ( ७ विद्यार्थ्यां पैकीं ४ पसार )

अश्रु भवानी, बाळकृष्ण गणेश, नारायण वामन, करामखा वहिमखा.

देऊळगांव राजा

( ७ विद्यार्थ्यां पैकीं ४ पसार )

भाऊ बापू, यशवंत त्रिंबक, राजाराम सिताराम, गोविंद कृष्ण.

शेगांव ( ३ विद्यार्थ्यां पैकीं २ पसार )

दासपिले दुगय्यापिले, रामचंद्र बालय्या.

दर्यापूर ( ९ विद्यार्थ्यां पैकीं ५ पसार )

भगवान रामजी, बळीराम आबाप्पा, नारायण जयराम, गोपाळ मोरेश्वर, रामचंद्र वामन.

मोर्शी ( ३ विद्यार्थ्यां पैकीं २ पसार )

पुण्डलिक बाळकृष्ण, वामन हरी.

उमरावती इंग्लिश मराठी शाळा.

( ३१ विद्यार्थी पैकीं २६ पसार )

केशव बापुजी, बाळकृष्ण गंगाराम, द्वारका रणछोड, पांडुरंग जगन्नाथ, रतन रामजी, वामन यादव, नरहर पांडुरंग, देवीदास गंगाराम, दत्तात्रय पांडुरंग, लक्ष्मण रामजी, नागो गणपत, उपेंद्र श्रीनिवास, शंकर कृष्ण, सिताराम नारायण, गंगाधर तुकाराम, यादव पांडुरंग, लक्ष्मण यादव, शंकर उत्तम, बळवंत विनायक, लक्ष्मण वामन, मानिकसा पुतळसा, काशिनाथ अण्णाजी, राजाराम गणेश वामन रघुनाथ, भास्कर काळेश्वर, विठ्ठल भवानी.

इलिचपूर इंग्लिश मराठी शाळा.

( १० विद्यार्थी पैकीं ३ पसार )

चागन आसाराम, अनंत बापूजी, शंकर नारायण.

कारंजा इं. म. शाळा.

( १० विद्यार्थी पैकीं ६ पसार )

रामकृष्ण बळीराम, रावकृष्ण रामचंद्र, तुकाराम बहिरू, पांडुरंग गोपाळ, नारायण बाळाजी, कृष्णाजी गंगाधर.

खामगांव इं. म. शाळा.

( ३ विद्यार्थी पैकीं २ पसार )

केशव वामन, बळवंत गंगाधर.

मोर्शी इं. म. शाळा.

( ३ विद्यार्थी पैकीं १ पसार )

शिराजउद्दीन आबदुल रहिमान.

मूर्तिजापूर इं म. शाळा.

( ८ विद्यार्थी पैकीं ४ पसार )

नारायण गोविंद, गणपत सिताराम, यशवंत देवराव, हरी शामराव.

तळेगांव इं. मराठी शाळा.

( ६ विद्यार्थी पैकीं ५ पसार.)

शामराव रामसिंग, भगवंत नारायण, शंकर त्रिंबक, यशवंत गोविंद, गोविंद केशव.

वणी इं. म. शाळा

( ६ विद्यार्थी पैकीं ६ पसार )

रामचंद्र नारायण, काशिनाथ हरी, सांभशिव भाऊराव, दत्तात्रय वामन, रामचंद्र बाळाजी, रामचंद्र बाळंभट.

यवतमाळ इं. म. शाळा.

(९ विद्यार्थी पैकीं ८ पसार.)

गोपाळ नागो, सिताराम रामराव, गणेश जयकृष्ण, बाळाजी रामकृष्ण, गणपत शिवाप्पा नारायण शंकर, दामोदर गणेश, तुकाराम रामजी.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ६ शके १८१२.

### वऱ्हाड शिक्षक समाज

हा आठवडा मोठ्या मौजेचा गेला. सभा व्याख्यानें, कवायती, मित्र मंडळींच्या भेटी इत्यादि गोष्टींत आम्ही अगदीं निमग्न होतों. 'वऱ्हाड शिक्षक समाज' ही संस्था स्थापन होऊन सहा वर्षे झालीं. प्रस्तुतचा तिचा समारंभ सातवा होय. या समाजाचें महत्व व उपयुक्तता फार मोठी आहे. त्याचा नानाविध प्रकारांनें शिक्षणाच्या कामांत उद्योग चलला आहे. सांप्रत त्या समाजाची मातबरी आम्ही इतकी मानतों कीं त्या समाजाशीं इतरांचा परिचय करून देणें भाग आहे. हा काल पावेतों शिक्षक समाजाचें कांहीं एका मर्यादें बाहेर लक्ष पोंचत नसे. त्यांच्या कामाची व्याप्ती दूर पर्णी सर्वांस कळून आली नव्हती; परंतु सध्यां समाजा पासून आमचें अनेक प्रकारें कल्याण होण्याचा संभव आहे. शिक्षणाचा वास्तविक अर्थ पाहिला म्हणजे या समाजाच्या कामाची मर्यादा विस्तृत होणें रास्त दिसेल.

मागील डायरेक्टर राव बाहादुर नारायण भाई दांडेकर यांनीं वरिष्ठ सरकारच्या परवानगीनें 'शिक्षक समाज' प्रथम उभारला. त्या वेळीं त्यांचा उद्देश शिक्षण क्रमांतील अडचणी परस्परांच्या माहितीनें दूर व्हाव्या असा होता. वऱ्हाड शाळा खात्यांतील मुख्य मुख्य अधिकारी व शिक्षक वर्षांतून एकवेळ नोवेंबर महिन्यांत एकत्र होतात. ते आळीपाळीनें उमरावतीस किंवा अकोल्यास चार दिवस जमतात. समाजाच्या कामीं खर्चिलेले दिवस सरकारी कामावर रुजू धरतात. या मुख्य शिक्षक समाजास अंगभूत लहान लहान पोट समाज आहेत. त्यांच्या नियमित वेळीं सभा भरत असतात. या उपसमाजांची सर्व सूत्रें शिक्षक समाजाच्या हातीं असतात. मूळ संस्थेचे चालक शाळा खात्यांतील श्रेष्ठ श्रेष्ठ गृहस्थ हे होत. सारांश, हा समाज भरल्यानें वऱ्हाडांतील विद्वान् लोकांची शिक्षणा संबंधीं मतें चांगली कळून येतात. शिक्षक मंडळीचें मनोगत परस्पर समजतात आणि त्या योगानें शिक्षणांतील बहुत अडचणी शांत विचारानें दूर होत असतात. चार चौघे गृहस्थ एका उद्योगा निमित्त जमले म्हणजे हातीं घेतलेलें कार्य सुयंत्रपणें तडीस जातें असा आपला नित्याचा अनुभव आहे. त्या प्रमाणें शिक्षणक्रम सुधरेल व त्यांतील उणीव नाहींशी होईल असे उपाय योजण्या साठीं शाळा खात्याचे प्रमुख गृहस्थ विचार करीत बसले म्हणजे सहज शिक्षणाचे मार्ग सुलभ होतात व लोक अधिक शहाणे होतात. तेव्हां शिक्षक समाज म्हणजे डायरेक्टर साहेबांचें मंत्रिमंडळ असें गोळाबेरजेनें सांगता येईल.

'वऱ्हाड शिक्षक समाजा' पासून अंतर कामेंही पुष्कळ होतात. एक शिक्षक समाज भरला म्हणजे प्रांतांतील बरेच शहाणे लोक एके ठिकाणीं जमतात. तेव्हां अशा समुदायाच्या बळावर इतर सामाजिक गोष्टी सुसाध्य करून घेतायेतात. सामाजिक अडचणींची तडजोड काढण्यास शिक्षकसमाज हें उत्तम साधन मिळालें आहे. कांहीं सभ्य गृहस्थांनीं या समाजाच्या साह्यानें सामाजिक सुधारणेकडे लोकांचें लक्ष्य वळवावें पाहिजे आहे. राव बहादूर जठार यांचे अभिप्राय अशा सामाजिक कार्यास फार अनुकूल आहेत; आणि प्रत्यक्ष डायरेक्टर हे पुरस्कर्ते आहेत ह्मणून अन्य लोकही शिक्षक समाजाच्या कामांतून फुरसत काढून मनोभावानें गृहस्थिति सुधारण्यांत झटत आहेत.

राष्ट्रीय सभेचा आणि सामाजिक सभेचा जसा कांहींमात्र संबंध नाहीं त्या प्रमाणें शिक्षक समाजाचा व इतर सामाजिक मंडळ्यांचा बिलकूल संबंध नाहीं. अशा तऱ्हेचा बोभाटा होऊं नये ह्मणून आह्मी हें मुद्दाम लिहित आहों. संबंध काय तो एवढाच कीं उभय समुदाया मध्यें पुष्कळ गृहस्थ निरनिराळे असतात. एका शहरीं व एकाच समयीं कांहीं जन दोन भिन्नभिन्न कार्या साठीं जमतात या पलीकडे परस्पर संबंध कांहीं नाहीं हें सर्वांनीं मनांत वागविलें पाहिजे.

वऱ्हाड शिक्षकसमाजाची साळाबादप्रमाणें वार्षिक सभा प्रथम गेल्या बुधवारीं भरली आणि सभेचें काम चारदिवस चालून परवां शनिवारीं निर्विघ्नपणें सविशेषतया गेलें. सभेच्या कामाचें सूचीपत्रक पूर्वी ठरलेलें होतें तरी त्यातील कांहीं गोष्टी संबंधानें योग्य फेरफार करावा लागला व कांहीं बाबी अनिश्चित रद्द कराव्या लागल्या सर्व मंडळी सरासरीनें सव्वाशें जवळ जवळ होती.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार यांनीं पहिल्यानें जमलेल्या मंडळीचें आगत स्वागत पूर्वक आभार मानिले त्यांच्या भाषणांतील सारांश येणें प्रमाणें:—तें ह्मणाले कीं हा वर्षाचा आनंदाचा दिवस होय. या संस्थेस सात आठ वर्षे झालीं. तिजपासून कांहीं तोटा नाहीं. फायदे सांगता येणें कठीण आहे पण खात्रीनें तोटा तरी नाहीं. आपण एक धंद्याचे लोक एके ठिकाणीं जमतों. येथ परस्पर एकमेकांस भेटतों हाच मोठा फायदा आहे. धंद्याच्या अडचणी दूर करण्यासाठीं प्रत्येक मनुष्य निरनिराळे उपाय योजित असतो. सर्व उपाय एकत्र होऊन कांहीं तरी माहिती मिळून मनाचा विकास होतो. आपला सर्वांचा उद्देश एक आहे, एकच गोष्ट सिद्धीस न्यावयाची आहे तेव्हां आपण सर्वजण मित्र आहों. लोकांना शिक्षण देणें व त्यांस शहाणे करणें हा आपला उद्देश होय व या विषयीं सर्वांनीं प्रयत्न करणें आहे. पहिले भेटीच्या वेळेस गैरसमज झाल्यास परस्परांच्या उद्देशा मध्यें साहजिक विरोध दिसतो परंतु सर्वांचें उद्देश एक असल्यानें सर्व आपण मित्र होतों याचा दृष्टांत अर्ड्रोक्लिज आणि सिंह यांचा होय. मोठ्या पटांगणावर पहिल्यानें सिंह चवताळून अर्ड्रोक्लिजाच्या अंगावर चालून गेला; पण पुढें नीट पाहिल्यावर त्याला तेव्हांच कळलें कीं हा आपला मित्र आहे. या प्रमाणें शेवटीं सर्व आपण एक आहों. मजकूर तयार आहे तेव्हां त्या प्रमाणें कामें होतील. करावयाचें काय व न करावयाचें कोणतें याचा सर्वांस अनुभव आहे. कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्या विषयीं सरकारचे नियम केलेले आहेत. तेव्हां त्या विषयीं निराळा विचार करण्यांत फायदा नाहीं. या शिवाय समाजानें कांहीं दोन तीन गोष्टी सर्वांनीं विचार करावा त्या अशा:—

( १ ) आपल्या येथें ट्रेनिंग कालेज आहे तेथें प्युपिल टीचर तयार करण्याचा सरकारचा हेतु आहे. शिक्षकाचें काम करण्याला तयारी पाहिजे. चांगला शिक्षकशहाही मास्तर

रचें काम नीट करूं शकत नाहीं. कसें शिकवावें या बद्दल अभ्यास पाहिजे. या विषयीं उहापोह होऊन सुधारलेल्या राष्ट्रांचा समज पूर्वशिक्षण पाहिजे असाच ठरला आहे. हल्लींची प्युपिल टीचर ची व्यवस्था चांगली नाहीं. ट्रेनिंग कालेजच्या लोकांस दहा बारा रुपये पगार मिळतो. त्याच पगारावर दहा दहा इयत्ते पावेतों हायस्कुलांत शिकलेले लोक मिळतात. तेव्हां नवीन युक्ति काढिली पाहिजे कीं ट्रेनिंग कालेजांत शिक्षण शिकलेल्या लोकांस देतां यावें. याबद्दल विशेषें करून इनस्पेक्टींग आफिसरांस ही सूचना आहे रावबहादुरांच्या कडे ज्या सूचना जातील त्यांचा ते मोठ्या आनंदानें विचार करितील.

२प्रांतांतील दोन्ही हायस्कूला मधून सारखीं पुस्तकें चालावीं म्हणजे परस्परांच्या योग्यतेची तुलना करण्यास सोयीचे पडतें. या रावबहादूरांच्या इच्छे प्रमाणें त्यांच्या मागें ही चांगली व्यवस्था झाली. हल्लींची व्यवस्था चांगली झाली आहे तरी एकच पुस्तक व तींच पृष्ठें चालावीं हें मला चांगलें वाटत नाहीं. हायस्कूलच्या शिक्षकास ही सूचना आहे.

( ३ ) या सालच्या रिपोर्टी वरून दिसते कीं वरिष्ट अधिकाऱ्यांच्या मतें हायस्कूल प्रवेश परीक्षेनें मुलें लायक येतात किंवा नाहीं हें बरोबर कळत नाहीं. यांत हायस्कूलचे व आंग्लो व्हरन्याक्युलर शाळेचे शिक्षक या मध्यें संबंध आहे तेव्हां त्यांनीं शांतपणें विचार करावा म्हणजे अधिकाऱ्यांचें म्हणण्या प्रमाणें फेरफार काय काय केले पाहिजेत हें कळेल.

४ समाजा कडून सूचना येतात त्यावर राव बहादूरांना निकाल किंवा जबाब बरोबर देतां येत नाहीं. खात्यांतील नियमा प्रमाणें किंवा पूर्वींच्या हुकूमा प्रमाणें गोष्टि कराव्या लागतात. तेव्हां समाजांतून जे ठराव होतील त्यांचीं कारणें, त्या वरील मतभेद व वादविवाद इत्यादि सविस्तर कळवावे. चार दिवसांनीं पुढें रिपोर्ट झाल्यास हरकत नाहीं. दिवाळीची सुटी पुढें पंधरा दिवसांनीं घ्यावी किंवा वाढवावी अशा सारख्या गोष्टी विषयीं विचार नको आहे. जेणें करून शिक्षण अधिक उपयोगी होईल व सर्वांचें काम चांगलें दिसेल असें झालें पाहिजे.

तदनंतर मागील सालचा रिपोर्ट वाचण्यांत आला, आणि इन्स्पेक्टिंग ऑफिसर्स व शिक्षक मंडळी यांच्या पृथक सभा भरून नेहमीं प्रमाणें कामास सुरवात झाली. इन्स्पेक्टिंग ऑफिसर्स यांनीं आपल्या सभेंत निरनिराळ्या सूचनांचा विचार फार पोक्त रीतीनें केला. शिक्षक समाजामध्यें ही सर्व कामें बहुतेक प्रोग्राम प्रमाणें सुरळीत झालीं. सर्व मंडळींनीं रा. रा. हरीभाऊ रोहिणखेडकर बी. ए. व रा. रा विष्णु नारायण डांगे बी. ए. यांच्या वर्षाच्या कामाबद्दल आभार मानले. पुढील सालासाठीं रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर बी. ए. यांस आणि रा. रा. श्रीधर रामचंद्र चिपळखेरे व लक्ष्मण कृष्ण चिपळूनकर बी. ए. यांना अनुक्रमें अध्यक्ष व सेक्रेटरी नेमण्यांत आले.

यंदा शिक्षक समाजापुढें इंग्रजी धर्तीवर शिकवलेल्या मुलांची कवाईत करून दाखवण्यांत आली. ही नवी टुम आहे. व ही लोकांस फार आवडली. या कवाईती निमित्त ड्रील मास्तर रा. रा. बळवंत गणेश यांची डायरेक्टर साहेबांनीं योग्य स्तुति केली. मुलांना खाऊ साठीं एकंदर १२ रुपये मिळाले त्यांत रा. रा. जयकृष्ण बगाजी यांनीं ५ रु. बक्षीस दिले आहेत.

परवां शनवार सायंकाळीं शिक्षक मंडळींचा व इन्स्पेक्टिंग आफिसरांचा चार दिवस झालेल्या कामाचा रिपोर्ट वाचल्या नंतर डायरेक्टर साहेबांनीं उपसंहारा दाखल भाषण केलें. त्यांतील ठळक ठळक गोष्टि येणें प्रमाणें:-

वर्षभर रजेवर असल्यामुळें राव बहादुराना समाजाचे कामांत फार फरक दृष्टीस पडला. इन्स्पेक्टिंग ऑफिसर्स यांनीं पद्धतशीर पोक्त रीतीनें विचार करून ठराव केले ह्मणून त्यांनीं त्यांचे पुष्कळ आभार मानले. आणि त्या रिपोर्टावर आजच कांहीं सांगतां येत नाहीं असें ही दर्शविलें. शिक्षक मंडळीमध्यें ही कामें चांगली झालीं ह्मणून तिचे त्यांनीं आभार मानले. सभेमध्यें व्याख्यानें झालीं. गणित, इतिहास वगैरे विषय शिकवून दाखविले व शास्त्रीय प्रयोगही करून दाखवण्यांत आले. जयकृष्ण बापू, महादेव खंडो, दामोदर मोहनीराज, कुंटे, रघुनाथ वामन देवभानकर बी. ए. सय्यद अबदुल्ला इत्यादि मंडळींचे विशेषें करून त्यांच्या परिश्रमा बद्दल आभार मानण्यांत आले. राजश्री देवभान कर यांचे रसायन शास्त्रावर व्याख्यान माहिती व ज्ञान यांनीं भरपूर असून सर्वांस मनोरंजक झालें.

रॉयल रीडर नंबर २ सुरूं करावें अगर न करावें याबद्दल टेक्स्ट बुक कमिटीचीं मतें समसमान पडल्यामुळ व उभयपक्षीं त्यांनीं आपलें मत देण्यांत कारणें स्पष्ठ रितीनें न कळविल्या मुळें निकाल करणें विचारावर पडलें, आणि तशांत रावबहादुर रजेवर गेल्या मुळें तें काम भान तागाईत तसेंच राहिलें. चित्रकलेची सूचना चागली आहे आणि त्या बद्दल डायरेक्टर साहेब जरूर विचार करतील. सारखा पोशाख मुलांनां घालण्यास लावावें अशी सूचना आहे तींत निदान रावबहादूरास कांहीं महत्व वाटत नाहीं. पेशवाईच्या वेळची मोडी अक्षरें वळणदार व सुवाच्य असत परंतु अलिकडे बहुतेकांचीं अक्षरें वईट असतात. वणी जिल्ह्याची अक्षरा संबधानें सर्वांवर सरशी आहे. वणी जिल्हा मागसलेला आहे तरी त्या जिल्ह्याचें काम फार उत्तम चाललें आहे. ही गोष्ट accidently ( काकतालीय न्यायानें ) झाली असें ह्मणवत नाहीं तर त्याबद्दल कैलासवासी भाटवडेकर यांस आपण ऋणी आहे असें ध्वनित करितांना रावबहादुरांस फार खेद वाटला. त्यांस एक वाईट गोष्ट बोलून दाखवावी लागली कीं एज्युकेशनर संबधानें विचार करणें समाजाला नको होतें ही गोष्ट समाजानें अधिकारा बाहेर केली. त्यांना हा अधिकार कां देऊं नये हें तों डानें स्पष्ठपणें अशा मंडळीस सांगतां येत नाहीं. अमुक वर्तमानपत्रें शाळे साठीं घ्यांवी अशी शिफारस करणें कांहीं बरोबर नाही. कांहीं प्रसिद्ध पुरुषांचीं अलिकडील तानी उदाहरणें दर्शवून इंग्लंडा सारख्या सुशिक्षित लोक समाजांत नीती शिक्षणाची केवढी योग्यता मानली जाते व खरोखर या विषयीं स्वतंत्र केवढी मोठी योग्यता आहे आणि लहान मुलांचे आईबाप आणि त्याच प्रमाणें सर्व पंतोजी शिक्षक यांनीं नीतीचें बीज लहानपणींच मुलांच्या अंतःकरणांत ठसवून व बारंवार त्याच्या परिपोषणार्थ व विकासार्थ पुनः पुनः त्याचे उल्लेख करून देण्याची किती आवश्यकता आहे या संबधानें भाषण करून त्यांनीं सभा समाप्त केली.

## वऱ्हाड सामाजिक सभा

सर्व हिंदुस्थानभर समाजाच्या सुधारणे संबधानें पुष्कळ चळवळी सुरू आहेत त्याच प्रमाणें आमच्या वऱ्हाड प्रांतांत ही चालू आहेत. लोकस्थिती सुधारणें अगर गृहस्थिती सुधारणें हें प्रत्येकास आवडतें. परंतु ती प्रत्येकास सुधारतां येत नाहीं. सामाजिक सर्व गोष्टी बहु मतानें व्हाव्या लागतात. त्या अर्थी समाजाचे सुधारक सर्व लोकांना आपल्या बरोबर घेऊन चालणारे पाहिजेत. आणि ते ज्या मानानें लोकांना मिळतात त्या मानानें लोकांचें पाऊल सुधारणेंत मागें पुढें असतें. आमच्या वऱ्हाड प्रांतात ही राजमान्य असे कांहीं गृहस्थ पुढारी आहेत. आणि त्यांचेच प्रयत्नानें प्रांतांतून थोडाबहुत फेरफार प्रचारांत येत आहे. शिवाय सामाजिक उन्नतीला कायमच्या मंडळ्या लागतात. राजपुतान्यांत लग्नादिकर्पैं व उत्तर क्रिया या निमित्त मनस्वी खर्च होत असे व तो लोक मताला भिऊन सर्वांना करावा लागे. अशा दुष्ट प्रचारामुळें पुष्कळ मध्यम प्रतीचे गृहस्थ टार बुडाले. ही घातुक रीत मोडण्यासाठीं समाज स्थापून लोकांनीं सर्व सामान्य असे नियम अमलांत आणले. या गोष्टि तिकडे नेटिव राजे असल्यामुळें सहजी फलद्रुप झाल्या. पुणें मुंबईकडे राजबल नाहीं तरी लोकांनीं कांहीं मंडळी स्थापन करून गृहस्थिति सुधारणेचे मार्ग काढिले आहेत. अशा प्रकारचे समाज आणखीही पुष्कळ शहरीं आढळतील. आमच्या वऱ्हाड प्रांतांत अशा समाजासारख्या संस्थेची मोठीच उणीव होती परंतु ती नाहींशीं होऊन ' वऱ्हाड सामाजिक सुधारणा मंडळी ' अशा नांवाची सभा तारीख २८ रोजीं स्थापित झाली ही मोठी आनंदाची गोष्ट होय. लोकमताची मातबरी ज्यांना कळून आली आहे त्यांना समाजाची अवश्यकता निराळे रीतीनें सांगणें नकोच. सामाजिक सुधारणेसाठीं हा समाज निघाला आहे. त्या अर्थीं कोणत्या गोष्टी त्या सदराखालीं येतात व त्या संबधानें किती तऱ्हेचा मतभेद दृष्टीस पडतो ही गोष्ठ सांगणें कांहीं नवीन नाहीं. परंतु वरील समाज कसा स्थापित झाला याची आम्ही संक्षिप्त हकीकत सादर करीत आहों.

गेल्या शुक्रवारीं सकाळीं सार्वजनिक सभा भरली होती. आरंभीं आमचे समाजाचे अग्रणी रावसाहेब देवराव विनायक यांनीं सांगितलें कीं समाजाच्या व्यवस्थे संबधानें मतभेद आहे. तरी उलट सुलट पक्षांचा मिलाफ करावा व पद्धतशीर व्यवस्था व्हावी म्हणूनच आपण येथें जमलों आहों. अशा वेळीं अध्यक्षस्थानीं कोणीतरी जबरदस्त गृहस्थ पाहिजेत ह्मणून रावबहादुर जठार यांची योजना सर्वानुमतें पसंत झाली. नंतर अध्यक्ष आरंभी अशा अर्थाचें बोलले:-- आपण इतकेजण जमलों आहों व आपण यारीतीनें शिक्षक समाजा साठीं जमलेल्या मंडळीचा उपयोग करून घेतां हा आनंदाची गोष्ठ आहे. पुढारीपणा घेणारे लोक चांगलेच पाहिजेत. निरनिराळ्या मतांच्या लोकांमध्यें कांहीं जण सुधारणा नको असें म्हणणारे सांपडतात ( माझी ही चुकी असेल तर मला आनंद होईल. ) कांहींजण सुधारणा अवश्य असावी असें म्हणतात मात्र पण करण्याची मुळींच इच्छा नसते. कित्येकांची मनापासून फार इच्छा असते परंतु प्रसंग बेतल्यास नेहमीं मागें घेतात. कांहीं जणांच्या मनांतही असतें व ते यत्न ही करीत असतात. पण या शिवाय कित्येक अधिक यत्न करून सुधारणा झालीच पाहिजे असेंही आग्रह धरून बसतात. आपली गृहस्थिती आहे ती चांगली आहे असें म्हणणाऱ्या लोकांची ओढ धर्माकडे विशेष असते. धर्माच्या विरुद्ध वर्तनावर त्यांचा विशेष कटाक्ष असतो. परंतु ते धर्म शद्वाच्या अर्थांत फार घोटाळा करितात. धर्म या शद्वाचा एक अर्थ शास्त्रोक्त रीतीनें ईश्वराचे भजन पूजन हा होय. दुसरा धर्म म्हणजे कायदा किंवा कानू. धर्मा प्रमाणें चाललें पाहिजे हें वाक्य पहिल्या अर्थाशी सयुक्तिक जुळतें. कां कीं कायदे नेहमीं बदलावे लागतात. पांच पंचवीस वर्षांत फार फरक पडतो. पूर्वींचे धर्म म्हणजे कायदे पहा. हल्लीं आपण आगगाडीनें प्रवास करितो नाना जातीचे लोक एकत्र बसतो, सोळी नेतो, पाणी पितो, फराळ करतो अशावेळीं शेपन्नास वर्षां पूर्वींचा एखादा हिंदु उत्पन्न झाला तर म्हणेल कीं काय हा दुराचार! हल्लीं मात्र तसें कोणी म्हणणारे नाहीं. कायद्या मध्यें बदल पाहिजे व ते आपोआप बदलले ही जातात. धर्म म्हणजे ईश्वर सेवा, पुण्य करणें; व त्या प्रमाणें वागणें हें उत्तम आहे किंबहुना अवश्य आहे. तरी दुष्ट चाली पासून बेधडक अधर्म होत असून ही तो आमच्या धर्मा प्रमाणें आहे असें म्हणणें वेडेपण होय. अधर्मास उत्तेजन मिळणें ही फार वाईट गोष्ठ आहे. अशा चाली नाहींशा करण्या साठीं थोडातरी आरंभ केला पाहिजे. तशा शिवाय तें कांहीं सिद्धीस जावयाचें नाहीं. दुराग्रह नाहींसा करणें हें विद्वान म्हणविणाऱ्याचें काम आहे आपण आपली गृहस्थिती सुधारण्याचा विचार केला नाहीं तर मला वाटतें कीं विद्या येत नसती तर बरें झालें असतें. हा दोष सार्वत्रिक आहे. पुष्कळ ठराव झाले आहेत. पण कांहीं उत्तम परिणाम होईलच असें सांगवत नाहीं. परंतु कांहीं तरी प्रयत्न केला पाहिजे व तो धर्माच्या विरुद्ध न जाईल अशा रीतीनें झाला म्हणजे पुरे. लग्न संबंधानें व मद्यपान निषेधा संबंधानें कांहीं सूचना मुख्यत्वें करून आपल्या समोर यावयाच्या आहेत. ( टाळ्यांचा गजर. )

यावर पहिली सूचना. रा. रा. विष्णू मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं अशा प्रकारच्या समाजिक सुधारणा करण्या करितां एक कायमचा समाज स्थापन व्हावा अशी केली. हें सुचवित असतां ते म्हणाले: सुधारणा अवश्य पाहिजे; करण्या सारख्या असतील त्या करून घ्याव्या. समाजांतील अडचणी मागें राजा कडून दूर होत असत किंवा शंकराचार्य करीत. आपल्या शास्त्र कर्त्यांची दूरदृष्टि खरीकीं त्यांनीं संव प्रवृत्तीनें कलियुगांत सुधारणा होत जातील असें लिहून ठेविलें आहे. इतर राष्ट्रांत ही संवा कडूनच सुधारणा होता-

त. ज्या गोष्टी सर्वांस सुखकर वाटत नाहींत किंवा दुष्कर वाटतात त्या आपल्या मुलांना सुसाध्य वाटतील तेव्हां खटपट करण्याचें आपणांस एक वळण लावून घेतलें पाहिजे. ही सूचना मोठ्या बहुमतानें पसार झाली. मध्यंतरीं बरीच भवती न भवती झाली व उभयपक्षीं वादविवाद होण्यास सबळ कारणें दिसून आलीं.

सामाजिक सुधारणेच्या नियमांचें पत्रक लोकांच्या माहिती साठीं ठिकठिकाणीं फिरविलें जात आहे व जाणार आहे त्याचा मसुदा येणें प्रमाणें:—

विवाह संबंधीं नियम

१ (अ) मी आपले मुलाचें लग्न खालीं सही केलेल्या कोष्टकांत मांडलेल्या वया पूर्वीं करणार नाहीं. २०–१९–१८–१७–१६–१५ अशी सहा कोष्टकें आहेत.

(ब) मी आपले मुलीचें लग्न खालीं सही केलेल्या कोष्टकांत मांडलेल्या वया पूर्वीं करणार नाहीं. ८--९--१०-११--१२ अशीं पांच कोष्टकें आहेत,

२ (अ) मी आपलें लग्न करते वेळीं माझे व बायकोचे वया मध्यें तीस वर्षांहून अधीक अंतर ठेवणार नाहीं.

किंवा (ब) मी आपले वयाचे चाळीस वर्षां नंतर आपलें लग्न करणार नाहीं.

३ देशस्थ, कोंकणस्थ, व कऱ्हाडे यांच्या मध्यें परस्पर विवाह संबंध होण्यास असलेल्या अडचणी दूर करण्या विषयीं मी प्रयत्न करीन व असा विवाह केलेल्या घराण्याशीं विवाह संबंध करण्यास मी हरकत घेणार नाहीं.

४ मी आपले मुलीचें लग्न करितांना वधुपक्षास हुंड्याची किंवा करणीची अट सांगणार नाहीं.

५ माझ्या मुलाचें लग्न करितांना मी माझ्या सहामहिन्याच्या उत्पन्नाहून जास्त बुडित खर्च करणार नाहीं.

६ माझ्या मुलीचें लग्न करितांना मी माझ्या एक वर्षाच्या उत्पन्नाहून जास्त खर्च करणार नाहीं.

७ माझ्या पत्नीस व मुलास देववेल तितके जास्त शिक्षण देईन.

८ मी दारू पिणार नाहीं.

वरील नियमावर बरीच चर्चा झाली, व अनुकूळ प्रतिकूळ पक्षांचे अभिप्राय सभेपुढें स्पष्ट रीतीनें सांगण्यांत आले. मातबरी, श्रीमंती किंवा अधिकार यांचें वजन कोणावरही न पडतां सर्वांना मनसोक्त आपले विचार परस्पर कळवितां आले. सभेमध्यें जे कोणी बोलले ते व्यवस्थेशीर आपआपल्या समजाप्रमाणें खऱ्या खऱ्या गोष्टी सांगत होते. सभेचें काम शांत विचारानें चाललें होतें. ही सामाजिक सभा होती तरी सर्वजण स्थीर होते व कोणतीही वृथा चलबिचल दिसून आली नाहीं. अशा सामाजिक सभा चिरस्थायी नसतात, निरुपयोगी होतात, त्यांना योग्य बंधनें नसतात, सभेच्या शर्ती कोणीही सहज मोडूं शकतो, कांहीं नियम वर्णसंकरास कारणीभूत असतात व लोकांच्या गैरविश्वासास कारणीभूत होतात, इत्यादि प्रकारचे पुष्कळ आक्षेप सयुक्तिक होते व त्यांची यथायोग्य व समर्पक तोडजोड व्हावी तितकी एक विचारानें झाली ही मोठी आनंदाची गोष्ट होय या सर्व उत्तम व्यवस्थेचें श्रेय अध्यक्षाकडे आहे. अध्यक्ष या नात्यानें रावबहादुर जठार यांची वर्तणूक फारच वाखाणण्यासारखी होती. व पुढें या नवीन स्थापिलेल्या सभेचें काम चालविणोर गृहस्थ फार योग्य व अनुभविक आहेत. रा. रा. अण्णा साहेब महाजनी हे अध्यक्ष असून त्यांचे हाताखालीं रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर बी. ए. व रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल. एल. बी. हे उभयतां चिटणीस या नात्यानें सभेचें काम पाहणार आहेत.

शेवटीं आम्ही रावबहादुर जठार यांचे हा समाज उभारल्याबद्दल फार आभार मानतो. शाळाखात्यांतील इतर गृहस्थांच्या श्रमाबद्दल ही आह्मी ऋणी आहो. यावेळीं लोकांचा खोटा समज होऊं नये ह्मणून हेंही सांगणें अवश्य आहे कीं (त्या समाजांतील निदान एक नियम ज्यांस पसंत आहे व ज्याबद्दल त्यांनीं आपखुषीनें आपली सही दिली आहे तेवढ्यानेंच ते सभेचे सभासद समजले जातील.) एका नियमा पुरतां कोणी सभासद असेल त्यांस सभासदाचे सर्व अधिकार पोहोंचतील. दुसरी गोष्ट ही कीं सभासद होण्या विषयीं कोणावर जुलूम किंवा जबर दस्ती केली जाणार नाहीं व कोणी करून ही घेऊं नये. फक्त सर्वांनीं निरनिराळ्या सदरा खालीं सही करते वेळीं पूर्ण विचारानें शांततेनें आप्त इष्टांचा सल्ला घेऊन (अवश्यक असतील तेवढ्याच नियमांनीं स्वतांस बांधून घ्यावें व ते नियम चांगल्या कसोशीनें ईश्वरास स्मरून सर्वांनीं पाळण्यास झटावें अशी आमची त्यांना विज्ञाप्ति आहे) आतां आम्हास समजतें कीं वरील नियमापैकीं खुद्द अध्यक्ष व त्या वेळेस हजर असलेले पुष्कळ सभासद यांस पुष्कळ नियम कबूल होऊन त्या प्रमाणें त्यांनीं सह्या केल्या आहेत. कोणास कोणत्या प्रकारचे नियम कबूल झाले या बदलचें विस्तवार पत्रक करून प्रसिद्ध करण्याचा या सभेचा विचार असल्याचे दिसतें. आम्हांस हा त्यांचा विचार फार चांगला आहे असें वाटतें कारण कीं या सभेस जमलेल्या गृहस्थांच्या योग्यतेवरून व त्यांनीं कोणकोणते नियम केले हें समजल्यावरून ज्या लोकांस अशा प्रकारच्या सुधारणा कराव्याशा वाटत असतील परंतु ज्यांस अशा सुधारणेच्या कामांत सामील होण्यासाठीं योग्य मार्ग ठाऊक नसतील त्यांस हें पत्रक त्या कामीं चालण्यास चांगलें आधारभूत होईल.

---

इंडिया कौंसिल बिल मि. ब्राडला साहेबांनीं पार्लमेंट पुढें काढिलें आणि त्याचें प्रथम वाचन झालें ही मोठी आनंदाची खबर होय.

---

आयरलंडच्या लिबरल पक्षाचे पुढारी मि. पॉर्नेल यांचें घरगुती वर्तन अनीतीचें आहे असें कळल्यावरून मि. ग्लाडस्टन यांनीं पॉर्नेल साहेब अद्यापिही पुढारी राहतील तर आपण ग्लाडस्टोनियन लिबरल पक्षाचें आधिपत्य पत्करणार नाहीं असें प्रसिद्ध केलें आहे. मोठे लोक नीतीची थोरवी किती मानतात याचा हें उत्कृष्ट उदाहरण होय.

The Berar Samachar

MONDAY, DECEMBER, 1, 1890

## REPORT ON THE REVENUE ADMINISTRATION OF H. A. D.

We have been favoured by the Resident with a copy of the Report on the Revenue administration of the Berar Province for the year 1889-90, and we take this early opportunity of reviewing it. The Commissioner Mr. Plowden has prepared the Report; and the Resident at the outset of his order expresses his satisfaction that the report was submitted to him punctually and that the energetic Commissioner "has prepared so complete a report, and discussed in so satisfactory manner the various questions that present themselves, that Sir Dennis Fitzpatrick finds very little to add in the way of comment." We shall have therefore to see in the report the exhaustive treatment of the salient points of the Revenue Administration of the province. The report is no doubt very ably drawn, and interesting statistics are fully given in the appendices. But we must confess a feeling disappointment as to the meagre statements made in connection with such vital and important branches of the Revenue Administration as 'unculturable land in the para 11,' 'Advancement under the Land Improvement Loans Act in para 22,' survey and settlement in para 24,' and the 'Economic position of the agricultural classes and their mutual relations in the chapter VI of the Report.' At least on the question of the economic position of the agricultural classes, we and any one—would expect full and free opinion from the head of the executive government; but after going through the Report as carefully as the importance of the question would require, we regret we gather no sufficient data as to form a correct opinion as to the condition of the agricultural classes in the present, or as to their prospects in the future. In respect of other less important points, the report is full and exhaustive, and gives us in sufficient details the result of the administration. We regret the defect in the report mentioned above, and do so pointedly because we had expected Mr. Plowden, our present Commissioner of well known administrative ability would give in the Report— almost the only source of information to the public his views on the important points in the Revenue Administration.

The land revenue demand for the year under report was Rs. 6484716 against Rs. 6480995 in the previous year. Thus there was an increase of Rs. 3721 in the Government demand from the agriculturists. Adding to the land revenue, the miscellaneous collections and the education and jaglia and local cesses, the total demand revenue for the year was Rs. 6987909. Out of this sum only Rs. 103400 were outstandings at the close of the year. This sum of uncollected revenue is much below that of the preceeding year. One peculiar feature of the payment of the Government demand in the year is that of the sum of Rs. 1535848 due on account of the rabi instalment, Rs. 934889 were *voluntarily paid in advance*. This shows how people are careful to pay off the Government demands to avoid the coercive processes such as distraint of personal property and attachment and sale of fields. District officers, and particularly Tahsildars, are given a word of praise by the Commissioner for good administration *i. e.* for good collection of revenue in the year, and we only hope that the collection was not felt hard by the ryots. Under the head of alienations in perpetuity there is an increase of Rs. 10. but no remarks are made or information given as to whom and why the assignment of Rs. 10 in perpetuity was made, and we cannot agree with the Commissioner in thinking that the increase is "insignificant and calls for no remark."

Only a small sum of Rs. 20000 was assigned for the purpose of making loans to poor agriculturists for the improvement of land under the Land Improvement Loans Act, and of this small sum only Rs. 6550 were utilized. "The results therefore are worse instead of better than those of the last year." So remarks the Commissioner. One, who is acquainted with the deep poverty of agriculturists and a sad necessity of loans for the improvement of land, is simply amazed to see this paradoxical state. Are the agricultural people generally rich so as to stand above any necessity of seeking help from others for the improvement of land? Or do they prefer going to Marwadis—the village usurers and not to the Government for loans? We have often observed that if the Government would make this beneficient system of advancing loans to poor peasants a simple and quite an easy one within the reach of the people, a real boon would be conferred on the subjects and the government would be benefited and the people would become happy. In the year under report *i. e.* in 1889-90, only Rs. 6550 were advanced as loans to people in the whole province, while in the preceding year 1888-89 in Amraoti District alone Rs. 4500 were advanced. While this year Amraoti gets only Rs. 500. The Commissioner remarks as to this painful smallness of loans that it is clear to him that sufficient pains are not taken to make the provisions of the law and of the rules framed under it known to the people. No doubt this state of circumstances does account for the smallness of the loans. But we are of opinion— and we know many authorities agree with us— that it is not so much the ignorance as the machine-like stringency of the provisions of the law and of the rules under it, that deters the poor peasant from taking advantage of the well intentioned but ill prepared Government system and drives him to seek aid from the Marwadis. We are thankful to the Commissioner for asking the Deputy Commissioners to arrange with their Tahsildars to make the provisions of the law and the rules fully known; but we believe that the system ought to be first improved by removing the stringency of the provisions of the law and of the rules if the Government means really— and we know it does,— to help the ryots. We therefore appeal to the Commissioner on behalf of the ignorant and poor peasants to make this government system of advancing loans a real boon to the people.

---

The educational department is to be congratulated on the success that the 'Berar Educational Conference' instituted by the late Director Rao Bahadoor Dandekar, has been achieving gradually. The Conference is widening its sphere of action and is developing the mainfold resources of education. The broad and general views which it propounds in regard to primary and higher education form a clear index to the efficient progress of the institution. The bristling discussions that we had the pleasure to listen to were directed to suggest new means to smoothen the stern difficulties of educating the rising generation. We were in the full suing of convivial and

(See supplement.)

यंदा मुंबई युनिव्हर्सिटीच्या पहिल्या बी. ए. च्या परीक्षेंत ४०५ विद्यार्थ्यां पैकीं १६९ पसार झाले. त्यांत खालील पांच विद्यार्थी व ऱ्हाडांतील आहेतः—

मोरो केशव दामले, ( सेकंड क्लास ); मा. रो भिकाजी अगाशे, श्रीपत कृष्ण कोलटकर बळवंत यादव खोलकुटे, दिनकर नैराम वहाळकर

## वर्तमानसार

दुष्काळाचें चिन्ह. — होळकर शाईंतील नेमाड हद्दींत या वर्षी पर्जन्यवृष्टि फारच कमी झाल्यानें तिकडे दुष्काळाचे स्वरूप प्रगट होऊं लागलें आहे. नदी नाले अगदीं सुकून गेलें, ज्वारीच्या पिकास फारच धक्का बसला. कित्येक ठिकाणीं तर ज्वारीचें पीक मुळींच आलें नाहीं. तिळीचें पीकही यावें तसें आलें नाहीं. इतर धान्यें तर मुळींच आली नाहींत. रब्बीच्या पिकाची तर आशाच नाहीं. गुरास पिण्यास पाणी मिळेनासें झालें हें वर्ष कसें पार पडेल याची फिकीर तिकडील लोकांस उत्पन्न झाली आहे. दी० बं.

रावळपिंडी येथील अधिकाऱ्यांनीं पतंग उडविणें फौजदारी कायद्या प्रमाणें गुन्हा होईल असें ठरविल्याचें समजतें. पण ह्याला आधार कोणत्या कायद्याचा?

पोहणी — मुंबईतील दोनपारशी गृहस्थ तारीख २१ डिसेंबर रविवारीं घाटकुपर पासून ठाण्या पर्यंत १० मैल समुद्रांतून पोहत जाणार आहेत असें टा. इं० वरून कळतें

कोलंबो ( लंका ) मध्यें हिंदुधर्मोद्धार करण्यासाठीं एक मंडळी स्थापन झाली असून हिंदु धर्मोपदेशकांची व्याख्यानें सुरू करण्यांत आलीं आहेत.

रिझल्ट— सिव्हील एंजिनियरिंगच्या पहिल्या परिक्षेंत नवीन नियमा प्रमाणें ९ व जुन्या नियमा प्रमाणें ५ मिळून १४ पास झालें.

डेप्यु० एज्यु० इन्स्पेक्टर एका जिल्ह्यास पांच वर्षांहून अधिक ठेवूं नये असा बंगाल्यांतील विद्याखात्याचे डिरेक्टरांनीं ठराव केला आहे.

चिनांतील चाहाच्या व्यापाराचें अलीकडे धाबें बसल्यामुळें मोठाले व्यापारी धुळीस मिळाले. कित्येकांनीं आपलीं घरें दारें व बायका पोरें विकलीं व कित्येकांनीं प्राणत्याग केले असें समजतें.

मुंबई सेंट्रल बुक डेपोवरील क्युरेटर रा. सा. गुप्ते यांस होळकर आपले नायबदिवाण नेमीत आहेत असें समजतें.

लॉर्ड सालिसबरी ( इंग्लंडचे मुख्यप्रधान ) यांचे दोघे चिरंजिव रेल्वे लोकोमोटीव्ह खात्यांत इंजिनियरचें काम शिकून तयार झाले आहेत. नाहीतर आमच्या इकडचीं बडे लोकांचीं मुलें पहा त्याला तंबाखूच्या फक्या मारतां मारतां पुरेवाट होते.

पोष्टाच्या बनाऊ टिकिटा करणाऱ्या डाव्यास व सर्व त्याचे साथिदारास मुंबईच्या सेशनांत १०।१० वर्षें काळे पाण्याच्या शिक्षा झाल्या.

सोलापुरचे प्रसिद्ध वकील रा. सा. गणेश बाबाजी भाटे यांस काळपुळीनें देवाज्ञा झाली.

कोलंबो येथील तटबंदीच्या बचावाकारतां ४ प्रचंड तोफा तेथें येऊन दाखल झाल्या. स० शो०

अमेरिकेंत हवेंत चालवितां येणाऱ्या आगबोटी बांधणारी एक कंपनी निघाली आहे. तिचें भांडवल ५ कोट रुपये आहे. अमेरिकन लोकांची कमाल आहे!

लंडनमधील पैशाच्या अडचणीमुळें न्यूयार्क वगैरे कांहीं ठिकाणीं अमेरिकन कंपन्या बुडाल्याचें समजतें.

अमेरिकेंत सरकार विद्येकडे सुमारें १८॥ कोट पौंड सालिना खर्च करतें व युनायटेड किंगडम् ६॥ कोट पौंड; व लष्करी खात्याकडे अमेरिकन सरकार सारे ९॥ कोट पौंड खर्च करतें व युनायटेड किंगडम सुमारें २९ कोट पौंड !!!

फ्रान्स लष्करी खात्यांकडे सालिना सुमारें ३५ कोट पौंड या खात्याकडे खर्च होतो।

जयपुर संस्थानांत १०० मैल रेलवे करण्याचा विचार ठरला आहे असें समजतें.

बेरिंग ब्रदर्स कडून रशियन सरकारनें एक दम ५ कोटी रुपये काढले यामुळें इतका घोंटाळा झाला असें समजतें. बेरिंग ब्रदर्स कंपनीलाही सर्व ब्यांकांनीं मदत केली तेव्हां ती कं. संकटांतुन पार पडली. सु० प०

## महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळी.

### नियम

१. महाराष्ट्र भाषेंत, विशेषेंकरून ऐतिहासिक, चरित्रवर्णनात्मक, बोधपर, व इतर उपयुक्त विषयांवर सुलभ व मनोरंजक अशां ग्रंथांचा समूह वाढवावा हा या मंडळीचा मुख्य हेतु आहे. केवळ विद्याखात्याकारितां लागणारे ग्रंथ वाढविण्याचें काम ही मंडळी आपल्या अंगावर घेत नाहीं.

२. या मंडळींत असणाऱ्या गृहस्थांचे सभासद व वर्गणीदार असे दोन वर्ग केले आहेत.

३. सभासद व वर्गणीदार यांचे हक्क व कर्तव्यें सारखींच आहेत; मात्र प्रत्येक सभासदानें दरसाल अष्टपत्री साच्याच्या निदान पांच छापील पृष्ठांइतका लेख मराठी भाषेंत तयार करून मंडळीच्या चिटनीसाकडे पाठविला पाहिजे, व वर्गणीदारावर तसा लेख पाठविण्याची सक्ती नाहीं एवढा दोहोंमध्यें विशेष आहे. सभासदांनीं पाठविलेल्या लेखांत विषय अथवा त्याचा कोणता तरी भाग पुरा झाला पाहिजे.

४. प्रत्येक सभासदानें व वर्गणीदारानें या मंडळीच्या खर्चाकरितां दरसाल पांच रुपये चिटनिसास आगाऊ दिले पाहिजेत. जानेवारीच्या पहिले तारखेपासून डिसेंबरच्या ३१ व्या तारखेपर्यंतचे मुदतीस साल समजावें व जानेवारी व फेब्रुआरी महिन्यांत अथवा पटांत नांव दाखल झाल्यापासून दोन महिन्यांचे आंत आलेली वर्गणी चालू सालाकरितां आगाऊ समजावी.

५. कोणत्याही सभासदानें अथवा वर्गणीदारानें वर्गणी आगाऊ दिली नाहीं तर त्याचें नांव मंडळीचे पटांतून काढून टाकण्याचा अधिकार व्यवस्थापक सभेस आहे.

६. सभासद अथवा वर्गणीदार होऊं इच्छिणाऱ्या गृहस्थांनीं आपली इच्छा चिटनिसास लिहून कळवावी. व चिटनिसानें त्यांचीं नांवें मंडळीच्या पटांत दाखल करण्यासंबधीं व्यवस्थापक बहुमतानें जो ठराव करतील तो अमलांत आणावा व त्या गृहस्थांस कळवावा.

* मंडळीचे हल्लींचें जे व्यवस्थापक आहेत त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:—

( १ ) नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग— प्रमुख
( २ ) रा. रा. वामन आबाजी मोडक.
( ३ ) „ „ गणेश रामचंद्र किर्लोसकर.
( ४ ) „ „ लक्ष्मण रामचंद्र वैद्य.
[ ५ ] „ „ गोपाळ मोरेश्वर साठे.
( ६ ) „ „ रामचंद्र परशुराम गोडबोले.
( ७ ) „ „ गोविंद शंकर शास्त्री बापट.
( ८ ) „ „ विनायक कोंडदेव ओक.
( ९ ) रा. बा. विनायक नारायण भागवत
( १० ) रा. सा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते.
( ११ डाक्तर मोरेश्वर गोपाळ देशमुख.
( १२ ) „ भालचंद्र कृष्ण भाटवडेकर.
( १३ ) रा. रा. रामचंद्र गोविंद तळवळकर चिटनिस.

७. ' पटांत नांव दाखल झालें ' असें चिटनिस त्या गृहस्थांस ज्या सालीं कळवील त्या सालांपासून त्यांस वरील ३ व ४ कलमें लागू आहेत असें समजावें.

८. दक्षिणाप्राइझ कमिटीनें अथवा सरकारी विद्याखात्यानें नापसंत केलेले ग्रंथ, तसेंच छापून प्रसिद्ध झालेले ग्रंथ, ही मंडळी पुन्हां तपासणार नाहीं.

९. सभासदांनीं पाठविलेले लेख चिटनिसानें व्यवस्थापकांकडून किंवा ते ज्या गृहस्थांस परीक्षक नेमतील त्यांजकडून तपासून घ्यावें.

१०. पसंत झालेल्या लहान लहान निबंधांपासून अगर संपूर्ण ग्रंथांपासून पैशाचा लाभ करून घेण्यावर ग्रंथकाराची नजर नसेल तर ते चालू मासिक पुस्तकांत किंवा स्वतंत्र रीतीनें छपून प्रसिद्ध करण्याची योजना करण्याचा अधिकार व्यवस्थापक सभेस आहे. अशा प्रसिद्धी पासून फायदा झाल्यास त्याचा कांहीं भाग लिहिणारास पोंचविण्याचा अगर त्याची दुसरी व्यवस्था करण्याचा अधिकारही व्यवस्थापक मंडळीस आहे.

११. ग्रंथकाराची इच्छा असल्यास, तपासलेला ग्रंथ चिटनिसानें त्याजकडे पाठवून द्यावा व त्या ग्रंथासंबंधीं पडलेले अभिप्राय व झालेल्या सूचना संक्षेपानें अथवा तपशीलवार त्याजकडे व्यवस्थापक मंडळीचे सल्लयानें पाठवाव्या.

१२. ग्रंथकारास कळविलेल्या सूचना त्यानें अमलांत आणून तो लेख आपल्या खर्चानें व जबाबदारीनें छापविला व ग्रंथ छापण्याची पद्धति व त्याची किंमत व्यवस्थापक जी सुचवितील ती त्यानें ठेविली तर त्याच्या प्रती व्यवस्थापक सभेनें सवडीप्रमाणें विकत घ्याव्या.

१३. विकत घेतलेल्या ग्रंथाची एक एक प्रत प्रत्येक सभासदास व वर्गणीदारास पाठविण्याची तजवीज व्यवस्थापक सभेनें करावी.

१४. ग्रंथ पुरा होण्यापूर्वीं त्याच्या कांहीं भागा संबंधीं व्यवस्थापकांचा अभिप्राय घ्यावा असें ग्रंथकारास वाटल्यास त्यानें तो ग्रंथ चिटनिसाकडे पाठवावा ह्मणजे त्यास व्यवस्थापकांचा त्यावरील अभिप्राय कळविण्यांत येईल.

१५. सभासद खेरीज वर्गणीदार व इतर गृहस्थांकडून लेख लिहून यावे अशी मंडळीची इच्छा आहे. व त्यांजकडून लिहून आलेल्या लेखांसही वरील ८, ९, १०, ११, १२ १३, १४ हे नियम लागू आहेत.

१६. प्रत्येक ज्यानेवारी महिन्यांत या मंडळीची एक सभा भरवून मंडळीनें गत सालांत केलेल्या कामाची हकीकत चिटनिसानें तिजपुढें वाचून दाखवावी.

१७. जरूर असेल तर चिटनिसानें प्रमुखाच्या सल्लयानें मंडळीच्या विशेष सभा भरवाव्या.

१८. व्यवस्थापकांमध्यें ज्या जागा रिकाम्या होतील त्या मंडळीची वार्षिक सभा होई पर्यंत व्यवस्थापकांनीं भराव्या; परंतु कायमच्या नेमणुका त्या सभेमध्यें मताधिक्यानें व्हाव्या

१९. ह्या नियमांत फेरबदल करणें तो व्यवस्थापकांच्या सल्लयानें व मंडळीच्या सभेमध्यें मताधिक्यानें करावा.


## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

मुलुख अमानी हैद्राबाद यांतील अबकारी ( दारु, ताडी. अफू व गांजा ) विक्रीच्या तारखा सन १८९१-९२ सालाकरितां खालीं लिहिल्याप्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत:—

प्रत्येक हरास डिपुटी कमिशनर साहेबांचे कोर्टांत १२ वाजतां होईल.

उमरावती सोमवार ता. १९ जानुआरी १८९१
एलिचपूर सोमवार ता. २६ जानुआरी १८९१
आकोला सोमवार ता. २ फेब्रुआरी १८९१
बुलढाणा सोमवार ता. ९ फेब्रुआरी १८९१
वणी(यवत.)गुरूवार ता. १९ फेब्रुवारी १८९१
वाशीम सोमवार ता. २ मार्च १८९१

मक्त्याच्या व हरासांच्या शर्तींचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे आफिसांत मिळूं शकेल.

( सही ) टी. सी. होडन,
कमिशनर.

ADVERTISEMENT.

There is a vacancy in the Akola Municipal office of the post of Head clerk salary Rs 30 for two years Preference will be given to candidates who possessing a good knowledge of English and Marathi have experience of office account work and English correspondence. Candidates should apply to the undersigned before 15th December 1890.

Dated Akola 20-11-90.

Md. Husain
Secretary
A. M. C.


MR. HUME "ON THE PEOPLE'S CAUSE."

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा अगाऊ रु० ५ डाक हाशील ०।३
सहामाही ३ " " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास............................ ०४

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 a
Six monthly............3 " 8 as
Single copy............................................4as

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस ..........०१

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV — AKOLA MONDAY 8 DECEMBER 1890 — NO 47

वर्ष २४ — अकोला सोमवार तारीख ८ माहे डिसेंबर सन १८९० इ० — अंक ४७

## जाहिरात.

येत्या डिसेंबर महिन्याचे ता. २६-२७-२८ रोजीं कलकत्यास जी राष्ट्रीय सभा भरणार आहे त्या सभेस वऱ्हाड प्रांतांतून ज्या कोणास 'व्हिजिटर' (प्रेक्षक) ह्मणून जावयाचे असेल त्यानें आपलें नांव व पत्ता ता. १५ डिसेंबर १८९० चे आंत खाली सही करणाराकडे इंग्रजींत अगर मराठींत स्पष्टपणें लिहून कळवावा. व्हिजिटराची कांग्रेसहालमध्यें बसण्याची मात्र सोय होईल. बाकी तेथें राहण्याची व जेवणखाणाची व्यवस्था व्हिजिटर लोकांची होणार नाहीं.

उमरावती ता. २९-११-९० — बाळकृष्ण हरि करंदिकर वऱ्हाड स्थाइक (स्टँडिंग) कांग्रेस कमेटीचे सेक्रेटरी

## जाहिरात.

विक्रीस तयार.

**SAPKAR'SDIARY FOR 1891**

WITH A CALENDAR FOR 1892

**सापकरांची रोजनिशी सन १८९१ सालाकरितां.**

ह्यांत मराठी तिथी, वार, महिने सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी ऑफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौन्जीविवाहाचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा; रेलवे, तारायंत्र, स्टांप मनीऑर्डर्स पोस्ट, मुंबई व्यांकेच्या रुळी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतींचा, विशेष न्यायाचा दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्टफी पोलीस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल प्रोसीजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्ठक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरी पृष्टें जोडलीं आहेत.

रोजनिशीची किंमत. रु. हा.

प्रत नंबर १ ............०१२ ०२
प्रत नंबर २ ............०८ ०१॥
प्रत नंबर ३ ............०७ ०१॥

किंमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
'ज्ञानचक्षू' चे मालक.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ११ शके १८१२.

## सिंहावलोकन.

(४५ वे अं. पु. चा.)

आरंभीच्या सुधारकां कडून चूका झाल्या, जुन्यांनीं आपलाच पंथ हेकेखोरपणा करून कायम ठेवण्याचे प्रयत्न केलें व अगदीं अलिकडील सुधारक दोघांसही वाटाण्याच्या अक्षता दाखवून जुनें व नवें चाळणींत घालून चाळण्याच्या गडबडीस लागले परंतु ह्या तिघांच्याही प्रयत्नांत समेटीचा रोख कोठेंच दिसत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय. आपण ह्मणतो व वागतो त्याच प्रमाणें दुसऱ्यासही करवां आलें पाहिजेच असा सिद्धांत ठरविण्यांत केवढें नुकसान होत आहे याचा तीनही पंथातील लोकांनीं थोडा तरी विचार करणें रास्त होतें. काल देश वर्तमानाच्या मानानें समाज रचनेंत फेरबदल होणें स्वाभाविक आहे. आपलाच हेका चालवून असंतोष उत्पन्न करण्याचें पाप टाळवेल तितकें टाळणें इष्ट आहे, अंधपरंपरा चालत आलेल्या सर्वस्वी अहितकर चालींचा बीमोड करणाऱ्यांस अडथळा करणें वाजवी नाहीं, आपण कांहीं जरी केलें तरी घडून येणाऱ्या गोष्टीस प्रतिबंध करणें आपल्या शक्तिच्या बाहेर आहे व आपल्या अभिमानाचें रूपांतर हेकेखोर पणांत झाल्यास अपमान होण्याची भिती आहे. इत्यादि विचार आमच्या विचारी जुन्यांच्या मनांत शिरावयास पाहिजे होते. सुधारणेचे कट्टेअभिमानी जे उतावळे सुधारक यांनीं तरी विचारदेवतेचा कितो उपमर्द केला आहे बरें? आपण जें कांहीं करणार किंवा आपणास जें कांहीं करणें योग्य वाटत आहे तें करणें आपल्याला ज्यांच्याशीं व्यवहार कर्तव्य आहे व ज्यांच्या हिताकारितां तें करणें आपणास भाग आहे त्या लोकांच्या सम्मत्तीची अवश्यकता फार आहे. लोकांच्या डोळ्यांतलि कुसळाची काळजी वाहण्याचा अधिकार आहे असें समजणारांनीं आपल्या डोळ्यांतील मुसळाची सुद्धा काळजी न करणें म्हणजे एकंदर सर्व प्रकार थट्टास्पद आहे अशी लोकांची समजहोणें साहजिक आहे, स्वल्प दिसणाऱ्या परंतु भयंकर अशा उड्डाण मार्गाचें अवलंबन करण्यापेक्षां कदाचित कंटाळवाण्या परंतु निर्भय मार्गाचें अवलंबन करून शिखरास जाऊन पोहोचणें किती सुखकर आहे, 'तुरुतदान महापुण्य' मानणाऱ्या लोकांची संख्या आपल्या सारख्या संस्कृत झालेल्या मनाच्या लोकांपेक्षां किती पटीनें अधीक आहे अशा लोकांशीं गांठ पडली असतां पुढील काळावर नजर देण्यास त्यांस सांगणें अथवा पुढील प्रजेच्या हिताहिताकडे लक्ष पुरविण्याची त्यांस विनंती करणें ह्मणजे 'पालथ्या घागरीवर पाणी' ओतणें कीं काय, जबरदस्ती करून लोकांच्या इच्छेविरुद्ध कोणतीही सुधारणा अमलांत आणण्यापेक्षां ज्याचें त्यांस समजावून देण्यांत किती मजा आहे व अशी जर मजा असेल तर त्यांची मनें सुधारणेकडे वळतील अशी कांहीं तोड काढणें नुकसान कारक होईल कीं काय इत्यादि गोष्टींचा पूर्ण विचार उतावळ सुधारकांकडून व्हावयास पाहिजे आहे. ह्याच लोकांकडून जात वेगळी करण्याचें एक बंड निघालें होतें. व त्यांनीं खरीच उचल केली होती परंतु त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें घडून आलें नाहीं ह्याबद्दल देवाचे त्यांस आभार मानिले पाहिजेत. जात वेगळी करून आपल्यान पुढील पिढ्यास कायमचे संकटांत लोटून ठेवण्याखेरिज कांहीं एक फळ त्यांस मिळालें नसतें. ब्राह्मणाखेरीज अन्य जातींत असलेल्या परंतु ब्राह्मणांच्या निकट जातींची जी हल्लीं स्थिती आहे त्यापेक्षां अधिक सुखकारक स्थितींत ते लोक असते असें ह्मणतां येत नाहीं शिवाय समाजाची सुधारणा व्हावी हा जो ह्या सुधारकांचा उद्देद तो उद्देश तडीस जाण्यास फार कालावधि लागली असती, कारण, जाती बाहेर झालेल्या लोकांच्या रीतीभातीकडे समाजाचें दुर्लक्ष झालें असतें त्यायोगें नवीन जातीच्या सुधारलेल्या मार्गापासून सुखप्राप्ती काय आहे ह्याचा अनुभव घेण्याची संधी समाजास क्वचित मिळाली असती; शिवाय हल्लीप्रमाणेंच जातीबाहेर असलेल्या लोकांच्या उपदेशाकडे लोकांचें मन कधींही वळलें नसतें आणि ह्मणूनच इच्छित सुधारणास कालावधि लागली असती. समाजाचा संबंध तुटल्या कारणानें व समाजाव्यतरिक्त लोकांशीं निकट संबंध ठेवणें अनिष्ट वाटल्या कारणानें 'नाहिंदूनामुसलमान' अशा आमच्या जाती बहेरील सुधारकांची स्थिती झाली असती. व अशा स्थितीपासून उत्पन्न होणाऱ्या अडचणीचा अनुभव पुढील पिढ्यांस आला असता न स्वर्गस्थ झालेल्या सुधारकांस केलेल्या सुधारणेबद्दल बाक्षिसादाखल शिव्याशापांची रेलचेल उडाली असती. कित्येकांचें ह्मणणें आहे कीं, ख्रिस्ती धर्मानुयायांप्रमाणेंच त्यांची स्थिति झाली असती परंतु असें ह्मणतां येत नाहीं. ख्रिस्ती धर्माप्रमाणें कोणत्याही जातीच्या अथवा पंथाच्या लोकांचा सामावेश सुधारलेल्या जातींत करण्यांत आला असतां असें दिसत नाहीं कारण आमचे रावबहादुर ग्यान्या महाराशीं रोटीबेटी व्यवहार करण्यास राजी झाले नसते आणि ह्मणूनच जातीचा विस्तार होणें कठीण पडलें असतें. तेव्हां सिद्ध करावयाचें इतकेंच कीं, समाजाची सुधारणा करणें जरूर दिसत असेल तर त्याच्याशी तुटून रहाण्यांत फायदा नाहीं. तसेंच, त्यावर जुलम करण्यांत ही कांहीं अर्थ नाहीं. त्याच्याच तंत्रानें सामदामाच्या उपायांची योजना करून जर इह लोकीची यात्रा सुखकर होईल असा प्रयत्न चालू राहील तर समाजास हा हलकें हलकें आपलें अनुकरण करावें लागेल अशी पक्की खात्री ठेऊन सुधारकांनीं असावें.

बोलण्या प्रमाणें कृति वठण्यांत येत नाहीं असा एक आरोप सुधारकांवर मोठा जबरदस्त आहे. असा आरोप असणें मुळींच इष्ट नाहीं. ह्या आरोपाचें क्षालन झाल्या खेरीज त्यांस एकही पाऊल पुढें टाकण्यास येत नाहीं. बोलिल तसेंच चालणें महाकर्म कठिण आहे खरें, परंतु सुधारकांस तरी त्याचा काठिणपणा भासू नये. आपल्यावर लोकांचा विश्वास बसणें इष्ट असेल, सर्व मान्य होणें वाजवी वाटत असेल आणि गुरुत्व स्विकारण्यास पाहिजे असेल तर दुटप्पी वर्तणूक कांहीं एक कामाची नाहीं. प्रार्थना समाजाचे पूर्ण भक्त बनले असतां दुखण्यांत विष्णु सहस्त्र नामाचें पठण व कसोटीस लागण्याचा प्रसंग आला असतां आईबापांची सबब सांगून सुटून जाणें अशांच्या 'चरित्रांत' त्यांची कितीही स्तुति भरली असली तरी तिचा ठसा समाजावर कसा उमटावा?

(पुढें चालूं)

## लोकमत वृद्धि

वास्तविक पाहिलें तर राष्ट्राची सुधारणा व उन्नति होणें हें तेथील लोकांवरच अवलंबून असतें. राष्ट्रांत राहणाऱ्या लोकांचे लहाना पासून तो मोठ्यापर्यंत, सर्व जातीच्या व सर्व दरज्याच्या लोकांत जर मानसिक, शारिरीक व नैतिक सुधारणा होईल व त्यांचा तदनुरुप वर्तन क्रम चालेल तर त्यांची ऐहिक उन्नती होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं. परंतु अशी स्थिती फारच विरळा आढळते. कारण देश सुधारणा अगर सामाजिक सुधारणा अंमलांत आणणें व्यक्तिमात्राचें हातून होणें अशक्य असतें. लोकांना जों पर्यंत आपली स्थिति वाईट आहे असे वाटू लागलें नाहीं व त्यांना ज्या अडचणी व संकटें सोसावीं लागतात तीं आपल्या अज्ञानांधःकार, पूर्व जांनीं घालून दिलेला क्रम—मग तो आपल्या स्थितीला अनुसरून असो अथवा नसो—सुरू ठेवण्याविषयीं हाडांतून खिळून गेलेला दुराग्रह व आपल्या कांहीं निवळ चुकीच्या व वेडगळ समजुती या मुळेंच. अशी जों पर्यंत त्यांच्या मनाची खात्री होत नाहीं तोंपर्यंत सुधारणा— मग ती कितीही उपयुक्त असो—करण्या करितां व्यक्तीमात्राचे हातून होणारें

परिश्रमाचें चीज होणें कठीण आहे. तर मग सुधारणा व उन्नति होण्याचें वास्तविक व लोकमान्य साधन झटलें ह्मणजे लोकमत हें होय. व हल्लीच्या आल्या एकोणीसाव्या शतकांत तर ह्याची अत्यंत अवश्यकता दृष्टीस पडते. कारण हल्लीचा मनु फार बदललेला आढळतो. हल्लीं अशी स्थिती आढळते कीं लोकमता वांचून सुधारणेचें पाऊल पुढें जाणें असंभवनीय आहे. याचा प्रत्यय घेण्यास आपणांस जवळच उदाहरण आहे. पहा आपल्या इकडे हल्ली सामाजिक सुधारणे विषयीं आधुनिक शिक्षित मंडळींत किती चर्चा व चळवळी चालूं आहेत एवढेंच नव्हे तर विधवा पुनर्विवाह संबंधानें कायदाही पूर्वीं झाला आहे, तसेंच कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांचा परस्पर विवाह संबंध होण्याविषयीं शंकराचार्यां कडून मोकळीक ही मिळाली आहे. तर मलबारी व इतर समाज सुधारणेच्छु पुढारी मंडळींनां बिलकूल यश मिळत नाहीं. यांचें कारण पाहिलें तर लोकमताचा अभाव हेंच होय. जसें कित्येक आधुनिक शिक्षित पुरकर्त्यांनां ध्यानीं, मनीं, स्वप्नीं आपल्या अडचणी दिसतात व त्यामुळेंच सामाजिक सुधारणेचें पाऊल पुढें पडत नाहीं. असा जसा त्यांचे मनांचा पूर्ण ग्रह झाला आहे तसा मध्यम व कनिष्ठ प्रतीचे लोकांचा झाला नाहीं. म्हणून या कृत्यास लोकमत अनुकूल नाहीं असें आपण म्हटलें पाहिजे. जर आपण इंग्लंड देशाच्या राज्य व्यवस्थेचें सूक्ष्म दृष्टीनें पर्यवलोकन केलें तर आपणांस असें आढळतें कीं इंग्रज लोकांनां राजकीय, सामाजिक व धर्मसंबधी प्रकरणांत आपल्या हक्का प्रमाणें व त्यांना अविसंगत असणाऱ्या मता प्रमाणें वागण्याची जितकी स्वतंत्रता आहे तितकी युनाइटेडस्टेटस् शिवाय इतर कोणत्याही राष्ट्रांतील लोकांनां नाहीं. याचें कारण सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर लोकमत प्राबल्य हेंच होय. इंग्लंडच्या इतिहासा वरून असें स्पष्ट दिसून येतें कीं तेथील प्रजेला हळूहळू व महत्प्रयत्नानें जें स्वातंत्र्य मिळत गेलें. व तेणेंकरून लोकमताचा पाया उत्तम प्रकारें बांधला गेला तेंच त्याच्या उत्कर्षाचें कारण झालें. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं मत स्वातंत्र्य व तें मिळाल्यामुळें उदयास येणारें लोकमत यांची जी थोरवी आहे ती अवर्णनीय आहे. तें सर्वांशीं खरें आहे. ज्याप्रमाणें एखाद्या मनुष्यमात्रास वाचा नसली म्हणजे तो आपल्या पुष्कळ ऐहिक सुखाला अंतरतो त्याच प्रमाणें प्रजेची ही स्थिती आहे. जेव्हां राष्ट्रांतील प्रजेला आपल्यावर होणारा जुलूम उघडपणें सांगून तो दूर करण्याचीं साधनें असतात व राजा त्यांचीं दुःखें शांतपणानें ऐकून घेऊन तीं दूर करण्या विषयीं तत्पर असतो तेव्हांच तें राष्ट्र स्वतंत्र आहे व त्यांत लोकमताचें वर्चस्व पूर्णपणें बसलें आहे असें आपणांस म्हणतां येईल.

(पुढें चालेल.)

---

महाराणी सरकारचे प्रतिनिधी लार्ड लान्सडाऊन हे प्रस्तुत उत्तर हिंदुस्थानांत फिरत आहेत. उदेपूर, मेवाडकडील प्रांतांतून लाट साहेबांची स्वारी लवाजम्यासह मानपान घेत घेत पर्यटण करीत असतांना कांहीं ठळक ठळक गोष्टी नेटिव लष्करासंबंधानें प्रत्यन्तास आल्या त्या अशाः— लढाईच्या प्रसंगीं रजपूत लोकांच्या पलटणी अमोल आहेत; उदेपूरचे भिल्ल डोंगराळ प्रदेशांतील लढाईस फार उपयोगी पडतील व त्यांचा हात कोणा कडूनही धरवला जाणार नाहीं. मेवाडच्या लष्करामध्यें पांच फूट सात इंचाहून कमी उंचीचा शिपाई नाहीं ह्मणजे यांच्या तोडीचें अन्य लष्कर आढळणें मोठें कठीण होय. आणि हे रजपूत लोक लढाऊच निपजतात कां कीं एका दिवसांत पन्नास मैलांचा कूच करणें ह्मणजे त्यांना नित्य क्रमांतील गोष्टी वाटतात आणि कवायतींत त्यांच्याशीं सामना करणें झाल्यास नांवाजलेल्या इतर पलटणीची तारंबळ उडते. सारांश, हिंदुस्थानांतील आमच्या अशा बाणीदार शूर शिपायांचा आह्मांस मोठा अभिमान वाटतो आणि सर्व राष्ट्राच्या संरक्षणार्थ असलीं नेटीव लष्करें किती जरूर आहेत हें मनांत वागवून सरकारनें नेटिव राजेरजवाड्यांचा परामर्ष घेत असावें असें आह्मी सुचवितों.

---

प्रसिद्ध बाबू लालमोहन घोस यांस डेप्टफोर्ड येथील कांहीं मंडळीकडून विनंती करण्यांत आली आहे कीं त्यांनीं येत्या खेपेस पुन्हा एक वेळ डेप्टफोर्डच्या वतीनें पार्लमेंट मधील सभासद होण्यासाठीं उमेदवार म्हणून यावें. डेप्टफोर्ड येथील मतदारांचीं मतें सर्वांचीं सारखीं पडत असल्यास उमेदवार या नात्यानें दुसऱ्यानें आम्ही येऊं असा त्यांनीं उलट जबाब लिहिल्याचें समजतें. हिंदुस्थानातर्फे इंग्लंडांतील लोकमत बळावत जाण्या संबंधानें आमची मोठी निराशा आहे तरी वरील प्रकारचे कांहीं प्रयत्न सफळ झाल्यास आम्हांस अति आनंद होईल.

---

रुस देशच्या झारचे चिरंजीव हिंदुस्थान पाहण्यास येणार आहेत ही मोठी शुभवार्ता होय. रशियाच्या स्वारीच्या भितीनें आह्मी हा कालपर्यंत निरनिराळ्या करांच्या बोज्या खालीं चिरडून चूर होत आहों अशा समयीं झारचे चिरंजीव आमचे पाहुणे होणार आहेत हें ऐकून आम्हांस परम आल्हाद वाटतो. जबरदस्त सरकारच्या करासारख्या देण्यापासून आह्मी थोडक्यांत मुक्त होऊं असा विचार येऊन मनाला विसांवा वाटतो. परंतु त्याच वेळीं मोठी दुसरी भिती उत्पन्न होते कीं प्रस्तुत भेटीच्या सुखाच्या परिणामीं दुसरा कर बसेल. झारचे चिरंजीव ह्मणजे महाराणी सरकारचे बरोबरीचे भावी सार्वभौम आहेत आणि तें राणीसरकारचे पाहुणे या नात्यानें हिंदुस्थानची सफर करणार आहेत तेव्हां त्यांच्या आगमना प्रीत्यर्थ लक्षावधिपैसा खर्चीं पडेल व तो पडला ही पाहिजे असें सर्वजण कबूल करितील. लोक निर्धन आहेत त्या अर्थीं सुदाम्याचे पोहे समजून चिरंजीव मजकुरांनीं हिंदुस्थानाची भेट गोड करून घ्यावी हें थोरास उचित आहे व तें तसें करण्यास मार्गें घेणार नाहींत पण खरा प्रकार थोरांच्या कानावर घालणें कठीण आहे किंबहुना असाध्य आहे. अशा बिकट प्रसंगी चारचौघे करितील तसें आपण करावें अशी समजूत घालून निमुट बसणें भाग आहे. सहा महिन्यापूर्वीं खुद्द राणी सरकारचे नातू व्हिक्टर साहेब येऊन गेले आणि आतां रशियन सरकारचे चिरंजीव येणार आहेत. परस्पर राष्ट्रांच्या स्नेहभावानें भेटी होणें फार चांगले परंतु त्या भेटी कांहीं नेमस्तपणानें होऊन आटोक्यांतल्या असाव्या. ह्या सर्व गोष्टी आह्मी निरुपाय ह्मणून कबूल करूं व आलेला उत्सव साजरा करूं परंतु हें नवल नव्हे काय कीं इंग्लंडचा पाहुणा आणि हिंदुस्थानचा सर्व पाहुणचार! हिंदुस्थानावर सर्व खर्च पडत आहे म्हणून इंग्लंडच्या खजिन्यांतून कांहीं रकम खर्चीं घातली आहे असें पूर्वीं झालें नाहीं व पुढें होण्याचा संभव ही नाहीं!

---

इंग्रजी पत्रकारांची धूर्तता खरी कीं ते आपल्या गोऱ्या मनुष्याची वाहवा करण्यास सदोदित उद्युक्त असतात. याला ताजें उदाहरण टाईम्स आफ इंडियाचा वऱ्हाड शाळाखात्याच्या रिपोर्टांवरील लेख हें होय. वऱ्हाडातील शाळाखात्यासंबंधीं टाईम्स आफ इंडियाची आस्था पाहून लोकांस त्यांच्या थोरपणाबद्दल चांगलें वाटेल. परंतु इतकीं वर्षें टाइम्स पत्राला वऱ्हाड संबंधानें झोंप लागली असून चालूं सालींच जागृती येण्याचें कारण हें दिसतें कीं यंदाचा रिपोर्ट प्रोफेसर ब्यारेट साहेबांचा आहे. प्रोफेसर ब्यारेट यांची कारकीर्द लोकांस सुखावह झाली तेव्हां टाइम्सच्या म्हणण्यास आमचा अभिप्राय अनुकूळ आहे परंतु सांगावयाचें एवढेंच कीं रावबहादूर जठार यांच्या रिपोर्टां संबंधानें टाईम्सनें उल्लेख अद्याप केला नाहीं तर नाहीं पण या पुढें तरी त्या पत्रकारानें वऱ्हाडशाळा खात्याची माहिती लोकांस करून देण्याचें विसरूं नये. टाईम्सच्या कांहीं कोट्या खरोखर मौजेच्या आहेत रावबहादूर जठार एल्फिनस्टन कालेजचे ग्र्याजुएट आहेत तेव्हां त्यांच्या रजेंत एल्फिनस्टनचेच प्रोफेसर मि. ब्यारेट यांस डायरेक्टर नेमिलें ही व्यवस्था फार उत्तम झाली. बादरायण संबंध किती नामी जुळविला आहे.

महार, मांग, वगैरे क्षुद्र जातीवर शाळेमध्यें जुलूम होत असतो ही दुसरी गोष्ट टाइम्सनें नमुद केली आहे आणि महाराच्या मुलांचा नकाशा पाहतांना छळ होतो हें पाहून प्रोफेसर ब्यारेट यांस खेद वाटला असें ही लिहिलें आहे. तिसरी गोष्ट ही कीं वऱ्हाडांतील शिक्षणांत पोपटपंची फार दिसून येते व हें दूषण सर्वत्र शाळांतील शिक्षण क्रमास लागूं पडतें. हे दोन्ही मुद्दे वादग्रस्त आहेत त्या अर्थीं प्रस्तुत त्या विषयीं विशेष लिहावयास नको.

---

मद्रासचे गव्हनर लार्ड कानेमारा यांनीं आपल्या कामाचा राजिनामा दिला. लाट साहेबा सारख्या चतुर राज्यकर्त्यांवर ही पाळी गृहस्थिती संबंधानें आली. गोष्ट फार सुमार झाली. आपल्या पत्नीच्या दुर्वर्तना विषयीं साहेबांस वहिम आला व तिला ही पतीचें गुप्त परकन्यागमन कळून आलें आणि अखेरीस विलायतेंत सरकार दरबार होऊन घटस्फोटा पर्यंत गोष्ट येऊन ठेपली. थोर गृहस्थ वर्तनानें शुद्ध असतात असें लोक मानतात परंतु बहुत प्रसंगीं तेच लोक हा ग्रह खोटा करून दाखवितात. नवीन येणारे गव्हनर लार्ड वेनलाक हे गृहस्थ लिबरल पक्षाचे आहेत.

---

महामहोपाध्याय रामशास्त्री आपटे, बळवंत रामचंद्र नातु बाळ गंगाधर टिळक प्रभृति वैदिक, सावकार, व्यापारी वगैरे लोकांच्या तीन हजाराजवळ सह्यांचा अर्ज पुण्याहून सरकारांत गेला आहे कीं हिंदु लोकांच्या समाजा संबंधानें कांहीं सुधारकांच्या मताप्रमाणें कायदा सरकारनें पसार करूं नये कां कीं तो साधारण सर्व लोकांस अनर्थकारक होऊन सरकारचा कायदा करण्याचा चांगला हेतु सफळ होणार नाहीं. पुण्यास तुळशी बागेंत जंगी सभा भरली होती तेथील झालेल्या ठरावा विषयीं लोकांमध्यें मोठा वाद आहे. राष्ट्रीय सभे मागून सामाजिक सभा भरते तिनें बहुतेक गोष्टी आपल्या अधिकारा बाहेर केल्या व लोकांचा विचार निरनिराळे ठराव करतेवेळीं घेतला नाहीं असा मोठा आक्षेप सामाजिक सभेवर आला आहे. सरकार उभय पक्षांचे अभिप्राय ऐकिल्या शिवाय कोणताही कायदा लागूं करणार नाहींत अशी आमची खातरी आहे तेव्हां प्रस्तुत वऱ्हाडांतील मंडळीस कायद्या संबंधानें यत्किंचित ही मनांत संशय आणण्यास कारण नाहीं व नवीन स्थापिलेल्या ' वऱ्हाड सामाजिक सभे ' संबंधानें कोणत्याही प्रकरणांत भिती बाळगण्याचें लोकांस प्रयोजन नाहीं. एवढें सांगितल्या वर आम्हांस विशेष उहापोह करण्याची जरूर दिसत नाहीं. आमच्या ' सामाजिक सभे ' च्या पुढाऱ्यांचा व इतर सभासदांचा हेतु आपल्या आपल्या मधील होण्यासारख्या सुधारणा करण्या पलीकडे काडीमात्र नाहीं व त्यांच्या कामाचा सरकारशीं कायदा मागण्या संबंधानें किंवा अन्य गोष्टि विषयीं कांहीं एक संबंध नाहीं असें आम्हीं सर्वांस खात्रीनें कळवितों.

---

**The Berar Samachar**

MONDAY, DECEMBER, 8, 1890

## CONSTRUCTION OF SECTION 295 I. P. C.

The decision of the Calcutta High Court in Romesh Chunder Mitter vs. Hira Mundul, reported in Indian L. Reports Calcutta. Vol. XVII P. 852 is rather dangerous in its consequences. In this case, the Court has ruled that the word "object" in Section 295 I. P. C. does not include animate objects. With due deference to the opinion of the learned Judges we submit that the construction put upon the word object by the judges is wrong. There are many places of worship in India where animals are worshipped. The cow, the bull, the peacock and a few other animals are actually worshipped by their votaries. To say that a destroyer of a cow preserved in a place with no other object but that of worshipping does not render himself liable to the punishment provided for such an offence under section 295 I. P. Code is to nullify the essential object of the section. A bull dedicated to a temple is a sound animal. A bull let loose on a shradha ceremony, is certainly not so let that it may be destroyed by people. The purpose and intention with which a bull is let is that it is freed from the trouble and labour of serving mankind. The manes are saved from suffering in hell. The bull is regarded as sacred by pious Hindoos and any violence to it is, we know, doing something that is offensive to Hindoo notions and is likely to create a breach of the peace. The com-

mission of such an act completely fulfils the requirements of section 295 I. P. C. and the offender must be made liable to the punishment provided for in that section. The judgment of the High Court is unsound and fraught with dangerous results.

The movement for the protection of the cow is taking some shape in some of the Districts in the neighbourhood of Nagpur. The movement has been able to effect something towards regenerating the masses of Hindu society. Many a Mahar and many a Dhed have now come to be regarded as forming part and parcel of the Hindu society. Their aid and help is sought to further the objects of the movement and the testimony that they are said to bear of the good that is done to them by the leaders of the movement is well worth the attention from thoughtful persons. It is recorded that in the dim past Brahmins used to slaughter cows for purposes of food and that the abrogation of this practice is a growth of more recent times. If this be a fact and there is no reason to doubt its truthfulness, the alteration both in the ways of living and change of thought, indicates that all agricultural countries require the protection of the cow and encourage the breeding of bulls. During the Mahomedan period, agriculture was not so greatly encouraged as it is now. Devastation of the country was the rule of the day, but ever since the advent of the British numerous tracts of land are brought under cultivation and the necessity of having a larger number of bullocks is daily felt. The movement for the protection of the cow is nothing more than an expression of this demand. Instead of wasting our energies in vain attempts, it would be better if movements such as these are fostered and encouraged.

## FACTORY LEGISLATION FOR INDIA.

The Commission appointed to investigate into the necessities of a new law in laying down stringent regulations in regard to the labour of the workpeople, has submitted a long and memorable report to the government. The report presents in a nutshell all the points on the question of legislation and invites a careful and reiterated perusal. The government has not only to balance the arguments in the report but has to tally them with the various points that have been brought forth either in the Parliament or the speeches of able economists for the last six months. We insist on the government to consider more particularly the second phase of the discussion because they will have to view the matter from different stand points.

The question was in the beginning whether Legislation was to do good either to labourers, mill-owners or the government. It is no longer so. The problem is to decide whether legislation is for the good of India or Lancashire. The question is thus to run on party lines. It is a trite thing that India is not represented in the Council that makes laws. Law-makers must own that they are directed by the State Secretary in London. Mr. Mackay's speech at the St: Andrew's dinner at Calcutta is a key to understand how the State Secretary is moved to discuss new Factory Legislation for India. The Oldham deputation on Lord Cross urged upon him the need of stringent rules in Indian factory legislation with an assurance of their personal unselfishness and philanthropy. But Mr. Mackay is sceptical enough to entertain grave doubts as to the sincerity of their motives. Sir George Campbell asserts that the worst tribunal to decide questions between English interests and those of the Indian people is the House of Commons where one side is represented and the other is not. He further remarks that it curiously enough happens that the philanthropic gentlemen who in India actively move in the matter are invariably the representatives of English manufacturing constituencies to whom the Indian manufactures threaten rivalry. Mr. Mackay is an outspoken politician. He rightly connects the abolition of the Import duties on Manchester-goods with the uncalled-for suggestion of Factory Legislation. The abolition of import duties having failed to suppress Indigenous industries the next step is taken to hamper manufacturing in India by forcing government to introduce fresh factory legislation. In Lancashire itself the plough of philanthropy may be better plied with advantage than in India and let India care of herself till she makes further strides up the hill of perfection as in England.

What is one man's meat is another man's poison. What is Lancashire's philanthropy is India's curse. Industry in India is in growth and mill-owners and work-people settle their own points among them selves. Health, morals, and lives are not risked in manufacturing labour. Besides the interests of the people of the country as well as of the Europeans who have embarked capital in industry are at stake by the proposed legislation. If the government is brimming with sympathy and kindness Mr. Nusserwanji Sheriarji Jinwala from Broach has candidly requested the government to care for the starving millions than to mitigate the sufferings of the self-sustaining labourers in the mills. 'Work and wages' is the motto with the work-people and hard and over-work are preferred to hunger and starvation. Forty millions go through life without satisfying their hunger. Sir W. Wedderburn has remarked that they live so terribly on the verge of subsistence that one bad year or one failure of the periodical rains brings wholesale famine over great provinces. We find extreme poverty of the people. They are in the sore need of work. When the mill labourers are therefore well off in life and have never grumbled under their present circumstances the recent discussions are making them discontents with their tolerable condition by presenting florid and gaudy descriptions of life. Let all possible ameliorations be effected. Primary education is required for children but more of it is a misdirection to their energies and will render them unsuitable for the status in life to which they are born. The working hours are more or less nearer to the standard fixed by the International Labor Conference of Germany. Sundays should be allowed as days of rest. No fixed holidays can be laid down but they will continue to be granted as the different castes will require at the stated holidays in their own calendars. If Indian factories have been an engine of oppression to the working millions the mill-owners will also learn how to make their industry most easy and acceptable to the workpeople when they are threatened with a new factory legislation. The time has now come when we ought to make a decided stand against the gradual disposition to subordinate the interests of India to those of England. It is now an open secret that there is a great peril in the path of permitting the interests of India so palpably prostrated to the political party pressure in England. We shall therefore conclude in the words of Sir George Campbell:- 'let us have some home-rule for this country.'

---

Sir Lepel Griffin has appeared as one of the Anglo-Indian celebrities in the columns of the Times. He is truly described as something very short of a sovereign when he was in India. But we are not a little surprised when we read his present position represented as the most enviable. 'From the deadly dulness and depresing inertia of Native states he has plunged himself into the feverish atmosphere of English commercial life—from indicting solemn and weighty warnings to *contumacious princelings* he has passed to addressing persuasive harangues to meetings of not invariably friendly shareholders.' (The italics are ours.) We shall not take upon ourselves to say whether he enjoys the stirring atmosphere at present or feels pain at the remembrance of many a sovereign luxury. We urgently request all honest patriots to compel the writer of the quotation to point out the contumacious princelings to whom he refers in his flight of imagination. If there be any tis still doubtful that Sir Lepel Griffin was their saviour. The Amrita Bazar Patrika has done us immense good in showing to the world how Sir Lepel Griffin was a plague to all these contumacious princelings.

---

We are glad to state that Mr. F. J. Preston the Railway Engineer at Akola has been elected a member of the Bombay Natural History Society.

We also appreciate the taste of Col. Szczespanki in natural curiosities when he takes deep interest in the proceedings of the above society by contributing himself a skull of a wolf and that of a Chittah.

---

The Czarewitch with a suite of twenty officers will be the guest of His Highness the Nizam in the Aurangabad District from the 26th to 31st, December. During that period they will visit the caves of Ellora and Ajunta and the ort of Dowlatabad. T. I.

---

## वऱ्हाड

रशियाचे बादशाहाचे चिरंजीव येत्या २६ वे तारखेस निजाम सरकारचे राज्यांत दाखल होतील. पांच दिवस निजाम सरकार आगत स्वागत पूर्वक राजपुत्रास ठेऊन घेऊन वेरुळची लेणीं आणि आजिंठा व दौलताबाद येथील किल्ला हीं दाखविणार आहेत.

एल्फिनस्टन कालेजचे प्रिन्सिपाल प्रोफेसर वर्डस्वर्थ साहेब थोड्या दिवसांत स्वगृहीं विलायतेस पेनशन घेऊन परत जाणार आहेत अशा सर्वश्रेष्ठ विद्वान् गृहस्थांच्या स्मारका निमित्त आज पर्यंत ३०७२ रुपये १२ आणे गोळा झालें आहेत त्या मध्यें आमचे डायरेक्टर रावबहादूर जठार यांनीं पांचशे रुपये व इनस्पेक्टर रा. रा. अण्णासाहेब महाजनी यांनीं चाळीस रुपये व रा. रा. मुधोळकर यांनीं शंभर रुपये स्मारक फंडास दिले आहेत हें कळविण्यास आनंद वाटतो.

चालूं महिन्याच्या आरंभापासून आलिशान रेसिडेंट साहेब चंद्रघाटाहून प्रथम निजाम सरकारच्या प्रांतांतून फिरण्यास निघाले आहेत. स्वारींत साहेबांच्या बरोबर त्यांच्या कन्याही आहेत. औरंगाबाद मार्गानें फिरत फिरत सर डेनिस फिट्स्पाट्रिक इंग्लीच्या बाजूनें दिसेंबरच्या अखेरीस वऱ्हाडांत येतील.

आलिशान रेसिडेंट साहेबाचे वऱ्हाडांतील कूच तारीखवार कळले आहेत ते 'वैदर्भ' पत्रावरून आम्ही खालीं नमुद करितों:— ता. २६-२७ डिसेंबर वाशीम. ३१ डिसेंबर ते २ ज्यानेवारी—कारंजा. ता. ५-६-७ उमरावती. ता. ९-१०-११—एलिचपूर. ता. १३-१४-१५—चिखलदरा. ता. २०—दर्यापूर ता. २१ मुर्तिजापूर. ता. २४ बोरगांव. ता. २५ २६-२७—अकोला. ता. २८ रोजीं हैदराबादेकडे जाण्यास निघणार. सध्यापर्यंत हे मुक्काम बदलले नाहींत. यापुढें बदलतील तर माहीत नाहीं.

'वऱ्हाड वतनदार सभा' बहुमतें पसंत ठरल्यास आलिशान रेसिडेंट साहेबांस मानपत्र देणार आहे. या मानपत्रास कोणाचा प्रतिकूल अभिप्राय पडेल असें वाटत नाहीं. या पत्रावर कांहीं पंचवीस जणांच्या सह्या घेण्याचें योजिलें आहे या मुळें सर्व वतनदारांच्या सह्या घेण्याची नड सहजी दूर होईल. मानपत्रांत सभा स्थापिली तिचा उद्देश काय हें सांगून सभेच्या सूचनांचें चांगलें मनन करण्या विषयीं रेसिडेंट साहेबांस स्वागत पूर्वक विज्ञप्ति करण्यांत येणार आहे.

येथील सिव्हिल सर्जन डाक्टर रेली साहेब येत्या जानेवारींत सर्व धंद्याच्या लोकांस आवश्यक अशीं वैद्यका संबंधानें व्याख्यानें देणार आहेत असें लोकांस कळविण्या विषयीं त्यानीं इच्छा प्रदर्शित केली आहे. डाक्टर साहेबांचा हा उद्योग स्तुत्य आहे.

प्रमोद सिंधुवरून कळतें कीं माटुळी व यावली या दोन ठिकाणीं राष्ट्रीय सभेसंबंधानें सभा फार उत्तम झाल्या. लोक बरेच आले होते. नेर, शिरखेड व मोर्शी येथील सभा लवकरच होणार आहेत.

यवतमाळचे वकील रा. रा. महादेव गंगाधर दामले बी. ए. हे गृहस्थ गेल्या मुंबई युनिव्हरसिटिच्या एल. एल. बी. च्या परिक्षेंत पसार झाले हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो.

---

### नोटीस.

भगवान वल्लद सखाराम मुऱ्हे राहणार अठाळी तालुके खामगांव यांस नोटीस देणार बालु व संपत अज्ञान पालन करणार मातोश्री भागाई व बकाई मर्द चिनकाजी अडनांव डिकर राहणार अठाळी तालुके खामगांव नोटिशीनें असें कळविलें जातें कीं तुह्मांस आम्ही गेले साली कुलमुखत्यार नेमिलें होतें व तुम्ही कांहीं दिवस काम केलें पुढें आजपावेतो काम कांहीं करित नाहीं. याकरितां तुह्मांस असें कळविलें जातें कीं तुमचे मुखत्यारपत्र आज तारखेपासून आम्ही रद्द केलें आहे व जितके दिवस तुह्मी काम केलें त्याजबद्दलचा सर्व प्रकारचा हिशोब तुह्मी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत समजून द्यावा असें केलें नाहीं तर रितीप्रमाणें कोर्ट मार्फत तजवीज केली जाईल व अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान व खर्च लागेल तो सर्व भरून घेतला जाईल ह्मणून दिली नोटीस सही व आणखीही सर्वत्रास असें कळविलें जातें कीं आमच्या संबंधाचा कोणचेही प्रकारचा व्यवहार सदरहु मनुष्याबरोबर ठेवूं नये. ठेविल्यास त्याजबद्दलचे जबाबदार आह्मी नाहीं कळावें ता० ६।१२।९० इ०

(सही)

बालु व संपत वल्लद चिनकाजी अज्ञान पालन करणार भागाई व बकाई मर्द चिनकाजी डिकर अठाळीकर निशाणी खुद्द हातची

---

## वर्तमानसार

मुंबईपासून जबलपूरपर्यंत विजेची गाडी लौकरच सुरू करण्याचा सरकारचा विचार अ सल्याचें कळतें.

मिरजेहून बागलकोटापर्यंत एक रेल्वे फाटा नेण्याचा बेत चालला आहे.

रशियाचा बादशाहा इतका बळकट आहे कीं, पत्यांचा संबंध जोड ( ५२ पत्ते ) तो एकदम फाडतो! क० त०

डाकोटा संस्थानांतील सुमारें ३०,००० इंडिअन लोक दंगा करण्यांस प्रवृत झाले आहेत तेव्हां तेथील लोक भिऊन पळून जावयांस लागले आहेत.

बर्मिंघम येथील एका गिरणींत दररोज एक कोटी टांचण्या तयार होतात. सु. प.

शेतकऱ्यांच्या घरांत गुरेंढोरें, नांगराचें सामान व शेतकी संबंधी इतर आउतें काय काय आहेत याबद्दल खानेसुमारीच्या पत्रकांत माहिती असावी असें बंगाल सरकारानें हीं मागवावी अशी आमची सूचना आहे. शु.सू

रशियन राजपुत्र हिंदुस्थानांत येणार त्यांच्या तैनातीस ३ युरोपियन लष्करी हपिसर सरकारानें दिले आहेत.

सोलापूरच्या लोकांनीं नाम० केन साहेबांचें उत्कृष्ट आदरातिथ्य करून त्यांस आपल्या तर्फे कांग्रसचे डेलीगेट नेमिलें.

रामचंद्र चतरजी नांवाचा बाबू विमानांत बसून सु० ४००० फूट उंच गेला व तेथून उडी टाकून आपल्या विशाल छत्रीच्या योगें जमिनीवर सुखरूप उतरला.

फ्रेंच सरकारानें आपल्या लढाऊ जाहाजांवरही विमानें ठेवण्यास सुरुवात केली आहे.

निझाम सरकार मद्रासे सारखें एक मोठें पोष्ट हफिस बांधीत आहेत.

तंजावर, तीनेंवली, कर्नुल, चिंगलपट आणि मलबार ह्या प्रदेशांत अल्पवृष्टिमुळें लोकांवर भयंकर प्रसंग गुदरण्याची भीति सुटली आहे.

हिंदुस्थानांतील मजूर आफ्रिकेंत नेण्याची परवानगी इंपीरियल् इस्ट आफ्रिकन कंपनीनें हिंदुस्थान सरकारापाशीं मागितली आहे.

जगांत समुद्राखालून गेलेल्या तारा ९४२ आहेत.

युरोपांत आजमित्तीस लढाईस सिद्ध असें एकंदर १ कोटी १० लक्ष सैन्य तयार आहे!

टोळांनीं मूल खाल्लें— हुशारपूर जिल्ह्यांतील एका गांवांत टोळ झुंड येऊन बसली होती, ती हाकवून लावण्या करितां गांवचे लोक गेले होते. त्यांतच एक मनुष्य आपलें ६ महिन्यांचें मूल घरांत ठेवून गेलाहोता. तो घरीं परत येतो तों घरांत हातभर जाडीचा टोळांचा थर बसलेला त्याच्या दृष्टीस पडला व त्यांतच टोळांनीं खाऊन टाकलेलें त्यांचे मृत मूल सांपडलें! स. शो.

नोटीस

भगवान वल्द लक्ष्मण बाकळे राहणार मौजे सुकळी तालुके अकोलें यांस खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं अज्ञान तुकाराम वल्द रावजी राहणार मौजे सुकळी तालुके अकोलें याचें पालन करण्या बद्दल मी कोर्टांतून सरटीफिकीट मिळविलें असून अज्ञानाची सर्व जबाबदारी मजवर आहे. सदरहु अज्ञान संबंधानें अज्ञानाची चुलता सेंगाई मर्द सिताराम राहणार सुकळी हिनें अज्ञानाचें पालन करणार मीच आहे असें समजून तिनें अज्ञाना करितां आपलें सहीनें तुह्मास कुलमुखत्यार पत्र दिलें आहे. तुमची आज्ञांस जरूर नसल्यानें तुह्मांस दिलेलें सदरहु कुलमुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे. तुह्मी अज्ञानाचे मिळकतींत रीतीनें आतां हात घालुं नये कळावें. तारीख ४ माहे डिसेंबर सन १८९० इसवी.

सही

भावसिंग वल्द भिवसेन राहणार

शिर्से तालुके अकोलें

दस्तुर खुद.

नोटीस.

श्री. रा. रा. मारुतीसा भवानसा राहणार बाळापूर यांस खालीं सहीकरणार याजकडून असें कळविलें जातें कीं मी तुमचा सक्खा धाकटा बंधु आहे. वडील भवानसा यांस मरून आज सुमारें जवळजवळ ४ वर्षें होत आलीं. वडिलांचे मागें तुमचे माझे कोणच्याही प्रकारानें बनत नसल्या कारणानें तुह्मास यापूर्वीं दोनचार वेळी वडिलांचा व्यापार देवघेव, स्थावरजंगम, इस्टेट या सर्वांची वाटणी करून द्यावी असें सांगितलें परंतु आजपावेतों तुम्ही तसें केलें नाहीं. याकारितां तुह्मांस या नोटिशीनें असें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत चार भले लोक तुमचेकडील व मजकडील यांचे समक्ष वडिलार्जित व्यापार व स्थावरजंगम इस्टेट या सर्व जिंदगीची वाटणी करून करून द्यावी. असें न केल्यास अखेर निकाल होईपर्यंत जो खर्च वगैरे सर्व लागेल तो तुमच्या वाटणीच्या पैशांतून घेतला जाईल. व रीतीप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल. कळावें ता० ४-१२-९० सही

तुकाराम भवानसा बाळापूर दस्तुरखुद्द

नोटीस

रा. रा. माधवराव देशपांडे, गोविंदराव देशपांडे, जयवंतराव ( खेरडेकर ) तालुके मेहकर.

रा. रा. भाऊराव कारकून, व बापुराव कारकून तहशिल कचेरी मेहकर.

रा. रा. संभाजी वल्द बिंबाजी कुणबी, व रावजी सरप कुणबी, राहणार वाडेगांव. ता. बाळापूर.

रा. रा. फकिऱ्या भाजिपाल्या कुणबी व फकिऱ्या सुतार राणणार बाळापूर.

या सर्वत्रांत खालीं सही करणार यांजकडून असें कळविलें जातें कीं बाळापूर येथील भवानसा तुकसा यां नांवाचे दुकानाशी जो तुमचा व्यापार आहे तो आमच्या संमती शिवाय नोटीस पावल्या पासून पुढें कोणी करूं नये व या मागें जो व्यापार झाला आहे त्याचा निकाल वगैरे करणें तें सर्व आमचे संमती शिवाय करूंनये. केल्यास त्या बद्दलची सर्व नुकसानी रीतीप्रमाणें भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस कळावें., ता. ४ माहे डिसेंबर सन १८९० इसवी.

सही

तुकाराम भवानसा राहणार बाळापूर

दस्तुर खुद्द.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून असें कळविलें जातें कीं बाळापूर येथील भवानसा तुकसा यानांवाचे दुकानाशीं ज्या कोणाचा कोणत्याहि प्रकारचा व्यापार असेल तो आमच्या संमती शिवाय यापुढें करूं नये. व मागील झालेल्या व्यापाराचा निकाल हा आमचे संमती शिवाय करूं नये. केल्यास रीती प्रमाणें जबाबदार धरून नुकसान भरून घेतलें जाईल. हें सवत्रांस कळावें तारीख ४ माहे डिसेंबर सन १८९० इसवी

सही

तुकाराम भवानसा राहणार

बाळापूर दस्तुर खुद्द.

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याहो कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकारितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील वैं औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर

गौतमराव केशव, मुंबई.

## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात

मुलख अमानी हैद्राबाद यांतील अबकारी ( दारु, ताडी. आफू व गांजा ) विक्रीच्या तारखा सन १८९१-९२ सालाकरितां खालीं लिहिल्याप्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेतः—

प्रत्येक हरास दिपुटी कमिशनर साहेबांचे कोर्टांत १२ वाजतां होईल.

उमरावती सोमवार ता. १९ जानुआरी १८९१

एलिचपूर सोमवार ता. २६ जानुआरी १८९१

आकोला सोमवार ता. २ फेब्रुआरी १८९१

बुलढाणा सोमवार ता. ९ फेब्रुआरी १८९१

वणी(यवत.)गुरूवार ता. १९ फेब्रुवारी १८९१

वाशीम सोमवार ता. २ मार्च १८९१

मक्त्याच्या व हरासांच्या शर्तीचे संबंधची माहिती जिल्ह्याचे आफिसांत मिळूं शकेल.

( सही ) टी. सी. ह्वीडन,

कमिशनर.

ADVERTISEMENT.

There is a vacancy in the Akola Municipal office of the post of Head clerk salary Rs 30 for two years. Preference will be given to candidates who possessing a good knowledge of English and Marathi have experience of office account work and English correspondence. Candidates should apply to the undersigned before 15th December 1890.

Dated Akola 20-11-90.

Md. Husain
Secretary
A. M. C.

## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनीं | | | १००।॥– |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥ |
| सुवर्ण.... | २२॥ | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ८४ | उडीद | ६५ |
| गहूं काठे | ५७॥ | बनशी | ६७॥ |
| जवारी | ३४ | चणे | ६५ |
| सर्की | ३॥ | मोठ | ४०– |
| तूप | ७। | तेल | ४॥।= |

सट्याचे भाव

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत संवत | १९४७ | ४२। |
| गहू | वैशाखशुद्ध | १९४७ | ५७ |
| आळशी | चैत्रशुद्ध | १९४७ | ७९ |
| रुई | फाल्गुन शु. | १९४७ | ५७ |
| सर्की | व. नवें सालाची | १९४७ | ३॥।= |

☞ हें पत्र अकोला येथें कैं० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा अगाऊ रु० ५ डाक हांशील ०।१२
सहामाही ३ " " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास.......................०।४

मोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरें खेपेस .........०।१

per annum in advance 5 Postage 15 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8
Six monthly...........3 " 8 as
Single copy.................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV AKOLA MONDAY 15 DECEMBER 1890 NO 48

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १५ माहे डिसेंबर सन १८९० इ० अंक ४८

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शारिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा


## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. याने सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील र्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गौतमराव केशव, मुंबई.

## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन
तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी
अर्ध्या आण्याचें तिकिट
पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

येत्या डिसेंबर महिन्याचे ता. २६-२७-२८ रोजीं कलकत्यास जी राष्ट्रीय सभा भरणार आहे त्या सभेस वऱ्हाड प्रांतांतून ज्या कोणास 'व्हिजिटर' ( प्रेक्षक ) ह्मणून जावयाचे असेल त्यानें आपलें नांव व पत्ता ता. १५ डिसेंबर १८९० चे आंत खाली सही करणाराकडे इंग्रजींत अगर मराठींत स्पष्टपणें लिहून कळवावा. व्हिजिटराची कांग्रेसहालमध्यें बसण्याची मात्र सोय होईल. बाकी तेथें राहण्याची व जेवणखाणाची व्यवस्था व्हिजिटर लोकांची होणार नाहीं.

उमरावती
ता. २९-११-९०

बाळकृष्ण हरि करंदिकर वऱ्हाड स्थाइक ( स्टँडिंग ) कांग्रेस कमेटीचे सेक्रेटरी

## जाहिरात.

विक्रीस तयार.

### SAPKAR'SDIARY FOR 1891

WITH A CALENDAR FOR 1892

### सापकरांची रोजनिशी सन १८९१ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, महिने सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें,सणर, सरकारी ऑफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौन्जीविवाहाचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा; रेलवे, तारायंत्र, स्टांप मनिऑर्डर्स पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रुळी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्टफी पोलीस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल प्रोसीजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्ठक दिलें आहे. अखेरिस जमाखर्चाच्या सदराची व कांहीं कोरी पृष्ठें जोडलीं आहेत.

| रोजनिशीची किंमत. | ट. हा. |
|---|---|
| प्रत नंबर १ ............ | ०।१२ ०।२ |
| प्रत नंबर २ ............ | ०।८ ०।१॥ |
| प्रत नंबर ३ ............ | ०।७ ०।१॥ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यां येईल.

भाऊ गोविंद सापकर,
'ज्ञानचक्षू' चे मालक.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ४ शके १८१२.

## सिंहावलोकन.

( ४७ वे अं. पु. चा. )

एकंदर उलाढाली वरून आपणास असें सिद्ध करितां येते कीं, उतावळे, थंडे व मठ्ठ ह्या सर्वां कडून आपापले विचार योग्य ठरविण्याच्या प्रयत्नांत समाजाचा बोजवारा झाला आहे. आपलें मत स्थापित करण्याच्या आवेशांत जगन्मान्य चांगल्या गोष्टी वाईट व वाईट गोष्टी चांगल्या असें प्रतिपादन करण्यांस कोणासही शंका वाटत नाहीं. आपण कांहीं जरी केलें तरी समाज आपलें ह्मणणें नुस्तें ऐकून घेण्यास ही राजी होत नाहीं असें पाहून दुर्धारकांचे पित्त खळवळून गेलें व त्या सपाट्यांत सरकारची मदत निःशंकपणें मागण्यास ते तयार झाले. ह्याच सुधारकांच्या सुधारणा नेमस्त असत्या व त्यांचा स्विकार समाजा कडून झाला असता तर सरकाराची मदत मागण्याचा प्रसंग क्वचितच आला असता, व केवळ विरेस चढून आपलें करणे—कांहीं का उपायानें होईना – तडीस नेलेंच पाहिजे अशा असंतोष व अनर्थ जनक निश्चयाचें बीजारोपण आमच्या धुरी धरणे वाल्यांच्या अंतः करणांत कधींही झालें नसतें. त्याच प्रमाणें, प्रत्यक्ष अनुभव येत असतां व उदाहरणांनीं सिद्ध होत असतां आपल्यांतील गचाळ ठरलेल्या चालीस चिकटून राहण्याचा संकल्प—कांहीं नुकसान झालें तरी —आमच्या जुन्याच्या अभिमानी मंडळींनीं केला आहेसा दिसतो व ह्याचें कारण सुधारक त्या सोडून देण्यांस सांगतात हेंच मुख्य होय.

बरें तें सर्व असो! जें झालें तें सर्व ठीकच समजून सध्यांचा विस्खळीत पणा मोडून टाकून समाजास सुखकर असा मार्ग शोधून काढण्याच्या मार्गे सर्व सुधारणेच्छूंस लागलें पाहिजे ही गोष्ट खरी आहे. आपल्यास योग्य दिसणाऱ्या गोष्टीचें अनुकरण दुसऱ्यानें केलें पाहिजे अशी इच्छा बाळगणारांनीं आपलें ह्मणणें दुसऱ्यांस समजावून दिलें पाहिजे आपल्या गोष्टी पासून होणारे फायदे लोकांस दाखवून दिले पाहिजेत, जुलूम अथवा धाक हे उपाय जितके वर्ज होतील तितके फायदेशीर आहे हें विसरतां कामा नये, आपण जें सांगतो तें निवळ समाजाच्या हिता करितांच आहे. परकीयांच्या मर्जी करितां किंवा त्यांस खुश ठेवण्या करितां आपले प्रयत्न चालले नाहींत अशी समाजाची खातरजमा झाली पाहिजे, अंतःकरणाची खरी कळकळ दृष्टी गोचर झाला पाहिजे, आपल्यांतील दुर्गुणांस फाटा अगोदर मिळाला पाहिजे, सारांश समाजाचा आपल्यावर विश्वास बसेल व आपल्या इच्छित सुधारणांच्या बरें वाईट पणाचा त्यास विचार करण्याची ताकद येईल अशा प्रकारची व्यवस्था ठेवणें ह्मणजे, आपली नेकी कायम राखणें व समाजाकडून विद्यामृताचें प्राशन यथेष्ट करविणें ह्यांतच इष्ट हेतूचे फल प्राप्तीची गुरु किल्ली आहे.

सिंहावलोकनाचा हेतु राजकीय—कलाकौशल्य व व्यापार वरून—सामाजिक व धार्मिक सुधारणांचें विवेचन करण्याचा होता त्या प्रमाणें पहिल्या दोन सुधारणांचें विवेचन यथातथा कसेंतरी झालेंच. राहतां पैकीं धर्म सुधारणे बद्दल दोन शद्ब लिहून वाचकांची रजा घेतली पाहिजे. समाज सुधारणा व धर्म सुधारणा ह्यांची सांगड निकट आहे, हें नव्यानें सांगावयास नको. अडचणी न येतां एकदिलानें समाजा कडून संसारयात्रा सुखानें पार पडावी ह्मणून घालून दिलेले नियम. अशी छोटेखानी धर्माची व्याख्या करण्यास हरकत दिसत नाहीं. अलीकडे धर्मांत फेरफार करण्याचें लक्ष सुधारकांचें लागलें आहे. धर्म सुधारणा करणें ह्मणजे अलीकडील काळास अनुसरून त्यांच्यातील कष्टसाध्यपणा काढून टाकणें असा सुधारकांचा विचार आहेसा दिसतो व जुन्यांचा विचार तो अनादिसिद्ध आहे. ह्मणून त्याच्यांत फेरफार करणें जरूर नाहीं असें ठरविण्याचा आहे. परंतु दोघांच्याही विचाराची दिशा चूकत आहे असें ह्मणणें भाग पडतें. सर्व साधारण व्यवहार असा आहे कीं, ज्या संस्थांस नियमांच्या बंधनांत अडकाविलें त्या संस्था कष्टमय वाटूं लागणारच. स्वछंदानें वागण्याचा जो मनुष्याचा स्वाभाविक कल त्याला आडकाठी कधींही खपणारनाहीं परंतु ती ठेवणें भाग आहे. चांगलें वाईट, हिताहित, ह्यांचा बोध अज्ञानास धर्म द्वारा करून देतां येतो, नीतिमत्तेचा योग्यता धर्माच्या सहायानें लोकांच्या अंतःकरणांत ठसवून देतां येते, निवळ अंधवृत्ति धारण करणारानां धर्मा सारखा वाटाड्या दुसरा कोणी ही नाहीं. तेव्हां व्यवहारांतील गोष्टी सारखें धर्माला स्वरूप देण्याचा प्रयत्न करणें हितावह होणार नाहीं हें उघड आहे. ज्ञानी जनांस बरें वाईटाचा विचार करण्याची सवड असल्यानें व त्यांच्या नीतीस धक्का पोहचण्याची भीति फार कमी असल्या कारणानें व ईश्वरा विषयींचें ज्ञान त्यांस झालें असल्या कारणानें निरर्थक डाव पेचांत अथवा सव्य अपसव्यांत त्यांस कांहीं महत्व वाटणार नाहीं. परंतु धर्माची अवश्यकता आपल्यापेक्षां अशिक्षित व अज्ञान लोकांस फार आहे असें समजून जी ढवळाढवळ करणें असेल ती करा-

वीं. व्यक्तिमात्रा बद्दल नियम घालून देणें व सर्व साधारण नियम ठरविणें ह्यात जमीन अस्मानाचें अंतर आहे. तेव्हां कालदेश वर्तमान प्रमाणें फरक होणें हें जरी इष्ट आहे तरी दुरदृष्टी ठेऊन जें करणें तें केलें पाहिजे.

---

## जाहिर सभा

राष्ट्रीय सभेच्या सहावे समारंभास कलकत्यास अकोलें जिल्ह्याचे तर्फे प्रतिनिधी निवडण्यासाठीं आणि राष्ट्रीयसभे पुढें कोणकोणत्या मागण्या करावयाच्या तें ठरविण्यासाठीं परवा शनवार सायंकाळीं बैहिमनजी धर्मशाळेंत मोठी जाहिर सभा भरली. सभेच्या कामास ५ वाजून १५ मिनिटांनीं आरंभ झाला.

सर्वानुमतें रा. रा. पोपटलाल परशराम यांची अध्यक्षांचे स्थानीं योजना झाली. आणि अध्यक्षांच्या आज्ञेवरून रावसाहेब देवराव विनायक यांनीं बोलून दाखविलें कीं. राष्ट्रीय सभेच्या कामांत सरकारचे विरुद्ध कांहीं नाहीं व आपण राजनिष्टपणें सरकारास सतत मागण्या मागत राहिलों तर आपणांस यश येईल.

मागील सालीं अकोल्या जिल्ह्यांत काय काय काम झालें याची हकीकत कळविल्या नंतर खालील ठराव सर्वानुमतें पसंत झाला — आजपर्यंत राष्ट्रीय सभेनें केलेल्या मागण्या आह्मांस संमत आहेत. परंतु ज्याअर्थी कलकत्ता कमेटीनें यावर्षी राष्ट्रीय सभेपुढें कोणकोत्या बाबी यावयाच्या त्याजविषयीं टिपण पाठविलें आहे त्यांत कित्येक महत्वाच्या बाबी वगळल्या आहेत, त्या अर्थीं (१) जमिनीचा धारा कायमचा करावा (२) मिठावरील कर कमी करावा. (३) धंदे शिक्षणाच्या अधिक सोयी कराव्या. (४) हत्यारांची लायसन्सें सततची द्यावी असें मागणे सरकारास करण्याविषयीं राष्ट्रीय सभेस सुचवावें. दुसरा ठराव सर्वानुमतें झाला कीं रा० रा० पोपटलाल परशराम, पानाचंद नथुसा, देवराव विनायक व गोविंद विश्वनाथ हे गृहस्थ कलकत्यास अकोलें जिल्ह्याचे तर्फे प्रतिनिधी जातील. शिवाय वेळेवर अडचण येऊं नये म्हणून गोपाळदास नारायणदास आणि दत्तात्रय विष्णू भागवत या उभयतांस प्रतिनिधी नेमिलें आहे.

तिसरा ठराव लोकांनीं पसंत केला तो हाकीं अकोलें जिल्ह्यांत राष्ट्रीय सभेचें काम करण्यासाठीं खालील गृहस्थांची मंडळी निवडावी—देवराव विनायक, शंकर गोविंद, जयकृष्ण बगाजी, गोविंद विश्वनाथ, व्यंकटराव मुधोळर, व्यकटराव देसाई पांडुरंग बापुजी, हरि रामचंद्र अणवीकर, सोराबजी मंचरजी, जुमानी दत्तोपंत भागवत, रामराव गोपाळ, मारुती राघव, रावजी राघव, गोविंद पंढरीनाथ, त्रिंबक वामन, पोपटलाल, गोपाळ गोविंद, गोपाळदास, पानाचंद आणि भगुसिंग

वरील मंडळीपैकीं पहिल्या सातजणांची व्यवस्थक मंडळी नेमली जाऊन त्यापैकीं दोघे हजर असले ह्मणजे काम चालविण्यास अधिकार असावा असें ठरलें. अखेरीस अध्यक्षांचे आभार मानल्या नंतर राणी सरकारच्या नांवाचा व राष्ट्रीय सभेचा जयघोष चालला असतां पानसुपारी होऊन सभा विसर्जन झाली.

---

वऱ्हाडांतून इतर जिल्ह्याचे वतीनें कलकत्यास राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी जाणार आहेत त्यांची जिल्हेवार नांवें येणें प्रमाणें:—

यवतमाळ— लक्ष्मण चिंतामण बापट वकील, सदाशिवराव चिंतामण देव आणि जरूर लागल्यास महादेव गंगाधर दामले बी. ए एल. एल. बी.

वाशीम —लक्ष्मण आत्माराज महाजन व शंकर गोविंद.

इलिचपूर— गणेश नागेश वकील व बापुराव महादेव पेणसे.

बुलढाणा— गुलाम अहमदखान सौदागर.

उमरावती— गोविंद नारायण काणे, विश्वनाथ काशिनाथ काळे, प्रल्हाद नारायण जोग. किंवा यांच्या गैरहजरींत अंताजी गोविंद वकील व सरदारसिंग केसरसिंग.

---

वऱ्हाड सार्वजनिक सभे तर्फे गेल्या सहावे तारखेस राष्ट्रीय सभेसाठीं प्रतिनिधी निवडले गेले ते गृहस्थ गणेश श्रीकृष्ण खापर्डे व रंगनाथ नरसिंव्ह मुधोळकर हे असून यांचे गैरहजरींत वासुदेवराव जोग व शिवाप्पा गुराप्पा यांस नेमलें आहे.

---

राष्ट्रीय सभेचे मुख्त्यार निवडण्या साठीं जिल्ह्या निहाय मोठमोठ्या सभा भरल्या त्यावेळीं सरकारांतून यत्किंचित् योग्य मदत ही न मिळतां व कोणत्या ही प्रकारें अटकाव न होतां लोकांनीं आपापलीं कामें निर्विघ्नपणें तडीस नेलीं. सरकारी चाकरांनीं राष्ट्रीय सभेच्या कामांत हात घालूं नये त्या प्रमाणें कोणी घातला नाहीं. तशांत या नियमा संबंधानें अंमलबारी होण्या विषयीं आमचे डेपुटी कमिशनर मि. निकोलेट फारच फार दक्ष असल्या मुळें आम्हास कांहींएक शंका राहिली नव्हती. 'सरकारी चाकर' या नांवा खालीं वस्तुदृष्ट्या जे कोणी देशमुख वगैरे गृहस्थ येत नव्हते त्यांस ही साहेबांनीं सामील केलें आहे त्या बद्दल आम्हांस वाईट वाटतें. कांहीं जण सरकारी चाकर आहेत किंवा नाहींत अशा विषयीं लोकामध्यें मोठा मतभेद आहे त्या संबंधानें आम्हास असें वाटतें कीं निकोलेट साहेबांच्या कडून या जिल्ह्यांतील राष्ट्रीय सभेच्या व्यवस्थापक मंडळीनीं वरिष्ट सरकारांतून नीट खुलासा करून घ्यावा व असें करण्यास डेपुटी कमिशनर सारखे अधिकारी व्यत्यय आणणार नाहींत असा तर्क आहे.

परवां शनवारीं जाहिर सभा टोलेजंग भरली होती सुमारें हजारावर लोक जमले होते. सभास्थान फार रमणीय केलें होतें. ही जागा सुशोभित करते वेळीं मोठमोठ्या लोकांनीं सामान्य कामें ही करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे. लोककार्या साठीं कांहीं काम असो तें करण्यांत कमीपणा नसून मनाच्या मोठेपणाचें दर्शक आहे असा कित्ता रावसाहेब देवराव विनायक प्रभृति गृहस्थांनीं घालून दिला आहे तो सर्वांनीं कळविण्यास झटावें असें आम्ही सूचवितों. अकोले जिल्ह्यांत राष्ट्रीय सभे साठीं मनोभावानें झटणारी मंडळी कोण कोण आहे हें पाहणें असल्यास दुसरी कडे व्यवस्थापक मंडळीची यादी दिली आहे ती वाचल्यास कळून येईल. यादी पलिकडे कांहींजण प्रमुख आहेत परंतु त्यांचीं नांवें निरनिराळ्या कारणा साठीं बाहेर सांगता येत नाहींत आणि प्रसंगोपात आवश्यक वाटल्यास योग्यवेत अनुरुप आणखी कित्येक लोकांचे देशसेवे प्रीत्यर्थ होणारे परिश्रम आम्हीं सर्वांच्या दृष्टी समोर आणण्यास सदोदित उद्युक्त आहों. राजकीय उन्नती साठीं सर्व वऱ्हाडांतून कोण कोण गृहस्थ कळकळीनें भिन्नाभिन्न प्रकारें उद्योग करीत आहेत हें नांवनिशीवार सांगता येणार नाहीं. व तसला प्रयत्न केल्यास पुष्कळ चांगले चांगले लोक वगळले जाण्याची मोठीच भिती आहे ह्मणून आम्ही त्या सर्वांचे राष्ट्रीय सभे निमित्त होणाऱ्या अव्याहत मेहनती बद्दल फार ऋणी आहों आणि सरकारी नेटीव चाकर ही आमच्या या मंडळीच्या उद्योगानें चाकर या नात्यानें व रयत या नात्यानें राजकीय गोष्टीत अनेक तऱ्हेनें सुख पावणार आहेत तेव्हां ते सर्वजण या सत्कृत्याबद्दल कृतज्ञ राहतील असें आम्ही इच्छितों

या जाहिर सभेनें केलेल्या कामाचा अलाहिदा उल्लेख झाला असल्यामुळें फक्त सभेंत बोधपर व मुद्देसूत भाषणें झालीं त्याविषयीं कांहीं भाग राहिला आहे. प्रथम अध्यक्षांच्या वतीनें रावसाहेब देवराव विनायक यांनीं बोलतांना व्यक्त करून दाखविलें कीं आपण महाराणी व्हिक्टोरिया सारख्या न्यायी व महाप्रबल राजाची प्रजा आहों. त्या अर्थीं अंधप्रवृत्तीच्या राजनिष्टेला झुगारून देऊन भाग्यशाली कुंटुंबांतील व्यवस्थे प्रमाणें राजाचे नियम पाळावे व जे सुखावह नसतील ते तसें होण्याविषयीं राजाच्या सल्ला मसलतीनें तोडजोड काढून सुधारणा करीत असावें त्या प्रमाणेंच राष्ट्रीय सभेचा पुर्ण संकल्प आहे व सतत उद्योग चालू ठेवल्यास कालावधीनें चांगलें यश येईल कुत्सित लोकांच्या तोंडीं लागण्यास सवड नाहीं व आपल्या प्रस्तुतच्या निर्दोष वर्तनानें सरकारची इतराजी होणार नाहीं अशी पूर्ण खातरी आहे. राष्ट्रीय सभेंत बंडावा नाहीं, आम्ही राजरोज जाहीर सभा भरवून आपल्या कामाची पत्रकें, पुस्तकें वगैरे सर्वांस फुकट वाटून प्रयत्न करीत आहों तेव्हां सर्व गोष्टी अधारांत, आंतून नानातऱ्हेच्या खोट्या नाट्या गोष्टी सांगून होत नसतांना व आमचीं निशाणें, बावटे, पताका फडकत असतांनां परमेश्वर यश देईलच देईल फक्त मनुष्यास हयाती, हिम्मत ही असून देशसेवा करण्याची इच्छा असली ह्मणजे पुरें.

नंतर रा. रा. पांडुरंग बापूजी यांचें बोलणें वऱ्हाडी चालीवर मनोरंजक झालें. त्यांच्या भाषणांतील तात्पर्य असें कीं मुलगा तीर्थरूपाला कळवितो त्याप्रमाणें सरकारला आपली हालहवाल कळविणें आहे. आपल्या खातरजमेचा जसा वकील लागतो त्याप्रमाणें राष्ट्रीय सभा आपल्याला आहे व याच मुखानें लार्ड क्रासचें बिल थोपविलें गेलें. गत वर्षी अकोले जिल्ह्यांत ४७ जाहिर सभा ६ भोजन पार्ट्या वगैरे अनेक उपाय योजिले गेले त्याअर्थी पंढरीच्या यात्रेच्या गोष्टीप्रमाणें राष्ट्रीय सभेच्या गोष्टी लोकांनीं काढिल्या तर लक्षावधि लोकांस माहिती होईल. सभा शिवाय घडा कोणी काढीत नाहीं तेव्हां आपल्यास हजार रुपयेपर्यंत खर्च झाला आहे तरी विलायतेला दवड पंचेपर्यंत दम धरून कार्यभाग साधला पाहिजे. सर्व जातीचे, व धर्मांचे लोक आपण एकत्र आहों. आपले हेतू सरकार विरुद्ध नाहींत. सरकारी अंमलदार रयतेमध्यें शांतता राखतात व आपण रयतेच्या सुखसाधनासाठीं झटत आहों. लोकाच्या दिलाचा खोटा बहिम असतो व सरकारनें हेपाड्या रीतीनें राष्ट्रीय सभेविषयीं विचारले ह्मणजे नाबूद माहीत नाहीं ह्मणतात हा विश्वासघात होय. तीस चाळीस कोसावरून मोल्याच्या कणसा वाणी लोक आले आहेत त्यांचे आभार मानतांना भाऊपणाचें नातें कायम राखून एक दिलानें सर्वांनीं वागावें असें वक्त्यांनीं सांगितलें.

त्यामागून मोठें भाषण रा. रा. गोविंद विश्वनाथ यांचें झालें. त्यावेळचें त्यांचें आवेश युक्त बोलणें सभेतील मुख्य विषयावर असल्यामुळें सर्वांस माहिती चांगली कळून आली. कायदे कौसिलांतील उणीवी दूर करण्या कडे सभेचा विशेष भर आहे, योग्यतेप्रमाणें नेटीवास मोठमोठ्या जागा मिळाव्या तशा मिळत नाहींत तेव्हां सरकारास जागृत केलें पाहिजे; अबकारी खात्याचें उत्पन्न वाढवितात तेव्हां सहजीं दारू पिणारे ही वाढतात. हा विपरीत परिणाम बंद केला पाहिजे कायमच्या धाऱ्या प्रमाणें महत्वाच्या गोष्टी अवश्यमेव सूचविल्या पाहिजेत, इत्यादि गोष्टी प्रतिपादून राष्ट्रीयसभा पाहिजे किंवा नको असा प्रश्न वक्ता मंडळीस करी त्या वेळचा 'पाहिजे' 'पाहिजे' असा सर्वत्र जयघोष ऐकून गोविंदरावजीस ही समयस्फूर्ती येऊन भाषण फार अल्हादकारक झालें. या भाषणास पूर्ण अनुमोदन देतेवेळीं रा. रा. रामरावगोपाळ हे फार थोडावेळ बोलले तरी भाषणांतील वाक्यरचना व मुद्दे हीं श्रोतृ मंडळीस फार आवडलीं.

अखेरीस अध्यक्षांच्या वतीनें रावसाहेब देवराव विनायक बोलले. त्यांच्या ह्मणण्यांतील सारांश हा कीं कुटुंबातील प्रत्येकास इच्छिलेल्या गोष्टी सहजीं मिळत नाहींत असा अनुभव आहे त्या अर्थीं हिंदुस्थानच्या पंचवीस कोट प्रजेच्या एका कुटुंबांतील गोष्टी संबंधानें आपला प्रयत्न चालला आहे तेव्हां सर्वांनीं विचार पूर्वक धीरावीरानें प्रयत्न सतत साखा ठेविला पाहिजे. Anti-corn League संबंधानें विलायतेंतील लोकांचा महदुद्योग कित्येक वर्षें चालला होता तेव्हां यश आलें. विलायतेंत ज्या गोष्टी शेंकडो वर्षें भांडून व रक्तपात होऊन साध्य झाल्या त्या आपणास आज मितीस फार सुसाध्य आहेत. आपली सामुग्री तयार असून स्वयंपाक ही सिद्ध आहे फक्त पुढील व्यवस्था मांडमांडणावळ वगैरे राहिली आहे. ऋषिऋण, देवऋण, पितृऋणा प्रमाणेंच किंबहुना अधिक महत्वाचें स्वदेश भूमीचें ऋण प्रत्येकांवर आहे तें मनुष्यमात्र यथाशक्ति. फेडील त्या प्रमाणें तो इश्वराजवळ रुजू होईल.

या वेळची बाबा साहेबांची ती उदात्त मूर्ती, त्यांचा गंभीर आवाज, मध्यंतरी थकल्या मुळें कोंता पडलेला स्वर लोकांस, कळकळीनें सांगितलला बुद्धीवाद, आणि शेवटीं आर्यभूमीचें ऋण फेडण्यासाठीं यावज्जन्मरण त्यांचा निर्धार

हीं पाहून एकदम ऐकणाऱ्यांच्या मनांत नाना विकारांच्या स्फूर्तीं येऊन होणाऱ्या आनंदाचा देखावा फार हृदयंगम होता.

The Berar Samachar

MONDAY, DECEMBER, 15, 1890.

We acknowledge with thanks the receipt of the report on the Local Funds of the Hyderabad Assigned Districts for the year 1889-90. The report was, according to the fixed dates for different annual reports, due within the first week in June; but the Commissioner has requested the Resident to make different arrangements as regards the date of its submission. There are some new improvements in regard to the method of the general report. The report has given a clear and definite view of the way in which the Local Funds both incorporated into & excluded from the imperial revenue, are spent on works of public utility. The recent introduction of the District Boards in Berar changes the administration of these funds from one institution to another. In fact the District Boards will be generally the managers of these funds and will have therefore to submit their own reports before that of the Local Funds is prepared for the Resident's review. The present report has effected the following changes:—

Up to this year the Commissioner used to submit three separate reports— (I) on Local Fund administration, (2) on Local Fund works, and (3) on grants and expenditure from the one per cent assignment of land revenue. But as it was found that this arrangement entailed considerable superfluous labour, it was decided to amalgamate the first two reports into the present form, the third being submitted separately, because the one per cent assignment was a provincial and not a local fund. Owing, however, to the institution during the year under review of District Boards in all districts except Wun, and owing to recent instructions received from the Government of India on the subject of the one per cent assignment further alterations will have to be made. Stated briefly the arrangement will be that, according to the rules framed under section 33 of the Rural Boards Law, District Boards will submit reports on the administration of all funds under their control, including the one per cent assignment, which, under section 22 of the above law, has lost its provincial character and been incorporated in the District Fund. Further instructions, will, however, be issued on this point, and also on the subject of the report to be submitted for the Wun district.

The report is a complete statement in itself. The few suggestions the Resident has made in addition to the casual comments on the minor portions of the general working of the Local Funds have done our work. We intend to summarize the salient points in the report in our next number.

MR. HUME "ON THE PEOPLE'S CAUSE."

(Continued from our 45th issue.)

Now this is exactly the way our shortsighted electors— electors belonging to the people, go off along with their natural opponents the classes, go off to join and aid and support those who, were their insight a little clearer, they would recognise as their antagonists.

But there was a difference. These cavalry men were mutineers— rebles against the authority of our beloved Queen— Queen- Empress they now call it, but I can't say I like the change; I want a good British Constitutional King or Queen none of your German and Austrian and Russian Emperors and Empresses— I don't like the breed. But, I say though they were mutineers against the Government of the Queen, they were not lost to a sense of honour; and when they realised the mistake Stack was making, one of the native officers saluted and said, "You must not come with us, Sahib. We have mutinied. We would not hurt you, but who can say what some of those people there may do? You must go back, Sahib. You must go back to your own people, where you will be safe."

Ah! my friends, such honour was to be found amongst Indian mutineers, but when do these Tory mutineers against the Government of the People rise to such a pitch of chaivalry? When do you find them thus warning the ignorant and unsophisticated yokels who in their short-sightedness are straying into their camp? When do you find them saying to these heedless lamps of the people who are wandering into the pack of the wolves: "Go back, go back to your own people, where you will be safe!"

As for Stack, when he did join us, and we said "Where the dickens have you been?" he only gave an extra screw to the glass that always nestled in his right eye and said, "Well, you see, I went off with the wrong fellows."

Now that is what so many of our people's voters always are doing in their short sightedness, and this is what you have to prevent. Don't, any more, let them go off with the wrong fellows. Make it your business, hold it to be your most sacred duty, to see that they only go off with the right fellows, and stick to their own people.

But there is a second class of our brethren, who, though not shortsighted like these, still equally take the wrong side. These are the "puir feckless bodies" that have not the courage of their convictions. There are the shopkeepers who are afraid of losing custom; and the innkeepers and stablemem who fear that the gentry would not put up their horses with them; and the farmers who fear that they may be troubled about their land; and the labourers who fear they would lose some jobs; and half a dozen other groups of people, who, for some private personal gain, or from fear of some private personal loss, are false to the land that bore them, to their kith and kin and the comrades of their life-time— aye, false to their own better natures and their consciences, and go and vote with the Tories and against their own side.

With what scorn and execration would you treat the man, who, if these Burghs, this country, were invaded by an enemy, instead of joining his fellows to fight for wife and weans, for hearth and home, for liberty and old Scotland, should, from some base hope of saving his own cur's skin desert his comrades and join with the enemy in their attack on these? Why such a wretch would only be fit to be hung!

(To be continued.)

Mr. Parnell was only wan, not with the cares of his distress to country but with eagerness to get astride of 'Home Rule' "President" or 'Dictator' (as his three horses are significantly named) and gallop back to the arms of charming Kitty whose husband was away from home. Mr. Parnell has not been coivicted of immoralities it is the law that has been convicted of immoralities. "Until our marriage laws are remodelled to suit men and wowen and to further the happiness and health of the community instead of to conform to an ideal of purity, no verdict in a divorce case will force any man to retire from public life if it appears that he behaved no worse than the law forced him to Mr. Parnell's business is simply to sit tight and let the pure people talk.

Broadly speaking, the results of the factory Commission are:—(a) that the limitation of the hours of work for women to eleven in any one day is proper and sufficient in view of the conditions under which factory labour is performed here; (b) that the maximum age of children so understood should be raised to fourteen: (c) that outside the shift-system half time work is the only solution to the question of children's labour; that men, women and children alike should receive one day's rest in seven; (e) that the rest-day should be Sunday and should be kept as a complete rest day, the cleansing of machinery being accomplished at some other time; (f) that fixed limits for the general working day are not demanded, not advisable and not required; and (g) that between the hours of 12 and 1 p. m. every factory not working on the shift-system and not obliged for technical reasous to work continuously should be required to ensure a full thirty minute's rest for all hands. T. I.

The Native states maintain about 3,60,000 men under arms of whom one-third may be regarded as regular soldiers. Forty years of conciliatory government under the Queen have enabled the feudatory armies to be now utilized as a great military reserve. The change is due to the policy by which the feudatory princes have been incorporated into the empire with a well defined and indefeasible position of their own. That position they feel to be perfectly safe from *encroachment or attack* by the Suzerain power.

Major Nawab Afsur Jung has been appointed extra A. D. E. on the staff of H. E. general Sir Frederick Roberts on the occasion of the forthcoming Camp of exercise in Secunderabad.

In replying to the address from several Temperance Societies at Madras Mr. Caine said that teetotallers in all walks of life could work infinetely better than those who drank intoxicants. The English were a drunken nation though not so drunken as formerly. The Parliament censured in a resolution the Abkari policy of the Indian government. The Indian laws were ten time worse than the English system which were about the worst in the world. The Indian laws were careful to make it easy to do wrong and difficult to do right. The government thought nothing of the moral but every thing of the revenue considerations. His contention was that government could not get a maximum of consumption. If officers who got most money from the abkari were promoted he would like to see Collectors orderded to consult the people as to their wishes on the opening and licensing of drink shops. Madras was not the best of a bad lot.

His Highness the Nizam has been pleased to confer the title of Nawab Framroz Jung Khan Bahadur on Mr. Framjee Jamshedji at the Birth day Durbar held on Thursday-night last. Mr. Framjee is the first Parsee Nawab at Hyderabad. This personal favour is a honourable distinction to the Parsee community at large.

Mr. R. D. Hare has been appointed Director of Land Records and Agriculture, Hyderabad Assigned Districts.

पॅंच — 'सापकर' चा व एक 'सुबोध प्रकाश' चा एक अशा दोन रोजनिशा आमच्या कडे आल्या आहेत त्यांचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों.

रा. रा. शंकर रामचंद्र हतवळणे यांनीं 'सद्बोध मंदीर' नांवाचें पुस्तक आमच्या कडे पाठविलें आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों. पुस्तक छापणी वगैरे सुबक व सुरेख असून किंमत एक रुपया ठेविली आहे. ग्रंथकर्त्यांच्या प्रसिद्ध होणाऱ्या मालिके पैकीं हा पहिला भाग आहे यांत स्त्रियांनीं कर्तव्यें गोष्टी रूपानें सांगण्याचा पुस्तककर्त्या चा हेतु आहे तो आमच्या मतें कितपत साधला आहे हें आम्हीं पुढें थोडक्यांत कळवूं.

सालाबाद प्रमाणें 'लोकल फंड' रीपोर्टा ची एकप्रत गेल्या आठवड्यांत आली आहे. त्यांतील आवश्यक माहिती सवडी प्रमाणें देण्यांत येईल.

## वऱ्हाड

हवामान—मध्यंतरी बराच पाऊस पडून पिकाची पुष्कळ प्रकारें नुकसानी झाली. अवेळी ही वृष्टी होऊं लागल्या मुळें लोक मोठ्या फिकीरींत होते परंतु ईश्वरी कृपेनें दोन दिवसा पासून पूर्ववत् हिंवाळ्याचे दिवस भासूं लागले आहेत

सेशन जज्ज मि. इलियट साहेब तीन सेशन खटल्या निमित्त आज पासून येथें कोर्ट भरविणार आहेत.

ट्रेनिंग कालेजच्या धर्तीवर मिडल क्लासचे शिक्षक तयार करण्या साठीं पांच म्याट्रिक्युलेटेड विद्यार्थ्यांचा दहा रुपये पगारावर एक निराळा वर्ग उमरावती हायस्कूलास पुढील साला पासून जोडला आहे. शिक्षण एक वर्षाचें असून परीक्षेत उतरतील त्यांस पंचवीस रुपये पगाराची जागा मिळेल. या ज्यादा कामा निमित्त उमरावती हायस्कूलचे हेड मास्तर राजश्री तळवळकर यांस महिना ५० रुपये ज्यादा मिळतील.

आलिशान रेसिडेंट साहेबांच्या आगत वगतानिमित्त विचार करण्यासाठीं येत्या शुक्रवारीं टाऊनहालांत जाहीर सभा आहे. सर्वांनीं येण्याची मेहेरबानी करावी.

रेव्हिन्यु कमिशनर साहेब सध्यां चिखली तालुक्यांत फिरत आहेत. डायरेक्टर साहेब मेहेकरकडून वाशिमास जात आहेत. एजुकेशनल इन्स्पेक्टर वणीहून वाशीमकडेच येत आहेत.

पोलीस इन्स्पेक्टर मि. धोंडजी यांस आलिशान रेसिडेंट साहेब यांच्या सरबराईसाठीं निवडण्यांत आलें आहे.

मे. डेपुटी कमिशनर अकोला हे खामगांव तालुक्यांत फिरत आहेत. पोलीस सुपरिंटेंडेंट मि. कंबरलेन साहेब हा सध्यां दौऱ्यावर आहेत.

येथील हास्पिटल असिस्टंट मि. किसनगीर आनदगीर यांना एका यंका नांवाच्या बाईस दोन दिवसा पासून आडवें आलेलें व फुगलेले मूल काढून यातनेंतून सोडविलें. येथील दोन्हीं सुईणींचा हा उपाय हरला होता तेव्हां अशा नाजूक कामांतील त्यांची कुशलता विशेष करून वाखाणण्या सारखी आहे.

यंदा मुंबई युनिव्हर्सिटीच्या प्रीव्हियस परीक्षेत ६४६ उमेदवारांपैकीं २६१ पसार झाले आहेत त्यापैकीं खालील पांचजण वऱ्हाडांतील विद्यार्थी आहेतः—

वर्ग २ रा — गणेश रामचंद्र दामले व रामचंद्र विष्णू महाजनी.

वर्ग ३ रा — लक्ष्मण चिंतामण काळेले दत्तात्रय विठ्ठल सरंजामे, आणि सुंदर निळकंठ पांड्ये.

## वर्तमानसार

तारीख १ जानेवारी सन १८९१ पासून पारिस व लंडन या दोन शहरामध्यें दूरध्वनि यंत्राच्या साह्यानें दळणवळण चालूं होणार आहे.

यंदाच्या राष्ट्रीय सभेचे प्रेसिडेंट मद्रासचे प्रसिद्ध बारिस्टर मि० गांझ यांना यंदाच्या राष्ट्रीय सभेचे प्रेसिडेंट होण्याचे कबूल करितां आले नाहीं ह्मणून मुंबईचे प्रसिद्ध मुत्सद्दी गृहस्थ मे. फेरोजशा मेथा यांची अध्यक्षाच्या जागीं योजना झाली आहे. राष्ट्रीय सभेच्या प्रमुख मंडळीहून निराळे गृहस्थ अध्यक्षाच्या जागीं मिळतील तर पाहिजे होते परंतु कांहीं योग्य कारणामुळें हा गोष्ट घडून आली नाहीं.

दौलताबाद, एलोरा, आणि अजंठा ह्या तीन ठिकाणची लेणीं तरुण झार पाहणार. हीं ठिकाणें निजामच्या हद्दींत असल्यामुळें तीं ठिकाणें पाहण्यासाठीं झार साहेब येतील तेव्हां त्यांचें यथोचित आगतस्वागत ठेवावें असें हुकुम निजाम साहेबांनीं दिले आहेत.

तंजावर, तिनीवली, कर्नूल आणि चिंगलपटण ह्या जिल्ह्यांत पाऊस कमी झाल्यामुळें पिकें पुष्कळ बुडालीं आहेत. मलबार भागांत हीं पिकें भिकार आलीं आहेत यामुळें यंदा तिकडे अतिशय महागाई होणार अशी ओरड सुरू झाली आहे.

बादशाही पाहुणचार– कित्येक महिन्यांपूर्वीं जर्मनीचे बादशहा नाव्हे ठिकाणीं रशियन झारास भेटण्यासाठीं गेले होते. तेव्हां दोघे बादशाह एम फोलोझाफ नामक गृहस्थाचे पाहुणे होते. हे श्रीमान रशियन गृहस्थ स्टेट सेक्रेटरीच्या हुद्यावर आहेत. या उभय बादशहांच्या मिजासीसाठीं सदर गृहस्थास दररोज ७५००० रुपये खर्च होत असत असें प्रसिद्ध झालें आहे.

सुवार्ता– यंदाच्या सरकारी वर्ष अखेर खजिन्यांत शिल्लक राहिल्यास तिचा उपयोग मिठावरील कर कमी करण्याकडे होईल अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे, पण ती अनुभवानें खरी ठरेल तो सुदीन. "सरहद्द रक्षण" या राक्षसाच्या दोंदांतून शिल्लक राहील तेव्हां खरें. शु. सू.

नामदार अशवरनर साहेब– मुंबई सरकारचे माजी कौन्सिलर, जे विलायतेस पेनशन घेऊन गेले आहेत, ते आमच्या वाचकांस पूर्ण माहीत आहेतच. त्यांनीं स्पष्ट रीतीनें विलायतेंतील लोकांस धर्म संबंधाचे कामांत ढवळाढवळ करण्याचा हल्लीं जो प्रयत्न चालला आहे, हा अतिशय भयंकर व राजकीय दृष्ट्या फार घातक होणार आहे असें सांगितलें याकरितां हें जोखीम सरकारानें आपल्या माथीं घेण्याचें भरीस पडूं नये. नाम आशबनर साहेबांनीं सरकारास हा फार चांगली सल्ला दिली. हिंदुस्थानांत राहून जो अनुभव ह्मणून मिळवावयाचा, त्याचा खरा उपयोग, ज्या ठिकाणीं सरकारचा पाय चुकत असेल, त्या ठिकाणीं त्याना निर्भय व सिधा रस्ता दाखवावयाचा हाच आहे.

हिंदुस्थानांतील महाभारत ग्रंथा एवढें काव्य जगांत दुसरें नसेल. या काव्यांत १,२०००० श्लोक आहेत. याचो १८ रा पर्व केलीं असून यांतील मुख्य विषय कौरव पांडवांचें युद्ध होय. ययाति राजाला पुरु आणि यदु असे दोन पुत्र झाले यदु हा यादवांचा मूळ पुरुष आणि पुरु हा पांडवाचा मूळ पुरुष हीं उभय कुळें युद्ध संग्रामांत अति कुशल होतीं. हा सर्व इतिहास पूर्ण मनोवेधक आणि राजकीय तत्वाला अगदीं लागू असल्यामुळें अनेक देशच्या लोकांनीं त्यांचीं भाषांतरें करून आपापल्या राजधानींत नेऊन ठेविलीं आहेत. दिल्लीचा बादशहा अकबर यानें ३०० वर्षांपूर्वीं अर्बी भाषेत महाभारताचें भाषांतर आणि त्यावेळीं अश्वमेधादि यज्ञाचे हुबेहुब चितारलेले देखावे उतरून नेले त्याचा उतारा जयपूरच्या पुस्तक संग्रहामध्यें आहे. तो सचित्र महाभारत ग्रंथ व्हाइसराय गव्हरनर जनरल साहेबांनीं पाहून अत्यानंद प्रदर्शित केला. अलिकडच्या लोकांनीं तो एकवार साग्र ग्रंथ ऐकावा अशी आमची प्रार्थना आहे.

नवीन अधिकार–सरकारी कामगारांच्या विरुद्ध मजकूर लिहिला असतां एतद्देशीय वर्तमानपत्रांवर खटले चालविण्याचा अधिकार जो एकट्या हिंदुस्थान सरकारास होता तो अलीकडे त्या सरकारानें इलाखे सरकारास दिला आहे. ह्मणजे आतां वर्तमानपत्र कर्त्यावर खटला करण्यास हिंदुस्थान सरकारच्या परवानगीचें कारण राहिलें नाहीं. शिवाय ज्या ठरावावरून हे अधिकार इलाखे सरकारास दिले आहेत त्या ठरावामध्यें हिंदुस्थान सरकारानें असें म्हटले आहे कीं, खटला चालविण्याचा खर्च त्या कामदारानें करावा किंवा त्या सरकारानें करावा हा ही विचार इलाखे सरकारानें करावा. अथवा तसाच कांहीं प्रकार दिसल्यास त्या खर्चाचा कांहीं अंश सरकारानें द्यावा वर्तमानपत्राचा धंदा किती नाजूक झाला आहे तो पहा. न्या. सिं.

औदार्यः– सोलापूर येथील एक वकील कै. भीमराव कृष्ण कलादगीकर यांच्या कुटुंबांनीं नुकतांच आपल्या आजारीपणाच्या कारणानें बराच मोठा दानधर्म केला. त्यानीं युनिव्हर्सिटीस ७५०० रुपये देऊन त्यांचे व्याजांतून मट्रीक्युलेशन परिक्षेंत संस्कृतमध्यें पास होणाऱ्या कर्नाटकांतील विद्यार्थ्यांपैकीं पहिल्या मुलास दरमहा २५ रुपयेप्रमाणें ४ वर्षेपर्यंत कालेजांत स्कालरशिप मिळत जावी अशी तजवीज केली आहे. तसेंच अथणी तालुक्यापैकीं शूरपाळी येथें श्रीनृसिंव्हाचा उत्सव होत असतो त्यांत एक दिवसाचें ब्राह्मण भोजनाचा खर्च दरसाल १५० रुपये पर्यंत करण्यास २००० रुपये व्यंकटेश गिरी जवळील पद्मसरोवर येथें प्रतिवर्षीं भरणाऱ्या मध्व सभेस २५ रुपये देण्यासाठीं ७०० रुपये, आणि येथील श्रीविष्णुमंदिराच्या व बागलकोट तालुक्यापैकीं बाडगी येथील श्रीकेशव मंदिराच्या जीर्णोद्धारार्थ २००।२०० रुपये दिले. याशिवाय तुलादान, ब्राह्मणभोजन, संभावना आश्रितास देणग्या वगैरे संबंधानेंही बराच खर्च झाल्याचें ऐकतों. एकंदरींत बाईचें हें औदार्य साधारण नव्हे.

लार्ड वेन्लाक यांस मद्रासचे गव्हरनर नेमलें.

गत सालच्या अखेरीला साऱ्या हिंदुस्थानांत मिळून समाईक भांडवलाच्या ८९५ कंपन्या होत्या.

जवानहळी नांवाच्या ठिकाणीं एक शेतकऱ्यास त्याच्या जमिनींत एक सोन्याची खाण सापडली आहे असें बंगलोरच्या एका पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

तंजावर, तिनेवल्ली, कर्नूल मलबार वगैरे प्रांतांत दुष्काळ पडण्याची भिती आहे.

क० त०

बंदुकीच्या दारूच्या ऐवजी उपयोगीं पडणारा असा एकपदार्थ शोधून काढला आहे त्याच्यावर दाब असला ह्मणजे तो पाण्यासारखा पातळ असतो. परंतु तो दाब काढला ह्मणजे त्याची इतक्या जोरानें वाफ होते कीं, तिच्या योगानें बंदुकीच्या गोळ्या व तोफांचे गोळे दारूच्याही पेक्षां जोरानें, धूर व अवाज झाल्याशिवाय सोडतां येतात! हा प्रवाही दारू प्रचारांत आली ह्मणजे लढाईच्या कलेंत क्रांति होऊन राष्ट्रें एकमेकाशीं लढाई करण्यास अधिकच भिऊं लागतील.

अमेरिकेंतील प्रख्यात कल्पक एडिसन हे हल्लीं एक घड्याळ तयार करीत आहेत, त्यांत विशेष हा कीं तासाचे टोले न वाजतां एक, दोन, तीन असे ध्वनी निघावे, व झोपेंतून जागे करण्याला अलार्म व्हायचा त्याच्या जागीं 'उठा' असा मोठ्या आवाजानें शब्द निघावयाचे!

हल्लीं रशीयांत ब्रिटिश लष्करी कामदार रशियन भाषा शिकण्या साठींच गेलेले असे २१ इसम आहेत.

तुर्कस्थानच्या सुलतानाच्या खानगीकडे १०००० शेर पीठ दररोज लागते!

पोषाखाचे जिन्नस विकणारी एक कंपनी दरसाल सव्वाबारा कोटी हातमोजे विकते.

लंडनांत ८००० स्त्रिया वर्तमानपत्र संबंधीं कामें करीत आहेत.

क्वेटा जवळच्या भागांत गेल्या आठवड्यांत मोठें वादळ झालें. क्वेटाच्या आजूबाजूच्या टेकड्या बर्फानें व्यापून गेल्या आहेत.

ठा० अ०

## जाहिरात.

विक्रीस तयार

**DIARY FOR 1891**

**सन १८९१ सालाकरितां रोजनिशी**

इंग्रजींत इंग्रजी तारीख, मराठींत तारीख मितीसुद्धां, प्रत्येक पानावर एकेक सुरेख ह्मण व प्रत्येक तारखेला एकेक पान.

ही डायरी चांगल्या घोटीव कागदावर छापिली असून बायडींग उत्तम प्रकारचें सोनेरी केलेलें आहे. यांत महाराणी साहेबांचे घराणें; हिंदुस्थानची साधारण माहिती; मुंबई शहराची साधारण माहिती; पोष्ट, रेल्वे, तारायंत्र, पर्जन्याची नक्षत्रें, विवाह मौंजीमुहूर्त सरकारी, आफिसांत असणाऱ्या सुट्या, फियादीस स्टांप, कर्जखतास स्टांप पगार देण्याची रीत, रवि उदय व रवि अस्त वगैरे सर्व प्रकारच्या माहितीचा यांत समावेश केला आहे.

किं. ट. ह. सह ६ आहे.

विशेष सूचनाः– दहा प्रति घेणारास एक प्रत कमिशन.

व्हाल्युपेएबल अगर रोख किंमत आल्यास पाठविण्यांत येईल. प्रति खालीं सही करणाराकडे व वि. एम. बाळवेकर आणि कं० बुकसेलर्स, व पब्लिशर्स, मार्केट पोस्ट, यांजकडे मिळतील.

म्यानेजर
'सुबोध प्रकाश' प्रेस गिरगांव
मुंबई.

नोटीस.

नोटीस बेशर्मी भिकाजी व पुंजाजी वल्लद मल्हारजी मांडवगडे कुंभार राहणार कसबे अनार्सिंग तालुके वाशीम यासी खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा व भिकाजी यांचा विवाह होऊन आज १६ वर्षे झालीं असून मी सज्ञान दशेंत आल्यावर अजमासें ४ वर्षेपर्यंत तुमचे येथें मी संसार केला. परंतु इसम मजकूर शुद्धीवर नसून पिशाच्याप्रमाणें त्याची वर्तणुक आहे असें हा असून मजवर दररोज मारहाण करावी. अस्तु. या नंतर आज दोन वर्षे झाली तुह्मी मला नेण्यास येत नसून अगर जातींत पंचाईत टाकण्यास मी सिद्ध असतां राजी न राहतां कोणतीच गोष्ट करीत नाहीं त्यापक्षीं ही नोटीस पाहतांच १० दिवसाचे आंत तुम्ही उभयतां पूसद येथील जातिपंचांत येऊन पंच सांगतील त्याप्रमाणें व्यवस्था करून २ वर्षांत झालेला माझा खर्च देऊन मला घेऊन जाण्याचे करावे जर या मुदतींत आपण न आल्यास मी गंधर्व लावण्यास मुखत्यार आहे व झालेले २ वर्षांचे खर्चाबद्दल दिवाणी कोर्टांत दावा गुजरवीन. याप्रमाणें न केल्यास हा नोटीस फारकतीप्रमाणें समजली जाईल कळावें तारीख ७ डिसेंबर सन १८९० इसवी.

( सही )

राधा मर्द भिकाजो मुक्काम काळी प्रगणें पूसद इचे हातची निशाणी बांगडी

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून असें कळविलें जातें कीं बाळापूर येथील भवानसा तुकसा यानांवाचे दुकानाशीं ज्या कोणाचा कोणत्याही प्रकारचा व्यापार असेल तो आमच्या संमती शिवाय यापुढें करूं नये. व मागील झालेल्या व्यापाराचा निकाल हा आमचे संमती शिवाय करूं नये. केल्यास रीती प्रमाणें जबाबदार धरून नुकसान भरून घेतलें जाईल. हें सवत्रांस कळावें तारीख ४ माहे डिसेंबर सन १८९० इसवी

सही

तुकाराम भवानसा राहणार
बाळापूर दस्तुर खुद्द.

## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९।।।–।। |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९।।= |
| सुवर्ण.... | २२ | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ८४। | उडीद | ६५ |
| गहूं काठे | ५७।। | बनशी | ६७।। |
| जवारी | ३८ | चणे | ६५ |
| सर्की | ३।= | मीठ | ४०= |
| तूप | ७ | तेल | ४।।। |
| कापूस ४१ | रुई ५७।। | जिनचो | ५९ |

सव्याचे भाव

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत संवत | १९४७ | ४२।= |
| गहू | वैशाखशुद्ध | १९४७ | ५७०= |
| आळशी | चैत्रशुद्ध | १९४७ | ७९। |
| रुई | फाल्गुन शु. | १९४७ | ५७०≡ |
| सर्की | व. नवे सालाची | १९४७ | ३।।≡ |

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०१३
सहामाही ३ " " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.............................०४

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8
Six monthly............3 " 8 as
Single copy....................................4as

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढे दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस ........०१

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV | AKOLA MONDAY 22 DECEMBER 1890 | NO 49

वर्ष २४ | अकोला सोमवार तारीख २२ माहे डिसेंबर सन १८९० इ० | अंक ४९

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

## सार्सापारला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गोतमराव केशव, मुंबई.

## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

विक्रीस तयार.

SAPKAR'SDIARY
FOR 1891
WITH A CALENDAR FOR 1892

सापकरांची रोजनिशी
सन १८९१ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, महिने सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सणर, सरकारी ऑफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौंन्जीविवाहाचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखाः रेलवे, तारायंत्र, स्टांप मनीऑर्डर्स पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रुढी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्टफी पोलीस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल प्रोसीजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्ठक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरी पृष्ठें जोडलीं आहेत.

| रोजनिशीची किंमत. | ट. हा. |
| --- | --- |
| प्रत नंबर १ ............ | ०१२ ०२ |
| प्रत नंबर २ ............ | ०८ ०१॥ |
| प्रत नंबर ३ ............ | ०७ ०१॥ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
'ज्ञानचक्षू' चे मालक.

## नोटीस.

ती० रा० रा० कृष्णाजी मानभाव राहणार सांगळूद ता० अकोलें यांस नोटीस देणार उतराजी वल्लद अवधुत मानभाव राहणार हिंगणे ता० अकोलें नोटिसीनें असें कळवितों कीं तुमचे मुली बरोबर आमचें लग्न होऊन आज सुमारें नऊदहा वर्षें झालीं. ह्या वेळांत सासर माहेर रीतीप्रमाणें होत असून अलीकडे अदमासे तीन वर्षें जाहली तुम्ही आमचे बायकोस पाठवीत नाहीं आम्हीं दहापांच वेळा बोलावणें पाठविलें व आम्ही हीं दोनचार वेळा समक्ष आलों तर तुह्मी बायको लपऊन ठेवितां व तिजला पाठवीत नाहीं. आणि असें सांगतां कीं आमचे बायकोस पाठवीत नाहीं तर तुह्मास ह्या नोटिसीनें असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत पाठऊन द्यावी असें झालें नाहींतर तुमचेवर आम्ही कोर्टांत फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत जो खर्च लागेल तो व ह्या नोटिशीचा खर्च असें मिळून तुमचे पासून सर्व भरून घेतले जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता० १७ माहे डिसेंबर सन १८९० इ० (सही)

उतराजी वल्लद अवधुत मानभाव
राहणार हिंगणें.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पुसद वऱ्हाड
तारीख ११ डिसेंबर सन १८९०

वि. वि. पुष्कळ दिवस झाले आपली भेट घेतां आली नाहीं ह्या बद्दल वाईट वाटतें.

हवामान—पावसानें मागील आठवड्या पासून इकडे नजर फेकल्यानें शेतकरी लोक फार दिलगीर झाले आहेत. मेहनत करून तिचें फळ अगदी हातीं येण्याचे वेळेस जर मध्यें विघ्न आलें तर मनाची किती निराशा होते ह्याचा ज्यांवर असा प्रसंग येतो त्यांसच अदमास करतां येणार आहे. ह्या पावसानें जोंधळ्यास गोंड येऊन काळें होणार आहेत. पण ईश्वरास जें अवडेल तें खरें.

मागील अठवड्यांत वऱ्हाडांतील खानेसुमारीचे सुपरींटेंडन्ट मे- वारन हेस्तींग साहेब ह्यांची स्वारी येथें आली होती. खानेसुमारीच्या संबंधांची माहिती देणें करितां ह्या तालुक्यांतील सुपरींटेंडन्ट, सुपरवायझर व गणतीदार यांस तहसील कचेरींत बोलाविलें होतें. सुमारें शें सवाशें लोक हजर होते. साहेब बहादुरांनीं बुकें कशीं भरावीं वगैरे बद्दल सविस्तर माहिती दिली. दुसरे दिवशीं साहेब बहादुर खडाळ्याकडे रवाना झाले.

सरकारी नोकरांपैकीं ज्यांस सुपरींटेंडन्ट व सुपरवायझर नेमिलें आहे त्यांस कांहीं अलावन्स – फिरण्याबद्दल भत्ता वगैरे – मिळण्याचा आहे परंतु जे सरकारी नोकर नसून सुपरवाइझर्स व गणतिदार नेमिलेले असे जे दुसरे लोक अहित त्यांना कांहीं एक मिळावयाचें नाहीं असें ऐकिवात आहे. हें जर खरें असेल तर कोणासही सखेदाश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. सरकारी नोकर तर सरकारचींच माणसें आहेत तेव्हां त्यांस एकवेळ कांहीं न दिलें तर चालेल. पण इतर लोकांस त्यांची वेळ खर्चून व रोजी बुडवून ह्या कामास बिगारी धरणें आणि त्यांस कांहीं एक न देणें ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. अशा पैकीं एकाद्यानें चांगलें काम केलेलें सरकारच्या नजरेस जर आणिलें गेलें तर त्यास सरकार सर्टिफिकीट देणार. दुपारची पंचाईत पडल्यास त्या सर्टिफिकीटाची काय मातबरी! ज्यांची स्थिती बरी आहे त्यांस हें सर्टिफिकीट सन्मान दायक आहे. हातावर पोटभरणारे, लहान लहान वाणी, अर्ज लिहिणारे वगैरे लोकांस हें मोठेंच संकट आलें आहे तरी बिचारे काय करतात. ह्यकाह्यानें हुकुमाची मान्यता करून तंगड्या तोडीत रपोटाची विवंचना करीत सरकारचें काम ह्मणून शिरसावंद्य करून खेडोखेडीं हिंडतात. आपलें सरकार मायाळू व गरीबांचे कैवारी असल्यामुळें ह्या गरीबांची कांहीं दाद घेईल अशी आशा आहे.

येथील कोर्टीचें काम अलीकडे फारसें चालत नाहीं. दोनतीन महिन्यापूर्वीं फार सपाट्यानें चाललें होते. कोर्टाचे अधिकारी रजेवर जाणार अहित असें समजतें.

एक
गगती दाराचा मित्र.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ११ शके १८१२

## लोकमत वृद्धि

( ४७ वे अंकावरून पुढें चालूं )

विद्याभ्यासानें व अनुभवानें परिपक्व दशेस आलेल्या सर्व कालच्या तत्ववेत्यांचें व राज्य कारस्थानी पुरुषांचें मत असें पडतें कीं राष्ट्रांत मत स्वातंत्र्य असलें म्हणजे देशोत्कर्ष होत जातो. अरास्किन्, मिलटन व फाक्स् यांनीं पोक्त विचार करून असें लिहिलें आहे कीं लोकमताचा केवळ राजा व स्ववचक अतिशय बसून त्या मुळें स्ववर्मांत अंतर न पडूं देण्याविषयीं त्यांचे मनांत नेहमीं उत्सुकता राहते असें नाहीं तर राष्ट्रांतील रावा पासून तो रंका पर्यंत सर्व दरज्याचे लोकांचें मनांत नेहमीं असें वागत असतें कीं आपण जीं बरी वाईट कृत्यें करितों तीं सर्व लोकांच्या नजरेस येतील व त्यावर चर्चा ठिकठिकाणीं सुरू होईल. व तेणें करून आपल्या दुष्कृत्याचा झाडा आपणास याच जगांत द्यावा लागेल अशी चिंता नेहमीं वाहिल्या मुळें दुर्वर्तन किंवा लोकानां अमान्य असें कृत्य करण्या विषयी त्यांच्या मनांतील प्रवृत्ति होतां होईल तितकी कमी होते. हा साधारण नियम आहे कीं जो पर्यंत एखाद्या मनुष्यावर वरिष्ठ अंमलदार असतो तो पर्यंत त्याचे हातून कामाची व्यवस्था उत्तम प्रकारें व सचोटीनें होते. परंतु तोच स्वतः जर मुखत्यार होईल तर पूर्वींच्या व हल्लींच्या कृतीस पुष्कळ अंतर पडतें.

आतां इंग्लंडांत लोकमताचा पगडा पूर्णपणें बसल्यामुळें राज्य शकट हांकण्याची त्यांचें आंगीं जी योग्यता आली आहे ती तेथें फार दिवसापासून अस्तित्वाप्रत पावलेल्या संस्थामुळेंच. शेंकडों वर्षांपासून बरें वाईट राज्य चालविणें त्यांचे आंगावर पडल्यामुळें त्याना वारंवार बिकट अडचणी सोसाव्या लागल्या त्यांचेवर नानाप्रकारचीं संकटें गुदरलीं, या पासून त्यानां अलौकिक फायदा झाला. धैर्य, उत्साह, सहनशीलता, प्रसंगोपात वर्तन ठेवण्याची समय सूचकता, वगैरे गुण त्यांचें आंगीं उत्तरोत्तर वृद्धीस पावले. त्यांनीं भगीरथ प्रयत्न करून, तसेंच एकीनें वागून व आत्मसुधारणा करून आपल्या श्रमानें अमोल स्वातंत्र्यरूपी संपत्ति मिळविली व तेणेंकरून राष्ट्रांत लोकमत उत्पन्न केलें. तेंच त्यानां आतां कोणत्याही कामांत यश मिळविण्यास विलक्षण साह्यभूत झालें आहे. त्याच्या सत्तेपुढें राजाचें देखील कांहीं चालत नाहीं. सॅक्सन् लोक जेव्हां इंग्लंड देशांत आले तेव्हांपासून घरच्या घरीं नागरिक लोकांचीं कर्तव्यकर्में व जोखिमी काय आहेत यांचें ज्ञान त्यानां मिळत गेलें. शेंकडो लहान लहान मंडळ्यांच्या स्वाधीन स्थानिक स्वराज्य असल्यामुळें स्थानिक कामांकरितां आपल्या मुखत्याराकडून त्यांनीं आपसांत कर उत्पन्न करावेत. व कोणतेंही सार्वजनिक कृत्य करतांना त्यांनीं एकेठिकाणीं जमून वाटाघाट करावी व आपल्या शेजाऱ्यांशीं चढाओढी लावून आत्म सुधारणा करावी.

---

रा. रा. सदाशिव शास्त्री थत्ते हे पुण्यास सुरलीवराचे देवळांत ता. १४ दिसेंबर रोजी हिंदुलोकांची सभा भरली होती तिचे अध्यक्ष होते ते येत्या राष्ट्रीय सभेच्या प्रेसिडेंटास विनंती करणार आहेत कीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक सभा न भरेल अशी तजवीज होईल तितकी व्हावी. कां कीं राष्ट्रीय सामाजिक सभा एकेस्थलीं भरल्यानें लोकांचीं मनें अस्वस्थ होऊन सरकारा कडून धर्म चाली विरुद्ध कायदा मागण्या संबंधानें तंटे उपस्थित होतात. आणि धर्म संबंधीं चाली रीतीचे अभिमानी लोकांचे दरम्यान सामाजिक तंटे उपस्थित झाल्यानें राष्ट्रीय सभेस बाध येणार आहे.

अशा तात्पर्याची सूचना आमच्याकडे अभिप्राया करितां आली आहे. आणि विशेष माहिती साठीं हवाला रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांजवर सोपविला आहे. आम्हांस लिहिण्यास खेद वाटतो कीं अशा वेळीं निर्भिडपणें प्रतिकूळ अभिप्राय दाखल करणें आम्हांस भाग आहे. आमचें मत विरुद्ध असण्याला पहिलें कारण हें कीं जी सूचना फार चांगल्या उद्देशानें बाहेर आली आहे ती आमच्या मतें सर्वथैव घातुक आहे. राष्ट्रीय सभेचा व सामाजिक सभेचा तिळप्राय संबंध नाहीं हें यथास्थित सर्वांस कळून चुकलें आहे. असें असून लोकांना राष्ट्रीय सामाजिक सभेचा असा घोटाळा होतो म्हणून सांगणें म्हणजे एका प्रकारें घोटाळा करण्यास शिकवण्या सारखें आहे. सामाजिक सभेच्या सूचना ज्यास पसंत नाहींत अशा राष्ट्रीय सभेच्या हितचिंतकांस सामाजिक सभेवर रागावून त्वेषानें राष्ट्रीय सभेवर हा त्रागा करण्याचा धडा घालून दिल्या सारखें होत आहे आमच्या वरील म्हणण्या वरून राजश्री थत्ते यांची अशी समजूत होऊं नये कीं आम्ही कायदेवाल्याची अगर बेकायदेवाल्याची तरफदारी करीत आहों. ही सूचना निवळ अप्रयोजक असून आपणांसच विघ्न आहे असा आमचा समज आहे. यास दुसरें कारण असें कीं राष्ट्रीय सभेनिमित्त उत्तरे पासून तों थेट दक्षिणेस कन्याकुमारी पर्यंत सर्व धर्मांचे लोक एकत्र जमतात. असा मोठा जमाव सामाजिक सभे निमित्त जमवूं म्हटलें तर महत प्रयासाचें काम असून शेवटास जाईल किंवा नाहीं या विषयीं वानवा आहे. सामाजिक सभेचा या राष्ट्रीय सभेमुळें एक मोठा फायदा होत आहे. सामाजिक सभेस निराळा मंडप लागत नाहीं व निराळा खर्चवेंच कांहीं एक नको अशा प्रकारें राष्ट्रीय सभे पासून कल्याण होत असून ही सामाजिक सभा तेथें भरूं न देण्या विषयीं विनंती करणें म्हणजे निवळ दुराग्रह होय. सामाजिक सभेच्या सूचना थत्ते प्रभृति मंडळीस पसंत नसतील व त्या नसण्यासही सबळ कारणें असतील व असली पाहिजेत. सामाजिक उन्नति करण्या विषयीं उभय पक्षाचेही अहर्निश प्रयत्न चालले आहेत आणि त्यांचा संकल्प ही वास्तविक कल्याणा कडे आहे तेव्हां उभय पक्षाच्या लोकांनीं निरनिराळ्या लोकांचें खंडण मंडण बाळबोध मार्गानें करावें आणि त्या अर्थी कायदा पाहिजे आहे म्हणून अर्ज गेला आहे व कायदा नको असा ही विरुद्ध बाजूकडून अर्ज गेला आहे ही गोष्ट सयुक्तिक आहे. सामाजिक सभा आवडत नसेल त्या लोकांनीं सामाजिक सभेपुढेंच आपलें गाऱ्हाणें मांडावें आणि प्रसंग विशेषीं जरूर लागल्यास त्यांना सामाजिक सभेला एखादा अनिष्ठ उपाय न योजण्या विषयीं विनंती करावी. अशा विज्ञप्ति वरून सामाजिक सभेसही दुसऱ्या पक्षाच्या म्हणण्याचा विचार करण्याविषयीं मनाचा निश्चय होईल. थत्ते प्रभृति मंडळीना आमचे विशेषें करून असें सांगणें आहे कीं या सूचेनें त्यांचे हातून सामाजिक सभेच्या पुढाऱ्यांचीं मनें दूषित करण्याचा मोठा प्रमाद घडत आहे. सामाजिक सभेस स्थानभ्रष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे ही बातमी त्या सभेच्या हितचिंतकांस कळल्यानें त्यांना मोठा त्वेष येईल व ते वीरश्रीला चढून सभेचा पाया मजबूत व भक्कम करण्यासाठीं झटतील आणि त्यावेळीं तुमच्या पक्षाचा उत्तम उद्देश आहे तरी त्यांचा पाडाव करण्यासाठीं त्यांच्या मनाची सहजी प्रवृत्ति होईल. सारांश आपल्या अशा करण्यानें लोकांचीं मनें बिथरतील व त्यामुळें आपल्याही पक्षाचें समर्थन करणें तुमच्या हातीं राहणार नाहीं. अखेर यावरील अडचणी तुह्मांस सांगतांना एक भयंकर कल्पना मनात येते. आणिबाणीवर सामाजिक सभा आली ह्मणजे कदाचित असें म्हणणें पडेल कीं राष्ट्रीय सभेसाठीं सामाजिक सभेला मंडपातून हाकून दिले जात आहे. त्याअर्थीं आह्मांसही राष्ट्रीय सभा बिल्कूल नको. असला तंटा उपस्थित झाला तर एका सूचनेवरून राष्ट्रीय सभेचा हा बीमोड होईल. आणि त्यामुळें केवढी जबरदस्त देशाची हानि होईल किंवा निदान आपल्या या सूचनेनें राष्ट्रीय सभेच्या ऱ्हासास निराळें कारण उद्भवण्याचा केवढा संभव आहे हे थत्ते प्रवृत्ति हितचिंतकास आह्मांस सांगावयास नको आहे आणि ते शांतपणें आमच्यावरील तिनीचारी अपवादांचा पोक्त विचार करतील असें आह्मी इच्छितों आणि त्यांच्या खऱ्या कळकळीच्या सूचना राष्ट्रीय सभेपुढें सादर करण्यास आह्मी आड आलों याबद्दल ते आह्मांस क्षमा करतील अशी उमेद आहे.

---

राष्ट्रीय सभेचे प्रख्यात पुरस्कर्ते बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे थोडे दिवसापासून प्रकृति नादुरस्त असल्यामुळें फार अस्वस्थ आहेत. प्रकृतीस थोडा बहुत आराम असल्यानें हा बानर्जी साहेबांस येत्या राष्ट्रीय सभेंत पुढारपण घेतां येईल किंवा नाहीं याविषयीं शंका वाटते. ईश्वर करो आणि आमच्या या जंगी देश सुधारकांस लवकरच आराम पडो.

---

कलकत्यास "रिपनकॉलेज" नांवाची पाठशाळा आहे. तिचे मालक सदरहु बाबू गृहस्थ होत. राष्ट्रीय सभे निमित्त हे विलायतच्या मोहिमीवर गेले होते त्यावेळीं त्यांचे पश्चात लॉ टर्म संबधानें कांहीं विद्यार्थ्यांच्या हजरीच्या दिवसांत कांहीं घोटाळा होऊन तो युनिव्हर्सिटीच्या नजरेस आला त्यावरून सिंडीकेटनी मोठ्या हेक्यानें सूचना केली कीं रिपन कॉलेजच्या कायदा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस एक वर्षभर युनिव्हरसिटी परिक्षेस घेऊं नये परंतु बानर्जी साहेबांची दुर्व्यवस्था नाहींशीं करण्याविषयीं दीर्घ प्रयत्न व झालेल्या चुकीची माफी मागण्याविषयीं तत्परता ही पाहून युनिव्हर्सिटी सिनेटनें ती सूचना बाजूस टाकली. लार्ड लॅन्स डाउन साहेबांनीं आपलें मत कॉलेजचे संबधानें फार अनुकूळ असें प्रदर्शित केलें आहे आणि खुद्द लार्ड साहेब चॅन्सेलर आहेत त्याअर्थी सिंडीकेटच्या सूचनेचा अव्हेर होऊन झालेल्या चुकीबद्दल माफी दिली जाईल अशी आमची खात्री आहे. बानर्जी साहेब सर्वांस महशूर आहेत तेव्हां ही आनंदाची खबर ऐकून सर्वांस संतोष होईल.

---

मुंबईच्या वक्तृत्वोत्तेजक सभेनें यंदा नेहमीच्या व्यवस्थेंत मोठा फरक केला आहे. दरसाल दोन तीन विषय मुख्य असून शिवाय अल्पवयीं विद्यार्थ्यां साठीं ही काहीं विषय ठराविलेले असत त्या मुळें विषय पुष्कळ होऊन लहानमोठ्यांचा चांगला समावेश होत असे. त्या मुळें बक्षीसें ही विषयाच्या मानानें किरकोळ असत. चालू सालीं विषय दोनच आहेत. शंभर रुपये व पन्नास रुपये अशी दोन जंगी बक्षीसें टेविलीं आहेत. विषयांची निवड मोठी सुरेख आहे. पहिला राजकीय असून दुसरा सामाजिक आहे. लोकामध्यें ज्या विषया संबंधानें नित्यशः वादविवाद चालला आहे असले विषय असल्या मुळें त्यांची मातबरी आम्ही विशेष मानतों. राजकीय व सामाजिक उन्नती विषयीं बहुत लोकांचे बहुत अभिप्राय पडतात तेव्हां हिंदुस्थानांत कोणकोणते उपाय सुलभ आहेत त्यांचा सुशिक्षित लोकां कडून उहापोह होणें फार आवश्यक आहे. म्हणून पहिला विषय पाठशाळांतून शिकलेल्या व शिकत असलेल्या विद्यार्थ्यां साठींच नेमिला आहे व दुसऱ्या विषया वरील वक्ते पोक्त व निदान थोडे बहुत अनुभविक असावेत या हेतूनें त्या विषया वरील बोलणाऱ्यांचें वय वीस वर्षांहून कमी असूं नये असें ठरविलें आहे. वक्तृत्वोत्तेजक सभे सारख्या संस्थेस मुंबईच्या सभेनें ही चांगली दिशा लावून दिली आहे आणि या प्रस्तुतच्या फेरफारा मुळें चांगल्या परिपक्व विचारांचे वक्ते बोलण्यास सिद्ध होतील हें उघड आहे. मुंबईच्या येत्या समारंभास जानेवारीच्या २७ वे तारखेस आरंभ होईल. विषय चिटणीसांच्या सहीनें प्रसिद्ध झाले आहेत ते येणें प्रमाणें:—

"लोक नियंत्रित राजसत्ता पद्धतीचा संक्षिप्त इतिहास सांगून त्या इतिहासा पासून निघणारे सिद्धांत हिंदुस्थानचे सांप्रतच्या स्थितीस कितपत लागू पडतात आणि ती पद्धति चालु करण्याचें ज्यांच्या मनांत असेल त्यांनीं काय केलें पाहिजे तें सांगावे."—बक्षीस १०० रुपये.

"इंग्लंडच्या सामाजिक सुधारणेंत सरकारानें हात घातला असल्यास केव्हां केव्हां आणि कशा रीतीनें हात घातला आहे आणि त्याचे परिणाम त्यांच्या समजावर काय झाले आहेत आणि हिंदु समाजिक सुधारणे मध्यें सरकारनें हात घालणें इष्ट आहे किंवा नाहीं;" बक्षीस ५० रु.

---

# The Berar Samachar

**MONDAY, DECEMBER, 22, 1890.**

The National Congress is a watchword of the Indian politics. It is in short the Parliament of the whole nation—but no parliament with its graded orders in the two houses. It is an institution to represent the people's cause. The measure of success that has attended its movements warrants a grand advance in no distant future. The Congress has worked most efficiently in the last five years. It has paved its way through various channels. A thoroughly representative assembly it is of the whole nation. This year's meeting is constituted on the sound basis of systematic representation. The stern opposition at the beginning has subsided. The anti-congressionists have hopeleesly lost their way in the mazes of their own misconceptions. In England also the Congress is gradually gaining ground in public opinion. Mr. Surrendra nath Bannerji has won golden opinions in regard to the Congress movements. The British Committee is at the head of affairs under the direction of Sir W. Digby. Mr. W. C. Bannerji is just afresh from lecturing in Great Britain. These are principally the good omens at present.

This bright side of the picture puts us in mind of the other. Notwithstanding such a steady progress the Congress has its own short-comings. The drawbacks are worth notice on account of the alarm they sound for the Congress-wallas. The first difficulty that stares us in the face refers to the annual meetings of the Congress. The government is wide awake to its conflicting interests. It has ordered non-interference on the part of government servants. At the most the Congress can have its way unobtruded if no government officers of high position make it a point to frustrate the intentions of its prime movers. What place to choose for the next session is the present problem. It is coupled with the other question whether the Congress requires to hold its sittings every year. The Congress has effected a thrilling stir in the National aspirations. To close its doors even for a short period will slacken the energies of the

noble-workers and will more or less undo the work of the last five years. It will also be mischievous in another direction. The National Congress has become the grand organ of the people's voice. The local bodies and popular institutions that were used to represent the views of the ryots have consequently become the several stages to the principal institution. They have rather lost their individual voices in that of the Congress. In the latter they have their existence and will allow of no other substitute. The English Parliament if closed for years will threaten the monarch with deposition; but the National Congress if closed for years will die its own death. This Indian polity has no rights whatever, nor has it any legal check on the legislative and administrative spheres of governmental action.

Besides the Congress has proved a terrible burden on its members. The expenses are tremendous. Very few provinces in India can defray them without difficulty. Bombay session has cost us Rs. 62,000 in cash. The 'Amrita Bazar Patrika' is open and sincere. It gives a graphic description. At every session the Reception Committee tried their best to play the hoast. The Calcutta meeting beat the Bombay meeting in hospitality. Madras was more splendid than Calcutta, Allahabad thoroughly beat their friends at Madras and Bombay again in its turn reached the culminating point. To manage more prudently the funds at the disposal of the Congress the leaders will be obliged to receive a certain minimum of delegates from all quarters. The annual expenses that will be incurred on account of their reception should be cut down to the mere Mandap with some petty items. The less the number of representatives the better. Such a meeting of very limited members will afford a good opportunity for wise deliberation since it will form the nucleus of the best men in the land. To be elected a delegate to the Congress will therefore be the greatest honour that one can aspire after and the rising great will learn to spurn delight and live laborious days. These are not all the disadvantages under which we labour and propose a thrifty expenditure in addition to the loud demand for money. In India alone does not end the work of the Congress. It has to enlighten the English public in England. It has to secure a voice in the House of Commons. The latter is the main stream whence issue the orders to the State Secretary and his highly centralized staff in India. New capaigns in the ruling nation must be undertaken. Funds we have none or if any they are meagre and scanty. We have advanced so far that we cannot retrace a step. We must either rise or fall for ever. The latter is a horrible idea and we shall strain every nerve before we succumb to it. Therefore the former is the only one allowable. We shall have to draw a good deal upon our purse and perseverence. Let us see what we do and that will decide our fate.

Nawab Major Afsur Jung A. D. C. to the H. H. the Nizam arrived at Bombay from the Attock Camp of exercise on Wednesday and left for Hyderabad on Thursday night.

H. E. Nawab Sir Korshedjah Bahadur Shamsir Oomrah K. C. I. E. accompanied by Mr. Shapurji Edulji Chinoy had been to Bombay to take leave of Sir Steuart Bayley who sailed for England by Saturday's Mail steamer.

The final report on the cotton crop of the Berar for the season 1890-91 is as follows:— "The area sown with the early crop is 2,442.959 acres or 20 p. c. more than the normal area. The total outturn has been estimated at 356,472, bales of 400 lbs each of cleaned cotton or at the rate of 58 lbs per acre. The estimate includes what has already been harvested at what has still to be gatheren in. The third picking is in progress and is not likely to be completed till about 15th December. The long break in the rains from about the 12th August to the 10th September, as also the somewhat heavy showers that fell yearly in November have inflicted some injury on the crop in most parts of Berar."

His Highness the Nizam has especially deputed the Nawab Vicarul-Oomrah who is his brother-in-law to meet his Imperial Highness on his behalf on his arrival in the Nizam's dominions; and the Nawab Vicar-ul-Oomrah accompanied by the Home Secretary Nawab Mehadi Hassain, Dr. Lawder, his Private Secretary Nawab Sultan-ul-mulk, his son & ten other gentlemen leave Hyderabad on Sunday-night for Dhond, then by a special to Nandgaon, where conveyances will be waiting to take the party to Aurangabad to await there the arrival of the Czarwitch.

Sir Steuart Bayley remarks at a farewell meeting thus:—

A Civilian's life nowadays was very different to what it was when he landed in the country thirty seven years ago It was compassed about by anxieties, full of those petty annoyances which were really more trying to the temper than real misfortunes. Life in the interior was now one of isolation from wholesome influences. There was the great house difficulty, which pressed for solution. Civil servants were exposed to hostile and sometimes malignant criticism. That under so many adverse circumstances the tale of work rendered was so full argued well for the sense of duty with which Englishmen were still animated. His hearers must not suppose that those who sat in arm chairs in Calcutta and issued edicts consigning many of them to banishment from civilization failed to sympathise with their difficulties. On the contrary, he often felt deeply the necessity of inflicting hardship on individuals in the interest of the public service. What measure of success had attended his administration had been, in large measure, due to the loyal support he had received from the noble service to which he was proud to belong. If any thing could temper the grief which he left the reins of power in such capable hands as those of Sir Charles Elliott, whose healtn, as chief elect of the Bengal Civil Service. he had the hnnour of proposing.

Here is a remark upon the character of the Brahmin priesthood made by a Kattywar prince-Kumar Shri Bhavasing. In the course of his winter tour in India he is forced to note down a quaint complaint:— "It matters not to the people at Benaras whether the pilgrim can have the *Darshan* or not. 'Pice, pies, *Bhang*, *Ladoo* are the cries of the begging Brahmins young and old, and *Chobar*; 'come, come, see this or that, put Lour *Daana* are the words always dinning in the ears of the pilgrim. He is not allowed to have a quiet minute for the purpose for which he has travelled hundreds and hundreds of miles." The prince seems to have got some hazy notions of the duties of the National Congress. It is a pity that he is brought up in such a silly confusion of ideas. There is a further question: "What are the leaders of society doing to mitigate this state of evil. Our Congressionists aspire to legislative heights. Have any attempts been made by them to begin at the beginning?......... It should not be forgotten that we must deserve before we desire." Mr. F. B. O'shea whose 'charge' the prince was, was in all truth expected to correct the wrong impressins which the young aspirant carries with him in regard to the movements of a political institution like the Congress.

## वऱ्हाड

आलिशान रेसिडेंट साहेबांच्या आदरातिथ्यां निमित्त सरकारातून व सार्वजनिक मंडळ्यांतून कडेकोट तयारी चालली आहे. अकोला जिल्ह्यातर्फे त्यांच्या पाहुणचारासाठीं परवा सभा भरून हजारावर आकडे पडले आहेत. सरकारी आफिसरांचे आकडे अद्याप बाहेर आले नाहींत.

राव साहेब देवराव विनायक यांनीं वरील रेसिडेंट फंडाकडे दोनशें रुपये दिले आहेत. देशमुख देशपांडे वगैरे गृहस्थांनीं या फंडास वर्गणी देऊं नये अशी आमची सूचना आहे कांकीं त्यांची वर्गणी 'वतनदार' सभेकडे अवश्य पाहिजे आहे. तिचा विनियोग सभेमार्फत रेसिडेंटच्या आदर सत्कारासाठीं होणार आहे तेव्हां वर्गणी या फंडांत न दाखल केल्याबद्दल अधिकाऱ्यांची कांहीं मात्र नाखुषी होण्याचा संभव नाहीं.

मि. डौडन कमिशनर हे गेल्या शुक्रवारीं वाशिमास दाखल झाले. तेथील सरकारी कचेऱ्यांची तपासणी करून साहेब इंगोलिकडे जाणार आहेत असें ह्मणतात.

काल दोन प्रहरीं राष्ट्रीय सभेचे कांहीं मुखत्यार कलकत्याकडे रवाना झाले. त्यांच्या देशसेवे प्रीत्यर्थ पुष्कळ गृहस्थ त्यांस पोचविण्यास स्टेशनवर गेले होते.

मि. इलियट सा० सेशन जज्ज आहेत तोंपर्यंत वणी जिल्ह्याचे डे० कमि० चें काम मि. हेअर सर्व्हे आफिसर लॅंड रिकार्डचे डायरेक्टर यांच्या हवाला करण्यांत आलें आहे. सोंगे फार व वेळ थोडा असें होणार आहे.

रा. रा. अयोध्या प्रसाद एक्स्ट्रा असि. कमि. यांस एक महिन्याची रजा मिळाल्या प्रमाणें ते येत्या जानेवारींत रजेवर जाणार आहेत. सदर्हु मुदतीच्या रजेंत पुसद येथील स्मालकाज कोडताचे न्यायाधिशाचें काम रा. रा. केशवराव जयकृष्ण ए. अ. कमि. याजकडे सोंपविलें आहे. राजश्री केशवराव वारंवार बदल्या होत असल्या मुळें कंटाळले असावेत.

वऱ्हाडांत थोडे महिन्या पूर्वीं मि. अजिजुद्दीन नांवाचे गृहस्थ एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर होऊन आले आहेत त्यांची बदली त्यांच्या पूर्वस्थानीं म्हणजे कलकत्यास झाली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. साहेबांच्या सन्मानार्थ गेल्या गुरुवारीं कांहीं गृहस्थांनीं पानसुपारी केली त्या वरून ते लोकांस आवडले असें वाटतें. आपल्या सुस्थळीं पोंचल्यावर त्यांस वऱ्हाडचा विसर पडूं नये म्हणजे ठीक आहे.

आमचे लोकप्रिय तहशीलदार रा. रा. गणेश बापूजी यांस पहिले वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले आहेत.

मुंबई युनिव्हरसिटीच्या सेकंड बी. ए. च्या परीक्षेंत यंदा २१७ विद्यार्थी त्या पैकीं १०३ पसार झाले आहेत त्यांत वऱ्हाडांतील चार पसार झाले त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:—१ कृष्णराव भट (कै. पुरुषोत्तम राव यांचे चिरंजीव,) केशव गोविंद दामले, नारायण खंडेराव फडके, आणि नारायण मोरेश्वर रहाळकर,

हैदराबादच्या गिरण्या वरील मुख्य अधिकारी मि. जेम्स पेट्न हे आपलें काम सोडून गेल्यासोमवारी न्यूझीलंडास रवाना झाले. जाते समयीं कर्नल नेव्हिल साहेबांच्या अध्यक्षते खालीं लोकांनीं त्यांचा बहुमान केला.

वाशिमचे असि० मास्तर रा. रा. व्यंकटेश शिवराम यांची ४० रु. पगारावर बाळापुरास बढती झाली आहे.

वाशीम– क्ष– पत्र चांगलें आहे उशीरामुळें पुढील अंकावर टाकणें भाग आहे.

'आसेगांवकर' ह्मणतात कीं तेथील हेडमास्तर रा. रा. नाटेश्वर नारायण हे वाशिमास बढतीवर बदलले तेव्हां त्यांस पानसुपारी देण्याचा उत्सव झाला. चांगुलपणाची थोरवी अशीच आहे.

### मागाहून आलेली नोटीस.

दत्तु वल्लद नवसाजी हटकर राहणार जांब प्रगणे कळमनुरी तालुके पुसद जिल्हे वाशीम यास खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझे बरोबर माझे लग्न होऊन आज वर्षे ९ झालीं या दिवसांत तुमचे घरी महिने तीन तुम्ही मजला मोठ्या जुलमानें वागविलें व बाकीचे दिवसांत तुमच्या त्रासा मुळें माहेरी राहत असें. एक वेळ मी माहेरी आल्या मुळें तुम्ही मजला नेण्या विषयीं कांहींच काळजी घेतली नाहीं. माझे बापानें आपले खर्चानें तुम्हा कडे पाठविलें परंतु तुम्ही मजला एकमहीना ठेऊन घेऊन मला माहेरी पोंचती केली. आजतीन वर्षां पासून शिवनी तालुके पुसद मुकामी मी तुमचे नांवावर कर्ज काढून निर्वाह केला. परंतु आतां मजला कोणी कर्ज देत नाहीं सबब या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं माझे खावटीचे कर्जाचा पैसा रुपये १५० दिडसे देऊन मजला घेऊन जावें आणि चांगल्या रितीनें वागविण्या बद्दल चार पंचाचीं खातरी द्यावी असें न केल्यास हेच फारकती समजून मी दुसरा घरटाव करीन मग तुमची कोणती ही तक्रार ऐकीली जाणार नाहीं खावटीचे रुपया बद्दल रीती प्रमाणें दावा करून या नोटीशीचे खर्चा सुद्धा रुपये भरून घेईन. ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत कळवावें कळावें तारिख २० माहे दिसेंबर सन १८९० इसवी.

सही
जयवंता बाई मर्द दत्तु हटकरीन
ईची निशानी हातची
बांगडी.

## वर्तमानसार

इंग्लंड आणि पोर्तुगाल यांच्यामध्यें बेबनाव आली आहे. मुख्यदोष इंग्लिशांचा आहे ह्मणतात.

श्री. शिवाजीराव महाराज होळकर सरकार यांच्या तृतीय राणीस महेश्वर मुक्कामीं पुत्र रत्न झाल्यावरून सध्या तेथें मोठा आनंदोत्सव चालू असल्याचें कळतें.

इंदूर सरकारच्या दोन गिरण्या आहेत, त्या हल्लीं विकावयास काढल्या आहेत. कारण कळत नाहीं.

अमृतबझार पत्रिकेस व कांग्रेसला मध्य हिंदुस्थानांत थारा करूं देऊं नये अशाबद्दल अधिकाऱ्यांकडून झालेल्या सरकिलराची एक अस्सल प्रत मौलवी अबदुल हुसेन बोरा नांवाच्या जमीनदारापाशीं असून ती तो येत्या राष्ट्रीय सभेपुढें आणणार आहे! असें इं. मिरर वरून कळतें.

सुवार्ताः— सरदार लोकांच्या मुलांकरितां असलेल्या सैन्यांत कांहीं व्यवस्था करण्याचा आमच्या सरकारचा विचार आहे अशी सुवार्ता बाहेर आली आहे. सरदार लोकांचे मुलांस घोड्यावर बसणें, भाला, बोथाटी वगैरेंचे शिक्षण द्यावें व लष्करांत नौकरी लावून देऊन पहावें असें ही घाटत असल्याचें कळतें. क० त०

उंदराबद्दल दंड—एका घोडेवाल्यानें एक उंदीर पकडून राकेल तेलांत बुडविला या वरून ह्या इसमास कलकत्याच्या प्राणी वत्सल मंडळीनें मानिस्ट्रेटाकडे गुजरिलें. मानिस्ट्रेट साहेबांनीं त्यास याबद्दल ५ रुपये दंड केला. दी० बं०

रशियाच्या झारांचे चिरंजीव प्रथम ता० २३ रोजी थोडे मुंबईस येतील. तेथें दिवस राहून नंतर पुण्यास येतील. पुण्यासही त्यांचे बरेच मुक्काम होतील असें वाटतें. पुढें हैदराबादेकडे जाऊन तेथून परत मुंबईस येतील व मुंबईहून आमदाबाद काठेवाडकडे जाऊन तिकडून कलकत्ता व उत्तर प्रांताकडे जातील आणि तिकडून मद्रासेस येऊन मग हिंदुस्थान सोडतील. या यांच्या फेरीवरून ते सर्व हिंदुस्थानांत फिरतील असा अदमास आहे.

महारोगावरील कमिशन हैदराबादेस आहे. कमिशनेनें मल्हाररावास हद्दपार केलें. कमिशनानें विलसेन व क्राफर्ड यांस हद्दपार केलें तसें हें कमिशन या दुष्ट रोगास हद्दपार करील तर लोकांवर महत उपकार होतील.

मद्रासच्या रेलवेकडील व्हालंटीयर फौजेची एक मजा झाली. ही फौज रस्त्यानें जात असतां एक घोडा तुफान होऊन आला व त्यास पाहून या शिपाई बहादरास पळता भुई थोडी झाली पण त्याला अडविण्याच्या कामांत कोणीही धजावला नाहीं! शिपाई खरे! !

यंदाच्या एलेमच्या परीक्षेस ४१ उमेदवार गेले होते पैकीं १० पसार झाले.

पार्लमेन्ट सभा ता० २२ जानेवारी पर्यंत तहकूब राहिली असें समजतें.

निझाम सरकारानें वरंगळ जिल्ह्याचे कलेक्टर मि. फ्रामजी जमशेटजी यांस "नबाब फ्रामरोज जंगखान बहादूर" असा किताब दिल्याचें समजतें. पार्शी लोकांत हेच पहिले नबाब होत. पु० वै०

अमेरिके कडील शेतकी खात्याकडील डायरेक्टर साहेबांनीं ज्या प्रदेशांत पर्जन्या पासून अत्यंत रुचकर, मासलेदार आणि स्वादिष्ट कंद मुळें पैदा होतात अशा स्थलीं पर्जन्यवृष्टि न झाल्यास ती करण्यासाठीं हात खंड्यानें विमान सारखीं कांहीं यंत्रें तयार केलीं आहेत. जमिनीवरून पाण्याच्या अगणित पिशव्या वरती चढवून त्या अंगानें पर्जन्य वृष्टि करून शेतकऱ्यांचें मनोरथ पूर्ण करून देणार.

चीन देशाच्या उत्तर भागांत दुष्काळानें लोक फार पिडिले आहेत. कित्येक लोक चीनच्या बादशाहा कडे मदत मागण्यास जात आहेत व वेतागल्या मुळें युरोपियन लोकांची आम्ही कत्तल करूं अशा ही भीति घालीत आहेत. असें ता० ९च्या सेंटपिटर्स बर्गच्या तारे वरून कळतें.

अमेरिकेंतल्या इंडियन लोकांत चळवळ सुरू असून ते लोक बंड करतीलसें वाटतें. उघड दारूगोळा जमविण्याची तयारी ही करीत आहेत.

लंडन आणि म्यांचेस्टर या दोन शहराच्या दरम्यान टेलिफोन सुरू झाला. कित्येक सृष्टी विज्ञान्यांचें शहरांत "वनस्पतींचीवाढ" या विषयावर दोन्ही शहरांतून संभाषण ही झालें. त्याच प्रमाणें लंडन येथील एका नाटक गृहांत चाललें गाणें म्यांचेस्टर येथें स्पष्ट व सुंदर तऱ्हेनें ऐकू आलें.

कानडा प्रांतांतील दोन बायांनीं बाजारांतून मीठ विकत आणून ते पांढरें स्वच्छ करण्या करितां तें घरीं एकदा पाण्यांत ( आधणाच्या ) उकळून काढिलें. यांची ही कृति मिठाच्या आक्टांतील मीठ तयार करण्याच्या कलमाखालीं येत असल्या वरून त्या बायांवर फिर्याद होऊन एकीस १० रु० व दुसरीस १५ रु० दंड अशा से० क्ला० मानिस्टेट साहेबांनीं शिक्षा दिल्या. फ० क्ला० मानिस्टेट साहेबास ही गोष्ट न्याय वाटली नाहीं. त्यांचे असें म्हणणें पडलें कीं, मिठाचा आक्ट सरकारचे जमाबंदीचें रक्षण व्हावें म्हणून केलेला आहे व ज्या अर्थी या बायांनीं केलेल्या कृतीनें सरकारच्या जमाबंदीस कोणत्या ही प्रकारें न्यूनता आलेली नाहीं त्या अर्थी त्यांस अपराधी ठरविणें वाजवी होणार नाहीं. असें त्यांचें मत पडल्या नंतर हायकोर्टाचें मत से० क्ला० मानिस्ट्रेट साहेबांसारखें पडलें, परंतु त्यांस शिक्षा मात्र फाजील वाटून त्यानीं १ आणा व ८ आणे अशी केली.

नोकरां करितां विम्याची व्यवस्था—म्हैसूर सरकार आपल्या नोकरा करितां विम्याची व्यवस्था करण्याच्या विचारांत आहे. हा विम्याची रक्कम पेनशना खेरीज आणखी मिळेल. त्या सरकारचा असा विचार आहे कीं, दहा रुपया पेक्षां जास्त पगार मिळणाऱ्या नोकरां कडून दरमहा पगारावर शेंकडा १० या प्रमाणें वर्गणी घेऊन त्यांच्या वयाच्या ५५व्या वर्षीं त्यांस किंवा ते अगोदर मरण पावल्यास त्यांच्या कुटुंबास विविक्षित रक्कम मिळाल्यास म्हैसूर सरकारचा हा स्तुत्य प्रयत्न इतरांनीं ही अनुकरण करण्या सारखा आहे.

ब्रिटिश न्याय देवते! धन्य आहे तुझ्या न्यायी पणाची! आमचाच दाम खोटा मग परक्याला नांव ठेवण्यांत अर्थ काय! इंग्लिश लोकांच्या न्यायी राज्यांत आम्हास आमच्या लोकांस सदुपदेश करण्याची सुद्धां मोकळीक नसावीना! हेंच कां मतस्वातंत्र्य. नुकतेंच बंगाल्यांत गोपाळनंद स्वामीस त्यांणीं एका जत्रेंत लोकांस "बाबानों खाटकांना गाई विकू नका" असा उपदेश केला—केवढा राजद्रोह बरें हा— व लागलाच स्वामीवर खटला होऊन दोन वर्षें सक्त मजुरी व पांचशे रुपये दंडाची अगदी सौम्य, शिक्षा, बक्सारच्या धारवाडी कांद्यानें न्याय जोखणाऱ्या मानिस्ट्रेटानें केली, असें प्रसिद्ध झालें आहे. अशा तऱ्हेनें न्याय होऊन गरीब व निरुपद्रवी रयतेची दैना होणें अनिष्ट कारक होय. अशा प्रकारच्या न्यायाच्या उदाहरणानें अडाणी लोक अडाणी रानांत शिरण्याचा संभव असतो. आमचे सरकार खरोखरीच न्यायी आहे, अशी आमची पूर्ण खात्री आहे पण एखादे जुलमी अधिकाऱ्या कडून झालेले जुलमाची ओरड थेटपर्यंत गेली पाहिजे. आमचे मायबाप सरकार या बद्दल योग्य तजवीज करील अशी आशा आहे. न्या० सिं०

प्रो० एडिसन यांच्या व्यवस्थापकांनीं एका घरांस अशी कांहीं विलक्षण योजना विद्युलतेच्या योगानें केली आहे कीं, त्या वाड्याच्या दाराजवळ मनुष्य जातांच तें आपोआप उघडतें व तो मनुष्य आंत गेल्या बरोबर आपोआप बंद होतें; तो मनुष्य तसाच दाराच्या पायरीवर चढल्या बरोबर एक घंटा स्वयंपाक घरांत वाजते व एक मालकाच्या खोलींत वाजतें, वै त्याप्रमाणें तेथेंच एक बटन आहे त्याला हात लावतांच दार उघडते व मनुष्य जाऊन खुर्चीवर व कोचावर बसला नाहीं तोंच वाद्याच्या पेट्या वाजावयास लागतात. या घरांतील बिछाने आपोआप गुंडाळले जातात, अशा प्रकारची फारच विलक्षण योजना करून ठेविली आहे.

आगबोटी दगावल्या—पी. ओ. कंपन्यांची नेपाळ नांवाची आगबोट अतीशय धुक्यामुळें रुपायमैथ जवळ खडकावर चढली; परंतु उतारू लोकांस इजा झाली नाहीं. त्याच कंपनीची हांगकांग आगबोट जी पेरिम जवळ किनाऱ्यावर लागली ती साफ फुटली व ती तरंगण्या बद्दलचे उपाय हरल्या मुळें तिजवरील माल उतरीत आहेत.

हैद्राबादचे पूर्वींचे ब्रिटिश रेसिडेंट कारडरी साहेब यांनीं आपले फुरसतीचें वेळांत होमर कवि यांचे इलिअड नांवाचे ग्रंथाचें आणखी एक भाषांतर केलें आहे.

हैद्राबाद येथील खनिन्यांतील अफरा तफरीचे खटल्याचें स्वरुप बदललें. फौजदारी काम सुरू होण्याचे पूर्वीं डिपार्टमेंटल चौकशी व्हावयाची होती; परंतु तसें न होतां एकदम खटला सुरू होणार. हैद्राबाद सरकार तर्फे मि० तय्यबजी मुंबईचे बारिस्टर हजर होतील, व आरोपीचे तर्फे मि० नार्टन क्यांबेल व मि० नेल्सन हे काम करतील.

पार्सलांत प्रेत सांपडलें—एका शामशुद्दिन नांवाच्या मनुष्यानें हैद्राबाद स्टेशना जवळ केलें बद्द केलेलें मोठें पार्सल अल्लाउद्दिन नांवाच्या मनुष्या जवळ दिलें, ते तसेंच असतां कांहीं कारणानें तें उघडलें. उघडल्या नंतर आंत एका स्त्रीचें प्रेत आढळलें. तें प्रेत आपल्या बायकोचें आहे असें तेथील स्टेशनावरील मुनशीनें सांगितलें. नंतर पार्सल करणारास पकडलें. शोधांती त्यांचें खरें नांव अबदुल हुसेन आहे असें समजलें. स० शो.

एक मोठी मौजेची गोष्ट ही कीं १८८७ सालीं हरद्यास एका युरोपियनानें आपल्या भावाचा खून करून तो परवा स्वता कबूल केला. कोण हा पश्चाताप!

चुकीची दुरुस्ती

तारीख १०।१२।९० इसवी चा अंक ६ यात जी तारीख ५।१२।९० इ० ची जाहिरात दिली आहे त्यांत $\frac{S}{53}$ ५९६१४ मुंबई ता० ८।३।८७ रुपयें १० ची नोट असें लिहिलें आहे. त्या ठिकाणीं $\frac{S}{52}$ ५९६१४ मुंबई ता. ८।३।८७ रुपये १० असें समजावें.


## जाहिरात.

विक्रीस तयार

**DIARY FOR 1891**

**सन १८९१ सालाकरितां रोजनिशी**

इंग्रजींत इंग्रजी तारीख, मराठींत तारीख मितीसुद्धां, प्रत्येक पानावर एकेक सुरेख क्षण व प्रत्येक तारखेला एकेक पान.

ही डायरी चांगल्या घोटीव कागदावर छापिली असून बायडींग उत्तम प्रकारचें सोनेरी केलेलें आहे. यांत महाराणी साहेबांचे घराणें; हिंदुस्थानची साधारण माहिती; मुंबई शहराची साधारण माहिती; पोष्ट, रेलवे, तारायंत्र, पर्जन्याची नक्षत्रें, विवाह मौंजीमुहूर्त सरकारी, आफिसांत असणाऱ्या सुट्या, फिर्यादीस स्टांप, कर्जखतास स्टांप पगार देण्याची रीत, रवि उदय व रवि अस्त वगैरे सर्व प्रकारच्या माहितीचा यांत समावेश केला आहे.

किं. ट. ह. सह ६ आहे.

विशेष सूचनाः— दहा प्रति घेणारास एक प्रत कमिशन.

व्हाल्युपेएबल अगर रोख किंमत आल्यास पाठविण्यांत येईल. प्रति खालीं सही करणाराकडे व वि. एम. वाळवेकर आणि कं० बुकसेलर्स, व पब्लिशर्स, मार्केट पोस्ट, यांजकडे मिळतील.

म्यानेजर

'सुबोध प्रकाश' प्रेस गिरगांव

मुंबई.


## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥। |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥ |
| सुवर्ण.... | २१॥ | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ८३ | उडीद | ६५ |
| गहूं काठे | ५९ | बनशी | ६७॥ |
| जवारी | ३६ | चणे | ६० |
| सर्की | ३॥ | मोठ | ४ |
| तूप | ७। | तेल | ४॥।= |
| कापुस ४१ | रुई ५७॥ | जिनची | ५९ |

सद्याचे भाव

| | | |
|---|---|---|
| जवारी वसंत संवत | १९४७ | ४२।= |
| गहू वैशाखशुद्ध | १९४७ | ५७ |
| आळशी चैत्रशुद्ध | १९४७ | ७८॥। |
| रुई फाल्गुन शु. | १९४७ | ५७ |
| सर्की व. नवें सालाची | १९४७ | ३॥= |

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................०४

... advance 5 Postage 13 as
... annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV — AKOLA MONDAY 29 DECEMBER 1890 — NO 50

वर्ष २४ — अकोला सोमवार तारीख २९ माहे डिसेंबर सन १८९० इ० — अंक ५०

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झालें असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्यांचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा


## कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील वैं औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गौतमराव केशव, मुंबई.

## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

सर्व लोकांस या जाहिरातीनें असें कळविलें जातें कीं रा. रा. नारायण त्रिंबक देशपांडे पाटील राहणार तांदळी खुर्द तालुके बाळापूर यानीं खाली सही करणार याजला ता. १८ माहे जानेवारी सन १८८० इसवीरोजीं स्थावर व जंगम मिळकतीचा गाहाण दस्तऐवज करून दिला त्याचा तपशील लिहिलें प्रमाणें.

१ कसबे पातुर शेखबाबू येथील घर खांब ६१ चे धाबें व या घरची आवारासुद्धां खुली जागा

२ मौजे तांदळी खुर्द येथील गढी व गढीतील घर खांब ९२ चे आवारासुद्धां सर्व.

३ मौजे दादुलगांव ता० बाळापूर येथील शेत सर्वेनंबर २८ चे शेत

४ मौजे कारले तालुके बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ३७ पैकीं

५ मौजे आंबाशी ता० बाळापूर येथील शेत सर्वेनंबर १०८ चे व त्यातील मोहाचीं झाडें ६ साहा

६ मौजे अंगखेड ता० बाळापूर येथील शेत सर्वेनंबर ५ व त्यांत अंब्याचे झाड १

७ पट्टी अंबराई कसबे पातूर येथील ठिके घाणामळा सर्वे नंबर ४२९ व यातील अंब्याचीं झाडें २३ तेवीस व मोहाची तीन ३ व बाभळीची तीन ३ व सर्वेनंबर २९९ यातील अंब्याचीं झाडें ६ व मोहाचीं झाडें २

८ तांदळी खुर्द ता० बाळापूर येथील सर्वे नंबर ४६ व सर्वेनंबर ९ हीं दोन शेतें. व सर्वेनंबर ९ यांतील अंब्याचें झाड एक व मोहाचें एक व सर्वेनंबर ३४ चें शेत व सर्वे नंबर १६ यांतील अंब्याचीं झाडें १५ व मोहाचीं झाडें ४ व सर्वेनंबर १७ पैकीं शेत व यातील अंब्याचीं झाडें ८ व मोहाचीं साहा व सर्वेनंबर २७ चें शेत सर्वेनंबर २४ चें शेत व यातील मोहाचीं झाडें २ व सर्वेनंबर ४३ चें शेत व सर्वेनंबर १

येणेंप्रमाणें सदरील माल आमच्याकडे गाहाण आहे याजकरितां सर्वांस असें कळविलें जातें कीं सदरहु मालावर सदरील दस्तऐवजाचे तारखेपूर्वीं जर कोणचा कायदेशीर हक्क असेल तर त्याणी आम्हांस ह्या जाहिरातीप्रमाणें पंधरा दिवसाचे आंत अणून खात्री करून द्यावी. ह्मणजे त्याचा योग्य विचार करूं असें न केल्यास त्याजबद्दलचे जबाबदार आह्मी कोणच्याही प्रकारचे नाहीं ह्मणून दिली जाहिरात सही ता० २३ माहे डिसेंबर सन १८९० इसवी. ( सही )

राघो नथुजी ढवळे वस्ती पातूर दस्तुरखुद्द

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

वाशिम ता० २०-१२-९०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कृतानेक सा० नमस्कार विनंती विशेष आज मजकुरी पिकें चांगली असून पावसानें नासाडी करणें मांडिलें आहे. प्रत्येक आठवड्यास व पंधरवाड्यांस पाऊस आहेच दोन दिवस चांगला हिवाळा भासूं लागला होता परंतु काल पासून दिनचर्या अगदीं बदलून गेली आहे. सर्व दिशा आभाळानें व्यापून गेल्या आहेत. मध्यें मध्यें पर्जन्याचे थेंब येतात. अशा अकाळी वृष्टीनें लोकांच्या तोंडावरचे पाणी मात्र जातें. हिवताप व खोकला आपले प्रस्त माजवीत आहेत असो. प्रभुसत्तेनें काय होईल तें खरें.

अलिशान रेसिडेंट साहेब बाहादुरांच्या आदरातिथ्यार्थ कडेकोट तयारी चालू आहे ह्या प्रसंगी येथें कामगार लोकांचा मोठा जमाव जमणार. त्यांच्या सरबराई कडे सर्व जिन्नस वेळीं मिळावे म्हणून गांवांत पाटील महार, जागले हे जिन्नस जमा करण्याच्या कामीं पाच दिवस मेहनत करीत आहेत. मे. डेप्युटी कमिशनर साहेब बाहादूर तहसिलदार साहेब यांच्या हुकुमानें, ही सरबराईचीं कामें चाललीं आहेत तेव्हां पाटील वगैरे कामगार लोकांवर गांवचे लोक रागें भरतात हें व्यर्थ आहे. हल्लीं एक महिन्या पासून गांवांत सरपण मिळत नाहीं या मुळें लोकांना घरांत धान्य असून सरपणाच्या दुर्भिक्ष्या मुळें उपाशीं राहाण्याची पाळी आली आहे. सरपणाच्या गाड्या अगर बैल जे बाहेरून येथें विकण्या करितां येतात त्यांच्या मागें म्हार, जागले लागून त्यांना चावडीवर नेतात व तेथें त्यांच्या पासून सरपण घेतात. या प्रमाणें प्रकार चालला आहे यामुळें गरीब बिचाऱ्या लोकांना विचारतो कोण!! वऱ्हाड प्रांताचे राजे रेसिडेंट साहेब आल्यानें लोकांना जितका आनंद होणार तितकेंच अशा प्रकारची अडचण झालेली पाहून लोकांना दुःख वाटतें!! त्याच प्रमाणें गुरांच्या चाऱ्या विषयीं प्रकार झाला आहे. इंग्रज सरकारच्या राज्यांत पाहिजे त्या मनुष्याला पाहिजे तो पदार्थ विकत घेण्याची व विकण्याची मुक्त्यारी असते. परंतु अशा प्रसंगीं हें तत्व कोठें गेलें कोण जाणे. त्याच प्रमाणें हल्लीं बेगारी माणसें पकडून काम करून घेण्याचा प्रकार गांवांत ज्यारी चालू असल्या मुळें लोकांत मोठा हाहाःकार झाला आहे. बाहेरगांवचे लोक कामा काजाचे निमित्तानें येथें येतात त्यांचा दर्जा त्यांची स्थिती कामाचा प्रकार याजकडे कोणी लक्ष्य न देतां बेगारीस पकडतात. एकूण बळीतो कानपिळी म्हणतात तें खोटें नाहीं.

मुनसिपालीटीनें आलिशान रेसिडेंट साहेब बाहादूर यांचें प्रीत्यर्थ पानसुपारी मानपत्र वगैरे समारंभ करण्या करितां येथील जुबली टाउनहालचे कंपाडांत मोठा मंडप बांधिला आहे. ह्या कामास लागणारें सर्व सामान मुंबईहून आणविलें आहे येथें साहेब बाहादुरांची स्वारी पहिल्यानेंच यावयाची तेव्हां त्याचे मनावर वऱ्हाड प्रांता विषयीं चांगला ग्रह उत्पन्न व्हावा या हेतूनें पुढारी मंडळी फार झटत आहे. Address with a silver casket इतक्यास अडीचशें रुपये पडले असें म्हणतात. या शिवाय येथें दारु काम चांगलें होणार आहे असें समजतें ह्या खर्चा करितां १००० रुपये येथें वर्गणी केली गेली असें म्हणतात. मुनसिपालिटी लोकल फंड वगैरें नीं ही कांहीं मदत केली.

वर बेगारीचा प्रकार ध्वनित केला या संबंधानें काल येथें मुनसिपालीटीचें कारकून व येथील पाटील यांचेमध्यें मारामारी होण्यापर्यंत पल्ला आला असें ह्मणतात. कोणी ह्मणतात झाली कोणी ह्मणतात होणार होती इतक्यांत लोकांनीं सोडविलें. कसें ही असो परंतु असे प्रकार होणें रास्त नाहीं. इंग्रज सरकारचे राज्यांत बेगारीक गाड्या बैल माणसें वगैरे पकडणें अगदीं गैरकायदेशीर आहे येणेंकरून गरीब लोकांवर जुलूम होतो. रयत त्रस्त होते. परंतु हें तत्व मनांत आणितो कोण?

कालपासून येथें अशी बातमी पसरली आहे कीं येथील मुनसीपालिटी लोकल बोर्डाचे ताब्यांत देणार! येथील लोकांना काम करितां येत नाहीं किंवा कोणत्या कारणानें हें अजून बाहेर आलें नाहीं. परंतु इतका वार्ता आहे कीं मुनसिपालिटीचें उत्पन्न फार थोडें आहे व जें कांहीं आहे तें establishment चा खर्च करण्यांतच जातें व मुनसिपालिटीपासून सुधारणा कांहींच होत नाहीं यांत खरें काय असेल तें समजत नाहीं परंतु मुनसिपालिटीचा मिळालेला हक्क जर जाईल तर मोठी दुर्दैवाची च गोष्ट समजली पाहिजे. तर पुढारी लोकांनीं हा हक्क न जाईल अशाविषयीं तजवीज करून मुनसिपालिटी राहील अशी तजवीज करावी उत्पन्न वाढवावें पाहिजे तशी तजवीज करून मुनसीपालिटी कायम राखावी हें बरें.

येथें देवपेठेंत एक मराठी वीस रुपयांची शाळा आहे. त्या शाळेंत या गांवचे दोन निरंकुश गुलहोसी जाऊन तेथील मास्तरापाशी निंद्यवर्तणूक केली इतकेंच नाहीं तर त्यांचे अंगावर चालून गेले होते असें ह्मणतात त्याबद्दल कोर्टांत फिर्याद गेली आहे असें कळतें. आतां या फिर्यादीचा निकाल माजिस्ट्रेट साहेब कसा काय करितात तें पाहून व नंतर याबद्दल काय लिहावयाचें तें पाहूं.

मि. पंडित सुरज नारायण अ० कमि० यानीं मुनसिपालिटीचे चेअरमनचा राजीनामा दिला असें ह्मणतात देव जाणे.

नंगे साधु जामिनावर आहेत असें म्हणतात बिचाऱ्याची साडेसाती अजून सरत नाहीं!!

वाशीम ता० १४-१२-९०

आलिशान रेसिडेंट साहेब बहादुरांचें स्वागताची तयारी मोठ्या सपाट्यानें चालू आहे मे. डेप्युटी कमिशनर साहेब बहादुर मिस्तर देवीस लोकप्रिय आफिसिएटिंग डेप्युटी कमिशनर यांना हल्लीं पाणी पिण्यास सुद्धां फुरसत सांपडत नाहीं इतके हे बंदोबस्त करण्यांत व आगत स्वागताची व्यवस्था करण्यांत गढून गेले आहेत. तसेंच मे. तहसिलदार साहेब यांची ही तारंबळ होऊन गेली आहे. पाटील, पांडे, जागले, महार यां पैकीं कोणा लाही अन्न खाण्यास फुरसत नाहीं. बड्या पाहूण्याचे सरबराई शिवाय ह्या प्रसंगी इतर बडेबडे जे गृहस्थ या ठिकाणीं येतील त्यांची ही सरबराई झालीच पाहिजे. काल पासून बडे लोक या येणाऱ्या प्रसंगा करितां येथें जमू लागले. कालरोजीं येवतमाळचे डेपुटी कमिशनर मिस्तर हेर (Hare) यांची स्वारी येऊन दाखल झाली. व आज तामसीस मे. कमिशनर साहेब बाहादुर यांना भेटण्या करितां जाणार आहे. कारण कमिशनर येथील हाफीसांचे तपासणी करून तिकडे कांहीं कामा करितां दरम्यान जो वेळ सांपडला त्या वेळांत गेले आहेत. काल रोजीं मे. डायरेक्टर साहेब बाहादुर शाळा खात्याचे अधिपति यांची स्वारी येऊन दाखल झाली. आज पासून त्यांची शाळांची तपासणी सुरू होणार आहे. आज रोजी मे. सानिटरी कमिशनर साहेब बाहादूर व इनस्पेक्टर जनरल पोलिस रजीस्ट्रेशन वगैरे खात्यांचे अधिकारी यांची स्वारी येणार आहे. येथें सरकारी बगीच्या जवळ एक मैदान आहे. तेथें अलिशान रेसिडेंट साहेबां करितां उतरण्यास जागा केली आहे. त्या ठिकाणीं दुसऱ्या कोणाचें तंबु उतरावयाचे नाहींत या करितां व्यवस्था केली आहे असें म्हणतात आतां बाकीच्या लोकांस तंबु देण्या करितां ट्रेवलिंग बंगलोच्या मैदानांत जागा दिली आहे. इतर ठिकाणी हल्लीं गहूं असल्यामुळें अंबराईतून उतरतां येत नाहीं. अलिशान रेसिडंट साहेबां बरोबर कांहीं पलटणचे लोक येणार आहेत त्यांना उतरण्यास ही त्याच ठिकाणी जागा आहे. अगोदर चारा व सरपणाचीं ढांकडें यांचा गंज करून व त्याच प्रमाणें इतर जिन्नस सर्व तयार करून ठेविले आहेत. आयत्या वेळीं येथें पाहिजे तो पदार्थ मिळणें कठिण पडेल व बच बच होऊन फजिती होईल ती न व्हावी या करितां दूरदर्शीपणानें अगाऊ तयारी करण्या बद्दल येथील कामदार लोकांची तारीफ जितकी करावी तितकी थोडीच समजली पाहिजे.

येथील म्युनिसिपालिटी कडून मानपत्र देण्याची तयारी ज्यारी सुरू आहे. तीनचारशें मंडळीला बसण्या करितां जागा पुरेल असा विरतीर्ण मंडप दिला आहे. त्यांचें काम बहुतेक आटोपत आलें आहे. मंडप फार उंच घालून पांढऱ्या शुभ्र कापडांचें छत दिलें आहे व तांबड्या कापडाची झालर लावून इतर कांहीं लहान नकशी करावयाची व स्वागतार्थ अक्षरांची पाटी लावावयाची व इतर कांहीं थोड्या सोई करावयाच्या राहिल्या आहेत. हें काम एक दोन दिवसांत पुरें होईल. अगदीच लहान परंतु सुंदर जुबिली टाऊनहाल त्याच्या पुढें थोडक्याच दिवसाचा परंतु टवटवीत बगीच्या किती ती शेवंतीच्या पाढऱ्या फुलांची शोभा व ह्यांच्या सन्निध सुंदर मंडप. अहा किती तो रमणीय देखावा ह्मणून सांगू! ह्या सर्व खटपटीचे श्रय मि. नारायण परशराम कारकून, मि. यशवंतराव दिवे वकील, मि. पांडुरंगपंत वकील वगैरे मंडळींना आहे. तसेंच मेहेरबान सिव्हिल सरजन मि. जोन साहेब बहादुर यांचें कामीं फार लक्ष्य आहे याबद्दल त्यांची वाशीमच्या लोकांनीं जितकी स्तुती करावी तितकी थोडीच आहे. वर मंडळी ध्वनित केली या मंडळीला आज सुमारें पंधरावीस दिवसांपासून क्षणभर सुद्धां फुरसत नाहीं. पुढील पत्रीं बाकी हकीकत देऊं. आलिशान रेसिडेंट साहेबांची स्वारी इंगोलीस येऊन दाखल झाल्याबद्दल बातमी आतांच समजली. मंगरूळपीर येथें तयारी चालू आहे. तसें वाशीम व मंगरूर यांचे दरम्यान रस्त्यावर कोठें तरी मुक्काम होईल अशा विषयीं तयारी चालू असल्याचें कळतें. या जिल्ह्यांतील देशमुख देशपांडे तिन्ही तालुक्याचे तहशिलदार व इतर बडे लोक यांना या समारंभास येण्याबद्दल पाचारण गेलें असें ह्मणतात.

येथील श्री बालासाहेबांचे संस्थानचे व्यवस्थापक मिस्तर राजाभाऊ यांनीं देवळाच्या इमारतीला सफेती देऊन इमारत सुशोभित करण्याचें काम सपाट्यानें सुरूं आहे. आधीच अशी इमारत वऱ्हाडांत तर काय परंतु आसपास दूरवर सांपडणें कठिण. तशांत दुरस्ती मग काय विचारतां. फारच सुंदर देखावा. ही इमारत कदाचित पाहण्यास अलिशान रेसिडेंट साहेब बाहादुर जातील व तेथें त्यांचें आतिथ्य होईल (पानसुपारी) असा संभव आहे. या भाऊ साहेबांची देवळांची व्यवस्था फार स्तुत्य आहे.

येथील कंपनीचें दुकान पहिल्यादां स्थापन झालें तेव्हां सर्व जिन्नस गिऱ्हाइकास मिळावे अशी सोय असे. खर्च एकेक कमी होतां होतां दुकानची स्थिती बरी नाहीं व कांहीं दिवसांनीं राम ह्मणेल कीं काय याची ही भिती उत्पन्न होत चालली आहे तर वेळींच त्याची नाडी पूर्वस्थितीवर येण्याकरितां व्यवस्थापकांनीं चांगल्या औषधांचा उपयोग करावा नाहींतर दुकान बुडाल्यास याचा दोष व्यवस्थापकांच्या माथी बसेल इतकेंच नाहीं तर नेटिव लोकांच्या आंगीं करतबगारी नाहीं ह्मणून जो पुकारा आहे तो दृढ होईल व यांचें लोकांत हांसे होईल या विषयीं व्यवस्थापकांनीं जपलें पाहिजे. नुकसानीपेक्षां नावाला अधिक जपलें पाहिजे असें लक्षांत आणून व वेळीं सावध होणें हें बरें.

आपला
"क्ष"

वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष वद्य २ शके १८१२

रशियन बादशहाचे चिरंजीव मुंबईस येऊन निजाम सरकारच्या हद्दींत दाखल झाले आहेत. प्रसिद्ध ठिकाणें पाहून राजपुत्रांची स्वारी नांदगांवास परत येणार आहे. हिंदुस्थानची पूर्णपणें माहिती करून घेण्याचा त्यांचा संकल्प आहे. इंग्रजी राज्य इंडिया मध्यें स्थापन्न होण्या पूर्वीं कोणकोणत्या राजक्रांती झाल्या, फ्रेंच, डच, पोर्चुगीज, वगैरे युरोपांतील राष्ट्रांचा इंग्लंडशीं हिंदुस्थानांतल्या व्यापारा संबंधानें कसा काय रण संग्राम माजला, मुसलमान व हिंदु यांच्या मधील वैमनस्य कसें परस्परास फलद्रुप झालें, आणि अखेरीस जयापजय होत होत इंग्लिशांचें राज्य कसें कसें पसरलें व वैभवास चढलें इत्यादि गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत तेव्हां त्या जुन्या गोष्टी परकीयांस इतिहासांतील वृत्तान्ता वरून सहजीं कळून येण्या सारख्या आहेत. हिंदुस्थानचे इतिहास पाहिजे तसे चांगले भरवंशा लायक नाहींत हें सर्वांस ठाऊक आहे तरी उपलब्ध माहिती मिळविल्यानें राज्या आरंभीं बळी तो कान पिळी हा नियम सर्वत्र लागू पडतो हें पक्कें दिसून येईल. दुसरें प्रस्तुतची इंडियाची स्थिति कळण्यास प्रत्यक्ष सफरी पेक्षां अन्य चांगले साधन कोणतें ही नाहीं. महाराणी सरकारचे पहुणे या नात्यानें राजपुत्राला बहुमान मिळणें रास्त आहे आणि धूर्त अधिकारी त्यांत कांहीं कमी पडूं देणार नाहींत तरी खुद्द राजेबहादुरांना सर्व लोकांमध्यें बहुमानानें मिरवत जाणें आवडत नाहीं म्हणून त्यांनीं मुंबई बंदरीं उतरल्या पासून सरकारी लवाजमा व सरंजाम होईल तितका कमी केला आहे आणि खानगी रीतीनें ते मुंबईच्या व्हिक्टोरिया स्टेशना पासून नांदगांव कडे आले आहेत. हा मार्ग फार चांगला आहे आणि थोर राजबिंड्या पुरुषाला उचित आहे झार सरकारचे चिरंजीवास आश्चर्य वाटेल कीं हिंदुस्थानचें अफाट राज्य इंग्लंडाच्या हातांत आहे. असा धनाढ्य देश इंग्लिशाला लाभला हें पाहून ते इंग्लिशाच्या नशिबाची तारीफ करितील. राज्यसूत्रें इंडियांत आणि त्यांचे चालक विलायतेंत असें असून अप्रातिम इंग्लिशांच्या राज्य पद्धतीचा गांवलौकिक ऐकून ते आश्चर्यानें थक्क होतील. महाराणी सरकारचा सन १८५७ सालचा जाहिरनामा सर्व जगास मशहूर आहे आणि त्या अन्वयें सशास्त्र वर्तन व्हावें म्हणून त्यांनीं आपले वजीर प्यादे वगैरे हिंदुस्थानांत ठाम करून टाकिले आहेत. सर्व राज्यकारभार सुरळित व सुयंत्र चालावा म्हणून सहस्रावधि निरनिराळे उपाय योजिले आहेत. विलायतेंत कायदे कौंसिलदारांची मंडळी स्थापिली आहे. इलाखे करून निरनिराळ्या भागावर न्याय मुनसफीची कोडतें व मुल्की कचेऱ्या घातल्या आहेत. सर्व कांहीं झालें आहे आणि होत आहे. मांडलिक राजांची संस्था कायम राखिली आहे आणि तेणे करून इंग्लिशांचे राज्यास स्थैर्य आलें आहे. इंग्रज राज्यकर्ते फार उदार व मोठ्या मनाचे आहेत हेही राजपुत्रास समजेल. जन्मतः लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेचें बाळकडू मिळाल्यामुळें इंग्रज लोक नैसर्गिक रीत्या स्वतंत्रतेचे भोक्ते आहेत आणि ते आपलें बाळकडू नेटिवांस ही पाजीत आहेत तेव्हां अशा सूज्ञ उपायांनीं उन्नती कालावधीनें होऊन नेटिव लोक न्याय व अधिकार या उभय गोष्टींचा उपभोग राज्यकर्त्यां बरोबर सारखाच विभागतील असा तर्क आहे. इंग्रज सारखे सत्वशील राजे आह्मास मिळाले नाहींत व या पुढेंही मिळणार नाहींत. आमची राजकीय व सामाजिक उन्नती केव्हां तरी कालवशेंकरून होणार असेल तर महाराणी सरकारच्या छत्राखालीं होईल अशी आमची पूर्ण बालंबाल खात्री आहे. आमची गाऱ्हाणी सरकारपाशीं आहेत परंतु त्यांच्या व्यतिरिक्त आमचे ह्मणणें मान्य करण्यास अन्य कोणी ही समर्थ नाहीं. राजनिष्ठा हें नेटिवांचें सर्वस्व आहे आणि त्यामुळेंच सर्वप्रकारें सुखसमृद्धी आहे. पादाक्रांत केलेल्या प्रजेस विद्यादाना सारखी देणगी अन्य स्थळीं मिळणार नाहीं आणि तरवारीच्या बळावर राज्य संपादून न्यायाच्या बळावर राज्य चालविणारें राष्ट्र आजकाल सगळ्या पृथ्वीवर आढळणार नाहीं. आमच्या प्रभूची प्रचंड शक्ति व राज्य करण्याची मोठी शहामत हीं पाहून आह्मा प्रजेस त्यांची मोठी धन्यता वाटते. सारांश हिंदुस्थाना सारखा राजनिष्ठ व निर्धन देश सुधारणेच्या चक्रा बरोबर कसा फिरत आहे याचा विचार केल्यानें राजपुत्रांस आश्चर्य व समाधान वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

---

हिंदुस्थानासंबंधानें रशियन सरकार फार फार गोष्टी समजून घेण्याच्या विचारांत आहे. 'अमृतबझार पत्रिके' स व 'इंग्लिशमन' पत्रास वर्गणी पाठवून तीं वर्तमानपत्रें सुरूं करण्याविषयीं त्या पत्रकर्त्यांस लिहून आलें आहे. इंग्लिशमन पत्र तेव्हांच जाऊं लागलें परंतु भिणाऱ्या भोंवती ब्रह्मराक्षस फिरतो त्याप्रमाणें अमृतबझार पत्रिकेनें आपलें वर्तमानपत्र रशियन सरकारास पाठविण्याविषयीं परवानगी सरकारापाशी मागितली असून ती अद्याप मंजूर होत नाहीं.

## The Berar Samachar

MONDAY, DECEMBER, 29, 1890.

We offer a hearty welcome to Mr. Fitzpatrick. He is not a simple mister. He was Dennis Fitzpatrick Esquire C. S. I. Bengal Civil Service till May last. On the 20th May the Queen Empress of India was graciously pleassd to appoint him a 'Knight Commander.' His honourable services in Assam as Chief Commissioner are too well known to all. As the ruler of the province he visits his little domain and wherever he goes he is welcome. The arranged receptions at various places are on a grand scale and are therefore most costly. It is the cordial wish of his ryots that he should carry with him the best impressions of his tour in Berar. These pleasant remembrances will put him in good humour when any question about Berar arises for his decision. The duty will then be a pleasure since it will associate itself with so many happy recollections. It will be much more so in the case of a Resident like Mr. Fitzpatrick. His long experience admixed with sound politics is a sure guarantee for justice. In his regime the keeness of the edge has been greatly subdued by his green old age. His Highness the Nizam is faring well with his advice and the Hyderabad Assigned Districts are, under him, progressing fairly with their latent vitality as they did before.

From the Commissioner down to the Jaglia every government servant is all busy and in haste to pay his respects to the Resident. The officers have made common cause with the Ryots in making his visit so far agreeable and pleasant as possible. The high officers spare no pains to look well in the presence of the honorable gentleman. All are ready with their engines. A word from his mouth will show him what he is worth. He can command the whole troup of officers and the Ryots will indicate what discipline means under such authorities.

It is certainly very kind of Mr. Fitzpatrick that he pays us a winter visit. He denies himself the pleasure of a Hyderabad Resident. He comes amongst us to let us know how nobly he performs his duty. He is to march throughout the length and breadth of the province. Even a petty village is not insignificant for him. He is to stay at Boregaon and the little stay will certainly acquaint him with rural life. We are highly obliged to him for the dreary long days he spends at our places of little interest. The province has few attraction for a stranger except that it yields a handsome revenue.

Berar has made rapid strides in all movements of progress. The administration is losing in its military spirit and is gaining in civil refinements. Mr. Plowden is the direct officer in charge of the province. In him we have secured a first-class administrator though his state-diplomacies are here of little avail. He has aimed at a thorough system in all departments, and his organizing and administrative capacities are vividly seen in his penetrating control. His additions to the reforms of his predecessors are great and many. Education is vastly extending its limits and threatens rivalry with the foremost provinces in the Bombay presidency. Justice is well administered. It is not our purpose to mention the names of those who conduct the different departments nor is it our purpose to comment on their merits and demerits. It will be impossible to name all of them and it will be disrespectful to some of them if we do. But Mr. Obbard will, we hope, begin the list of those who are renowned for integrity of purpose and ability for work. The Local bodies and Municipalities are advancing the aims of the system of Local Self-government. However small it may be, Berar deserves and enjoys the fruit of Lord Ripon's reforms. The natives are doing well though they don't hold high offices as in sister provinces. The educational department presents a novel feature and is therefore an exception. It is thoroughly *native* from head to foot. The rail traffic is tremendously large and the mail to Calcutta via Nagpur will run through the province and will therefore develop several resources of commerce and communication. The ryots are loyal and happy. We would at the same time request the Resident to observe how poverty is stealthily marching upon us in the train of civilization. In short every thing goes right and all is well and good.

When Mr. Fitzpatrick returns to his residency he will naturally talk well and draw fine pictures for Berar. Nor is it our object to contradict him there. The different addresses and memorials will form his memorandum-book and he will have to see what he can do with it. We intentionally request him to give a listening year to what the Jamedar Sabha will represent in regard to their old grievances. Like a man of action he is expected to make his reign most benign. We have therefore in store so many blessings and if god spare him long for our province we shall be the recipients of them in time.

We beg to direct the attention of the Commissioner to what our Bassim correspondent has said with regard to the Resident's tour in the province. It is often good to look behind the curtain. The whole affair will entail upon the officers curses-say unkind words-of the poor labourers. Upon them also they are thrown helplessly for help. The officers of higher grades including Deputy Commissioners, Police Superintendents, Tahasildars &c. depend upon the work of the petty servants. The latter are dishonestly ignorant of what they do and make others do for them. There is a good deal unavoidable and it will continue to the end of the world; but much will be mended and therefore need the Commissioner's care and caution If the Commissioner will see *personally* with the aid of his staff that due wages and prices of men who serve and the things served are paid we will assure the ryots that not human efforts will ascend more.

26-12-90.

The proceedings of the National Congress commenced here to-day at the *pandal* at the Tivoli Gardens.

A Mahomedan Educational Conference will open at Allahabad on Sunday next, and will hold sittings on that and two following days. About six hundred members are expected to attend. The president is Sirdar Mahomed Hayat Khan Bahadur, C. S. I., and the Ven. Sir Syed Ahmed will act as secretary. The Nawab Mohsin-ul-Mulk will represent the Government of the Nizam. One of the most interesting features of the Conference will be the reading of a paper on technical education by Sir Syed Ahmed.

T. I.

Basim 27-12-90.

The Resident arrived here with his retinue today at 10½ by a special Tonga of four horses leaving Ingoli at 6 A. M. this day. According to the original dates announced by the first programme he was to come here yesterday the 26th Instt. but he was late in coming to Ingoli by one day. Consequently one day he was late in coming here. About 500 persons of note from this town as well as from the whole district have had gone as far as the 53rd mile stone to receive the honourable guest.

NOTICE.

It is hereby published for the information of the public of Akola that the lists of voters prepared by the Secretary for the year 1890-91 under rule 6 of the Municipal election rules are posted as required by rule 7 at the following places.

The persons entitled to vote under rule 3 are requested to see their names included in the lists posted and make complaints if there are any under rule 8, and also to choose Ward in which they wish to vote in case they are entitled to vote in two wards, under Section 5 before 5th January 1891.

Name of the place where lists are posted.

Deputy Commissioner's office
Small Cause Court
Tahasil
Chawries
Police Station.
Cotton market
Grain and Weekly market
Near the Morna Bridge.

Dated Akola, 26-12-90.

Mohammed Husain.
M. C. Akola.

## वऱ्हाड

अलिशान रेसिडेंट साहेब बहादुर यांची स्वारी परवा सकाळीं साडे दहावाजतां वाशीम मुक्कामीं येऊन दाखल झाली.

सर्व हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या खात्याचे मुख्य अधिकारी मि. बेन साहेब हे काल रोजीं येथें येऊन क्यापटन हेस्टिंग वऱ्हाडचे सेन्सस सुपरिन्टेंडंट आणि सुपरवायझर मंडळी समवेत शहरांतील आज पर्यंत केलेल्या कामाची चौकशी करून पुढें रवाना झाले. झालेल्या कामांतील चुक्या दुरुस्त करून पुढील कामाची व्यवस्था समजावून देते वेळीं साहेबांच्या चांगल्या गुणांची पारख झाली.

खामगांवास मुलींच्या नवीन दोन शाळा सुरू होऊन आज पाऊण महिना झाला शाळेची व्यवस्था सुरेख चालली आहे. एक मुसलमानी मुली साठीं असून दुसरी मारवाडी मुलीं साठां आहे. मि. न्यामतखा जिलनखा व शेट हुकूमचंद गोटीराम ह्यांनीं अनुक्रमें दोन्हीं शाळचा पुरस्कार घेतला आहे. स्त्रीशिक्षणाविषयीं वरील उभय ज्ञाती मधील कळकळ पाहून आह्मांस संतोष वाटतो.

कारंजा येथील मुलींच्या हिंदुस्थानी शाळेंत पहिल्या इयत्ते पासून सहावे इयत्ते पर्यंत अभ्यास चालतो. आज पट्टावर साठा जवळ मुली आहेत. शाळेचें काम फार नामी चाललें आहे. या शाळेचे हेडमास्तर मि. मनसखा यांची त्यांच्या वरिष्ट अधिकाऱ्यांनीं चांगली शिफारस केली आहे तेव्हां या शाळेस आणखी योग्य मदत मिळून हेडमास्तरांची बढती होणें फार आवश्यक आहे.

पुसदाहून बातमी कळते कीं 'आज कालइकडे चोऱ्या आणि डाके पडतात. मोरथ येथील डाक्याचा अद्याप पत्ता नाहीं. मोहइजारा येथें नुकताच डाका पडला. सेंबल पिंपरी येथें घरफोडी झाली आणि अनसिंग जवळील पिंपळगांव येथें डाका पडला. डाक्यांत सरासरी तीस पसतीस हजाराचा माल गेला असावा असें समजतें.'

गेल्या आठवड्यांत येथील स्टेशनजवळील बेटाळ्यांत कांहीं चोऱ्या होऊन कांहींजण अपराधी पकडले आहेत. त्यांच्या म्हणण्यावरून त्यांची एक जंगी टोळी असावी असें दिसतें. त्या भागाला पोलिसाचा बंदोबस्त अधीक चांगला असणें जरूर आहे वरील दोन्ही बातम्या वरून चोरट्या लोकांची एक मंडळी टोळधाडी प्रमाणें वऱ्हांडांत तळ देऊन बसली असावी असें वाटतें. पोलिस खात्यास शिकार मारून वाहवा मिळविण्यास संधि बरी आहे.

रा. रा. शंकर नारायण डांगे हे एल. एल बीच्या अभ्यासा निमित्त रजेवर जात आहेत. त्यांच्या गुणावरून त्यांस सर्वजण चहातात असें विद्यार्थी दर्शवीत आहेत.

यंदा म्याट्रीक्युलेशन परीक्षेस ३००३ उमेदवार असून ७४१ पसार झाले त्यांपैकीं वऱ्हाडांतील विद्यार्थी येणें प्रमाणें:-

अकोला हायस्कूल- दत्तात्रय बापूजी विजापूरकर, रामचंद्र मार्तंड गुप्ते, गणेश राजाराम जोशी, दामोदर चिंतामण काळे, तानु निंबाजी कोटे, बळवंत गणेश कुळकर्णी, बळवंत विट्ठल पवार, सदाशिव हरी शेवडे, व नारायण रंगनाथ तागडे.

उमरावती हायस्कूल- केशव जयराम अमीन, रामचंद्र रघुनाथ अग्निहोत्री, दत्तात्रय अनंत केसकर, दिगंबर कृष्ण कोल्हटकर व सैद खैरात अली.

मागाहून आलेली नोटास.

मे० अबदुला तयफ कच्छी दुकान अकोलें यांस खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं ताजनापेठ अकोलें येथील कच्छी आळीतील आमचें दुकान तुम्ही भाड्यानें घेतलें आहे. व तें अशा शर्तीवर घेतलें आहे कीं ज्या वेळेस आम्ही दुकान खालीं करून मागूं त्या वेळेस तुम्हां खालीं करून दिलें पाहिजे. आम्हांस तें दुकान मोडून सोयकर बांधण्याचें आहे. सबब तुम्हांस नोटीस देण्यांत येतें कीं, ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचें आंत तुमचे कडेस दुकान खालीं करण्याचे तारिख पर्यंत जें भाडें निघेल तें घेऊन येऊन दुकान खालीं करून द्यावें दुकान खालीं न केल्यास दरसाल तीनशें ३०० रु प्रमाणें भाडें द्यावें लागेल सदर्हु भाडें कबूल नसल्यास दुकान खालीं करून द्यावें. दुकान खालीं न केल्यास भाड्याबद्दल रुपये ३०० आगाऊ दुकानावर आणून न दिल्यास कायद्या प्रमाणें नोटिशीचे मुदती बरहुकूम फिर्याद केली जाईल. नंतर कोर्टखर्च सुद्धां पैसा द्यावा लागेल. नंतर तुमची कोणती ही तकरार ऐकिली जाणार नाहीं. सदर्हु नोटिशीचा जबाब ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत द्यावा कळावें तारीख २८-१२-९० इ.

( सही ) रघुनाथदास रामप्रताप साहु तर्फे मुखत्यार आत्माराम सितारास दस्तुर खुद.

नोटीस.

ह्या नोटिसानें अकोले येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मुनासिपल सेक्रेटरी यानीं निवडणुकीच्या ६ नियमाप्रमाणें मतदेणाऱ्या लोकांची यादी १८९०-९१ सालाकरितां तयार करवून नियम ७ प्रमाणें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं त्याच्या नकला लाविल्या आहेत. नियम ३ प्रमाणें ज्याना मत देण्याला अधिकार आहे अशा लोकांना विनंती करण्यांत येते कीं त्यानीं आपली नांवें सदरहू याद्यांत दाखल केलेली आहेत किंवा नाहींत हे पाहावें आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एखादी तक्रार असल्यास ती व ज्यांना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार असेल त्याना आपण कोणत्या वार्डात मत देणार हें ता. ५ जानेवारीच्या आंत कळवावें कळावें ता. २६-१२-९०

मे. दिपुटी कमिशनर साहेब याचे कचेरींत
स्मालकाज कोर्ट.
तहासिल कचेरी
काटन मारकेट.
धान्य व आठवडे बाजार
चावड्या
पोलिस स्टेशन
लोखंडी पुल

MD: Husain.
Secretary A. M. C.

## वर्तमानसार

युरोपांत वर्तमानपत्रांच्या बातमीदारांचा सुळसुळाट किती असतो हें सर्वांस माहीत आहेच. बेर्लिन येथील नाटकगृहांत फार नांवाजलेली अशी एक गायनपटु नटी होती. तिच्या घरीं ती आपल्या पलंगावर निजली असतां खालीं कांहीं खसखसलें ह्मणून ती पाहूं लागली तों एक गृहस्थ पुढें उभां राहिला. कोण काय विचारतां तो ह्मणतो, "मी एक वर्तमानपत्राचा बातमीदार आहें. आपण कोणत्या सुरांत घोरतां याची बातमी मिळविण्याकरितां मी एवढें साहस केलें"

ग्यालिशिआ ( ऑस्ट्रिआ ) प्रांतांतील कांहीं स्त्रियांनीं जोसेफ बादशहास एक अर्ज पाठविला आहे, त्यांतील मजकूर असाः आह्मी ग्यालशिआ प्रांतांतील कांहीं स्त्रिया महाराजांच्या चरणवर लोळण घेऊन अशी प्रार्थना करतो कीं, सांप्रतकाळीं पुरुष असला ह्मणजे तो लहान असो, ह्मातारा असो, त्यास लष्करी खात्यांत नौकरी मिळते, व त्यास आपली मर्दुमकी दाखविण्याचा सुप्रसंग मिळतो. आह्मा स्त्रियांस मात्र वगळतात; तर तसें न होतां आह्मांस त्या नोकऱ्या मिळण्याची तजवीज व्हावी; कारण आह्मी पुष्कळ पुरुषांपेक्षां जास्त कुंवतदार आहों. हल्लींची हत्यारें आह्मांस सहज पेलतां येतात. तर सरकारस्वारी या आमच्या अर्जाकडे लक्ष्य देऊन आह्मा स्त्रियांची एक व्हालंटिअर पलटण तयार करील अशी आशा आहे"

झुरिच येथें थोडें दिवसांपूर्वी एक भिकारी एका गृहस्थाच्या घरांत दार उघडून जाऊं लागला, तेव्हां दारचा कुत्रा त्याला येऊन डसला; त्याबद्दल त्या कुत्र्याच्या मालकावर फिर्याद केली व नुकसानीबद्दल बऱ्याच रकमेचा दावा सांगितला. त्यानें फिर्यादींत असें लिहिलें कीं "मी दारोदार जाऊन भिक्षा मागणारा माणूस त्या माझे पाय जर असें दुखावले, तर मला मुळींच धंदा चालवितां यावयाचा नाहीं. आतां माझा या कुत्र्याच्या चावण्यानें पाय नापा झाला आहे तेव्हां नुकसानीबद्दल त्या कुत्र्याच्या मालकाकडून अमुक रक्कम देववावी." प्रतिवादीतर्फेच्या वकिलानें आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, "वादीचें नुकसान वस्तुतः कांहीं झालें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याचा फायदा झाला आहे. त्यानेंच आह्मांस बक्षिस द्यावें; करण पायजाया झाला आहे हें पाहून लोकांस त्याची जास्त कीव येऊन त्यास भिक्षा ताबडतोब घालतील." परंतु कोर्टानें असा निकाल दिला कीं आपलेकडे येणाऱ्या गृहस्थांस आपल्यामुळें कांहीं दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी घराच्या मालकावर आहे. मग येणारा गृहस्थ भिक्षेसाठीं येवो कीं कांहीं कामानिमित्त येवो.

ब्याबिलॉन येथील शिलालेख.–हे शिलालेख इ० स० पूर्वी २३०० वर्षांपासून तों तहत २०० वर्षांपर्यंत सांपडतात. कांहीं व्यापारासंबंधीं, कांहीं कायद्यासंबंधीं, व कांहीं हिशोबासंबंधीं असे आहेत. यांपैकीं कित्येक शिळेवर खोदलेले असून त्यांच्यावर चिखलाचा गारा बसविलेला आहे, आणखी त्यांच्यावर पुनः खालच्या लेखाचीच नक्कल असून पुनः त्यावर चिखल बसविलेला आहे दोन शिलालेख असे आहेत कीं त्यांवरून त्याकाळीं दत्तकांचा व्यापार करणारी एक मंडळी होती. त्यांचा धंदा हा कीं गरिबांचीं मुलें घेऊन ज्या श्रीमंतांस दत्तक पाहिजे असतील त्यांस द्यावयाचीं, आणि अशा तऱ्हेनें त्या मुलांच्या आईबापांकडून व दत्तक घेणारा कडूनही पैसे मिळवावयाचे. हे लेख बावीसशें वर्षांचे जुने आहेत.

स्वीडन येथें दारू विकण्याबद्दल परवाना देतात तो अशा शर्तींवर कीं दारू विकत घ्यावयाची तिच्याबरोबर कांहीं ना कांहीं तरी खाण्याचा पदार्थ घेतलाच पाहिजे नाहीं तर दारू दुकानदारानें मुळींच देऊं नये.

इंग्लंडांतून बाहेर देशाला पुस्तकें जातात किती हें पाहिलें ह्मणजे छाती दडपून जाते. पुढे दिलेले कोष्टक बघण्यालायक आहे.

| सन. | वजन हंड्रेडवेट | किं० रु० |
|---|---|---|
| १८८७ | १,३३,४२३ | १,१७,५४,११० |
| १८८८ | १,४२,८९३ | १,२४,५९,५९० |
| १८८९ | १,५५,२३८ | १,२९,५१,६८० |

दरसाल प्रमाण वाढतीवरच आहे.

क०

निझामच्या खटल्यांतील सोलिसिटर मि. रॉटन हे हैदराबादेस गेले आहेत हा प्रचंड खटला लवकरच सुरु होणार आहे.

इतर राष्ट्रांच्या सर्व वकिलांनीं चीनच्या बादशहाना वर्षांतून एकदां भेटण्याबद्दल जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.

पंजाबांत लाहोर नजीक जमिनींत एक जुनें शहर लागलें आहे असें ह्मणतात.

अमेरिकमिकोमध्यें एक वनस्पती आढळली आहे तिचा असा गूण आहे कीं जे तिजकडे पहातात त्यांच्यावर योगविद्येचा प्रयोग होतो.

गंगानदीच्या पाण्यापेक्षां यमुनेचें पाणी हलके व पाचक आणि क्षाररहित आहे असें समजतें.

कलकत्यास पटकीचा उपद्रव सुरु झाला आहे असें समजतें. कांग्रेसच्या गडबडीच्या वेळीं या आकाबाईचे आगमन तेथें कसें झालें नकळे!!

सु० प०

बंगाल्याकडील एका रामानादासी नावाच्या एका बाईवर नवऱ्यास कुऱ्हाडीनें ठार मारल्याचा आरोप आला होता. खटल्याची चवकशी पुरी झाली. ज्युरीनें बाईस निर्दोषी ठरविलें पण जज्जानें ज्युरीचें मत गुंडाळून आरोपीस शिक्षा देण्याचा ठराव केला व त्याबद्दल हायकोर्टाचें मत विचारलें. हायकोर्टांत मि. घोस नांवाचे वकील बाईच्या तर्फे हजर होते त्यांनीं तक्रारींत असें सांगितलें कीं या खटल्यासंबंधानें जी पोलीसची डायरी आहे ती कोर्टांत हजर करावी. बाईचा गळा कापण्यास तयार झालेल्या पोलिसतर्फे असें सांगण्यात आलें कीं, जर ही डायरी खरी ठरली तर बाईला खात्रीनें फाशी देण्यांत येईल ही गोष्ट मि. घोस याणी पक्की लक्षांत ठेवावी पुढें भवती न भवती होऊन डायरी पुढें आणण्यांत आली तों तींत मरणाराचा जो शेवटचा लेख लिहून घेतला होता त्यांत व फिर्यादीतर्फे आलेल्या पुराव्यांत अतीशय फरक पडूं लागला! हें पहातांच बाईस सोडून दिलेंच पण पोलीस लोक एखाद्या मनुष्याच्या गळ्यास फास लावण्याला कसे तयार होतात हें यावरून सहज कळण्यासारखें आहे. असे निरपराधी लोक पोलिसच्या जबड्यांत सापडुन किती ठार मरत असतील तें एक ईश्वर जाणें. याला कायदेशीर खून ह्मणतात!

आफ्रिकेंत व्यापार करण्यासाठीं पोर्तुगाल देशांत एक नवी कंपनी स्थापन झाली असून तिला तेथील सरकाराकडून ९९ वर्षांचा परवाना मिळाला आहे.

ठा० अ०

मुंबईस धुराचे विजेचे व केरोसीन तेलाचे जे दिवे लोक लावीत आहेत त्या योगानें दृष्टीस इजा पोचत असून चष्मेवाले जास्त निपजत आहेत असें डा० मेकानी याचें मत आहे.

दुधांत भेसळ –वायव्य प्रांताच्या लष्करी क्यांटोनमेंटमध्यें दूध घालणाऱ्या गवळयांनीं दुधांत भेसळ केल्यावरून त्यांस दरएकास सहा सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

जंगम इस्टेटीबद्दल २० रु० किंवा २० रुपयांचे आंत कोणास गहाणखत करणें असेल तर ते स्टांपावर नको. ह्मणून सरकारचा ठराव झाल्याचें समजतें.

सन १८८० चा व्यापारि जाहाजाचा कायदा व १८४१ चा जाहाजांच्या नोंदीचा कायदा ह्या दोन कायद्याच्या दुरस्तीचो बिलें हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौंसिलापुढें आलीं आहेत

पूर्व आफ्रिकेंतील पोर्तुगाल सरकारच्या मुलखाची वहिवाट करण्याचा मक्ता ९९ वर्षांच्या करारानें पोर्तुगाल सरकार एका कंपनीस देत आहे. त्याकरितां १ कोट रुपये भांडवल जर्मनींत जमा होत आहे असें ता० १९ ची लंडनची तार सांगते.

दंगा– चिनांमधील लोकांनीं चांक्रा शहराजवळ दंगा करून आसपासचे पूल वगैरे पाडून तारेचें सामानही पळविलें असें बां. ग्या. वरून समजतें.

रशियन सरकार कलकत्ता येथील प्रसिद्ध अमृत बझार पत्रिकेचे वर्गणीदार झालें. असें अमृत बझार पत्रिकेवरून कळतें. आमच्या सरकारचे गुणदोष पाहण्याकरितां कीं काय?

स० शो०

---

नोटीस

रा. रा. नारायण त्रिंबक देशपांडे पाटील राहणार तांदळीखुर्द ता० बाळापूर जिल्हा अकोला यांस नोटीस देणार राघो नथुजी ढवळे साहू राहणार पातूर शेखबाबू ता० बाळापूर जि० अकोला नोटिशीनें असें कळविलें जातें कीं तुमचे रजिष्टर दोन हजार २००० रुपयांचे स्थावर जंगम जिंदगीचें आह्मानवळ आहे त्याजला अजमासें १०-११ वर्षें झाली तरी तुह्मी त्यापैकीं व्याज मुद्दलची कांहींच फेड केली नाहीं करितां तुह्मी व्याज मुद्दलसुद्धां रुपयाची आदाई दिवस १५ दिवसाचे आंत करावी नाहींपेक्षां कोर्टमार्फत फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत व ह्या नोटिशीचा खर्च व सर्व नुकसानसुद्धां भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस तारीख २३-१२ ९० इ०

[ सही ]

राघो नथुजी ढवळे वस्ती पातुर दस्तूरखुद

---

नोटीस

चिरंजीव रा. तुकाराम भवानसा रंगारी राहणार बाळापूर यांस मारुती भवानसा रंगारी बाळापूर यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी ता० ४ माहे डिसेंबर सन १८९० इसवीची नोटीस दिली ही देण्यास कांहीं कारण नव्हतें कारण तुमचा व आमचा पंचमार्फत निकाल झाला आणि फारखत्या झाल्या त्याप्रमाणें दुकान वगैरे जें कांहीं ठरलें होतें तें तुह्मांस दिलें. हल्लीं गावांतील फेरवी लोकांचे सांगितल्यावरून तुह्मी विनाकारण तंट्यावर येऊन खूळ उत्पन्न करितां हें तुह्मांस योग्य नाहीं आपला विचार आपण पाहिला पाहिजे. तुह्मी आसाम्यास नोटीस दिली व ते लोक तकरार करितात असें कृत्य करणें योग्य नाहीं आसाम्याचे देणेंघेणें मुदती बाहेर गेल्यास तुह्मांस नुकसान भरून द्यावें लागेल करितां हल्लीं तुह्मांस नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आपली जाहिरात रीतीप्रमाणें रद्द करून प्रसिद्ध करावें. ह्मणजे आमचे देणेंघेणें सुरळीत चालेल असें न केल्यास तुह्मी नुकसानीस पात्र व्हाल व देशावरी लोकांचे देण्याचे कीं निमे रुपये तुह्मी आह्मांस देण्याचे व्याजासुद्धां कबूल केलें त्याप्रमाणें देऊन पावती घ्यावी. अथवा ज्याचे देणें आहे त्यांस देऊन निकाल करावा व मातोश्री हली आपल्या जवळ राहण्यास आली आहे फारकतीशिवाय जें कांहीं वित्त तिजपाशीं आहे. ती जिवंत आहे तोंपर्यंत मालकीणच आहे गत झाल्यावर पुढें त्याचे वाटणीचा विचार करितां येईल अलीकडेस उधारीपैकीं तुह्माजवळ वसूल आला असल्यास आह्मांस देऊन पावती घ्यावी न दिल्यास दावा करणें पडेल असें होऊं नये. आपसांत निकाल झाला परस्पर पावत्या फारखत्या झाल्या व हे कागद पानाचंद नथुसा साहू बाळापूर याजपाशीं आहेत ते घेऊन तुमचे आह्मांस द्यावें व आमचे तुह्मी घ्यावे सदरहू नोटिशी प्रमाणें १५ दिवसांत निकाल करावा याप्रमाणें न केल्यास तुह्मांवर दावा होईल वडीलपणाच्या नात्यानें तुह्मांस आम्ही वरचेवर सांगत आहो या उपर तुमची इच्छा. या नोटिशीचा खर्च आम्हांस देऊन पावती घ्यावी ह्मणून दिली नोटीस ता० २३-१२-९० इ०

सही

मारुती भवानसा रंगारी वस्ती बाळापूर

दस्तुर खुद्द

---

## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १०० |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥ ≡ |
| सुवर्ण.... | २२॥ | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ८३ | उडीद | ६५ |
| गहूं काठे | ५५ | बनशी | ६७॥ |
| जवारी | ३६ | चणे | ६० |
| सर्की | ३। | मीठ | ४ |
| तूप | ७। | तेल | ४।॥= |
| कापूस ४१ | रुई ५५॥ | जिनची | ५८ |

सव्याचे भाव

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत संवत | १९४७ | ४२।= |
| गहू | वैशाखशुद्ध | १९४७ | ५७ |
| आळशी | चैत्रशुद्ध | १९४७ | ७९ |
| रुई | फाल्गुन शु. | १९४७ | ५७ |
| सर्की | व. नवे सालाची | १९४७ | ३॥ |

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.